# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११६८/२०१०.

श्री. प्रमोद चंपालालजी लुकंड,
महावीर चौक, नाचनगांव रोड,
पुलगांव, जि. वर्धा - ४४२ ३०२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, पुलगांव,
जि. वर्धा.

श्री. ए. सी. हेटे,
जनमाहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता,
नगर परिषद, पुलगांव,
जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.९.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व अपीलकर्ता यांचे वतीने श्री. ए. पी. दंडे, वकील हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. दिलीप लांडगे, मुख्य लिपिक हे हजर आहेत व माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.११.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्य अधिकारी, नगर

परिषद, पुलगांव यांचेकडे माझ्या घराच्या दोन्ही बाजूने सऱ्हदीचा रस्ता आहे. माझ्या घराच्या पाठीमागे सोनी एजन्सी प्रो. प्रा. मृणाल सोनी (बंटी) यांचे इलेक्ट्रीक व हॉडवेअरचे दुकान आहे. त्यांनी दुकानाचे सामान, थ्रेशर, पाईप इत्यादी माझ्या घराच्या दरवाजे समोर व रोडवर अतिक्रमण करीत आहे व ते बंद करावे. आपल्याकडे अनेकवेळा तक्रार केली आहे. परंतु काहीही कारवाई झालेली नाही. तरी आपणास नम्र विनंती आहे की, आपण योग्य कारवाई करावी व पुनः अतिक्रमण होणार नाही याची आपण दखल घ्यावी व आपण काय कारवाई केली ते आपण मला कळवावे ही विनंती अशी माहिती मागितलेली आहे. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २.१२.२००९ च्या पत्रान्वये श्री. सोनी एजन्सी, पुलगांव यांनी केलेल्या अतिक्रमणाबाबत अजून पावेतो नगरपालिका तर्फे कार्यवाही करण्यात आली नाही. लवकरच कार्यवाही बाबतचा अहवाल आपणास कळविण्यात येईल असे कळविण्यात आले. परंतु अपीलकर्ता यांनी पुन्हा दिनांक २३.१२.२००९ रोजी तीच माहिती मागण्याचा अर्ज केला व त्यासंदर्भामध्ये दिनांक १.१.२०१० च्या पत्रान्वये श्री. मृणाल संतोषकुमार सोनी यांना अपीलार्थी म्हणजे श्री. प्रमोद चंपालाल लुंकड यांनी नगरपरिषदेकडे व जिल्हाधिकारी, वर्धा यांचेकडे तक्रार दाखल केली आहे. आपण श्री. लुंकड यांचे घराचे दोन्ही बाजुला दुकानातील साहित्य ठेवून अतिक्रमण केलेले आहे. तरी हे पत्र प्राप्त होताच १५ दिवसाचे आंत आपले साहित्य काढून जागा मोकळी करुन द्यावी. अन्यथा आपणावर नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल. अशी नोटीस देऊन त्या नोटीसची प्रत अपीलकर्ता यांना देण्यात आलेली आहे. परंतु त्यानंतर दिनांक २५.१.२०१० रोजी अपीलकर्ता यांनी मृणाल संतोषकुमारजी सोनी यांचे प्लॉटचे क्षेत्रफळ (आखीव पत्रिकाद्वारा) व इतर ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. मृणाल सोनी यांनी दिलेल्या १५ दिवसाच्या कालावधीमध्ये अजूनपर्यंत त्यांनी आपले अतिक्रमण हटविलेले नाही. तरी आपण त्यांच्यावर अजून पर्यंत कोणती ही कारवाई केलेली नाही. तरी आपण कारवाई करावी व माहिती द्यावी ही विनंती. असा अर्ज दिलेला दिसून येतो. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ६.२.२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना पुन्हा त्यांच्या ४ मुद्यांच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. पुन्हा दिनांक ३०.३.२०१० रोजी कार्यवाही पूर्ण होताच आपणास याबाबत कळविण्यात येईल याची नोंद घ्यावी असे कळविण्यात आले. परंतु कार्यवाही झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, आता पर्यंत अनेक तक्रारी केल्या परंतु २ वर्ष होऊनही कोणत्याही प्रकारची कार्यवाही नगरपरिषदने केली नाही. म्हणून नगरपरिषदेमध्ये कार्यवाहीच्या संदर्भात अर्ज करावा लागला. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, श्री. सोनी यांचे दुकान आहे व त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे कायम स्वरुपाचे बांधकाम अतिक्रमण केले नाही. तरीही सोनी हे दुकानातील सामान बाहेर ठेवतात व नंतर आत ठेवतात. त्यासंदर्भात कार्यवाही केली तर सोनी हे दुकानातील सामान काढून घेतात व नगरपरिषद कर्मचारी गेल्यानंतर ती पुर्ववत ठेवतात. नगरपरिषदेने त्यांचेवर शास्ती लादणे आवश्यक होते पण ती त्यांनी लादली नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी वेळोवेळी अतिक्रमण काढण्याच्या संदर्भामध्ये अर्ज करावा लागतो. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या संदर्भामध्ये मात्र कोणत्याही प्रकरणात कार्यवाही करुन देण्याचे आदेश देता येत नाही. तर माहिती जशी उपलब्ध आहे तशीच उपलब्ध करुन देता येते व ती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र अपीलकर्ता यांची तक्रार ही वारंवार तात्पुरत्या अतिक्रमणाचे संदर्भात असल्यामुळे त्या संदर्भात कायम स्वरुपात कार्यवाही करता येत नाही. असे असले तरी त्यांच्या तक्रारीची चौकशी करुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. अपीलकर्ता यांनी शास्ती करावी अशी विनंती केली आहे. परंतु माहिती दिली नाही तर शास्ती करता येते. कोणत्याही अर्जावर कार्यवाही करुन माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. अपीलकर्ता यांनी मा. न्यायालयात जाऊन किंवा मा. न्यायालयात याचिका दाखल करुन कायम स्वरुपी मनाई हुकुम उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहिल.

## आ दे श

१) अपीलकर्ता याचे अपील हे निकाली काढण्यांत येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१०००-१००२/१.९.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११६७/२०१०.**

श्री. सादिक अली रमजान अली,
नयी बस्ती, आझाद नगर, टेका,
सलाम मिठाईवाले के सामने,
नागपूर - ४४० ०१७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी, (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर.

श्रीमती संध्या पतंगे
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.९.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे फिरोज गांधी विद्यालयाचे धम्मदीपनगर, नागपूर येथे सर्व शिक्षक (५ ते १० वर्गाचे) व

... २

शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे नियुक्ती आदेश पत्राचे साक्षांकित प्रत. तसेच दिनांक १०.७.२००६ या तारखेच्या नियुक्ती आदेश पत्र अध्यक्षांचे स्वाक्षरीने दिले आहे ते कायदेशीर आहे किंवा नाही यांचे परिपत्रक (जी.आर.) मिळणेबाबत अशी माहिती मागितलेली आहे. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १३.४.२०१० रोजी शिक्षण विभाग (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २२.४.२०१० रोजी अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. दिनांक २८.६.२०१० रोजी मुख्याध्यापक, फिरोज गांधी विद्यालय, टेका नाका, नागपूर यांना शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी पत्र देऊन उपरोक्त माहिती ७ दिवसांचे आंत संबंधिताला बोलावून प्रती उपलब्ध करुन देण्यात यावी. अन्यथा दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी असे पत्र दिलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मुद्या क्रमांक १ ची माहिती मिळाली आहे व मुद्या क्रमांक २ ची माहिती मिळाली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांना तपासणी अहवाल उपलब्ध करुन दिलेला आहे. परंतु अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, तपासणी अहवाल हा ५ ते ८ पर्यंत हा एकत्रित अहवाल असतो. तसा तो न देता ८ ते १० चा तपासणी अहवाल दिलेला आहे. त्यामुळे तसा तपासणी अहवाल देणे संयुक्तिक राहील व तसे शिक्षणाधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी मान्य केले. मुद्या क्रमांक २ च्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध झाल्यानंतर उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविले आहे. परंतु अशा प्रकारचा शासन निर्णय नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले असे त्यांना कळविणे सयुक्तिक राहिल. त्यामुळे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता याचे अपील हे अंशत मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भामध्ये ५ वी ते १० वी असा एकत्रित तपासणी अहवाल प्रत उपलब्ध झाल्या नंतर विनामुल्य पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावा.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११६६/२०१०.

श्री. कृष्णा गणबाजी ठवरे,
वार्ड नं. १, ता. पारशिवनी,
जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
ग्राम पंचायत कार्यालय, पारशिवनी,
ता. पारशिवनी, जि. नागपूर.

श्री. डी. आर. पाटील,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्राम विकास अधिकारी,
ग्राम पंचायत कार्यालय, पारशिवनी,
ता. पारशिवनी, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.९.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत कार्यालय, पारशिवनी यांचेकडे माहे नोव्हेंबर २००९ च्या ग्रामसभेच्या नोटीसाची सत्यप्रत, ग्रामसभेची मुनादी दिल्याची सत्यप्रत, ग्रामसभेच्या इतिवृत्ताच्या संपूर्ण ठरावाची सत्यप्रत, ग्रामसभेत हजर असलेल्या ग्रामसभेच्या सदस्यांची संख्या अशी माहिती मागितलेली आहे. सदरची माहिती रजिस्टर पोस्टाने घेणार असे नमुद केलेले आहे. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ५.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

... २

३.   जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरहू ग्रामसभेच्या काळात सचिव श्री. एन. जे. कुंभलकर यांचेकडे ग्रामपंचायतचा चार्ज होता. त्यांचे काळातच मागितलेल्या माहिती संबंधीची ग्रामसभा घेण्यात आली. परंतु मी दिनांक २९.१२.२००९ ला ग्रामपंचायतचा चार्ज ताब्यात घेतला. चार्जमध्ये नोव्हेंबर २००९ च्या ग्रामसभेचे कोणतेही रेकॉर्ड मला ताब्यात देण्यात आले नाही. त्यामुळे मी अर्जदाराला ग्रामसभेची मागितलेली माहिती पुरवू शकलो नाही असे आयोगास सांगितले व लेखी दिलेले आहे व हीच बाब जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना काहीही कळविले नाही. त्यामुळे त्यांना प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल करावे लागले. प्रथम अपील हे पुन्हा त्यांनी ग्राम विकास अधिकारी यांचेकडेच केलेले आहे. परंतु ग्राम विकास अधिकारी यांनी प्रथम अपील कोणत्या अधिकाऱ्यांकडे करावे याबद्यल त्यांना काहीही कळविले नाही असे त्यांनी आयोगाकडे सांगितले. यावरुन विद्यमान ग्राम विकास अधिकारी सुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्याचे दृष्टिने किंवा नागरिकांना मदत करण्याच्या दृष्टिने तत्पर आहे असे दिसून येत नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## **आ दे श**

१) अपीलकर्ता याचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात काहीही कळविले नसल्यामुळे विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रुपये २५०/- शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली त्यांचे दरमहाचे वेतनातून वसूल करुन संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, पारशिवनी, जि. नागपूर यांनी लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" जमा करावे.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, पारशिवनी यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-   दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१००६-१००७/१.९.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११७१/२०१०.**

श्री. अब्दुल रज्जाक व. अब्दुल करीम,
दर्जीपूरा, के. राजन्ना टेलर्स यांचे घराजवळ,
छावनी, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. पी. भिवगडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त,
मंगळवारी झोन क्रमांक १०,
महानगरपालिका, नागपूर.

श्री. व्ही. डब्ल्यू. गभणे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता,
लोककर्म विभाग, मंगळवारी झोन नं. १०,
महानगरपालिका, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.९.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, महानगरपालिका, मंगळवारी झोन क्रमांक १०, नागपूर यांचेकडे वार्ड क्रमांक ६० मधील घर क्रमांक ६३२/अ

... २

घरमालक श्रीमती अरुणाबाई विश्वासराव देशमुख हया घराचे बांधकामाकरिता महानगरपालिका कडून परवानगी घेतलेली आहे व मंजूर नकाशाप्रमाणे सध्याचे बांधकाम आहे काय ? तसेच बांधकामाचे क्षेत्र किती आहे ? व भुखंडाचे क्षेत्रफळ किती आहे. अवैध बांधकाम असल्यास कलम ५३(१) ची नोटीस बजावली आहे काय ? सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १५.५.२०१० रोजी फक्त नांव, वार्ड क्र. आणि घर क्र. यांच्या आधारे घराचा बांधकामाचा नकाशा मंजूर आहे किंवा नाही याचा शोध घेता येत नाही. नकाशा क्रमांक आणि मंजूरीचा दिनांक उपलब्ध असल्यास आपणास अभिलेख विभागास स्वतंत्र अर्ज करुन माहिती मिळविता येऊ शकेल असे जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता (लोककर्म) महानगरपालिका, नागपूर यांनी कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १८.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २५.५.२०१० रोजी देण्यात आला त्यामध्ये अपीलकर्ता यांनी दिलेली माहिती दिनांक १५.५.२०१० रोजी ला मिळाली असे सांगितले. यावरुन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिलेली आहे. करिता अपील निकालात काढण्यात येते असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, दिनांक १५.५.२०१० च्या उत्तरामध्ये नकाशा क्रमांक आणि मंजूरीचा दिनांक उपलब्ध असल्याशिवाय माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असे सांगितले. त्यामुळे माहिती उपलब्ध झाली असे म्हणता येत नाही. तसेच नकाशा क्रमांक व मंजूरीचा दिनांक हा सर्वसाधारण लोकास कसा माहिती असेल व तो माहित असल्याशिवाय नकाशा उपलब्ध होणार नाही. अशा प्रकारचे अभिलेख जतन करण्याची कार्यपध्दती तांत्रिकदृष्टया चुकीची आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती झोनमध्ये नसते. जर झोनकडे माहिती नसते तर जनमाहिती अधिकारी यांनी महानगरपालिका हे एकच प्राधिकरण असल्यामुळे सदरचा अर्ज हा संबंधित माहिती अधिकारी (नगर रचना) हयांचेकडे हस्तांतर करणे आवश्यक होते. परंतु सदरचा अर्ज हा हस्तांतर सुध्दा केला नाही व आज मात्र आयोगापुढे सदरची माहिती ही

नगर रचना विभागाकडे उपलब्ध होईल असे सांगितले जात आहे. यावरुन सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळच करण्यात येते असे दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलाचे सुनावणीत अपीलकर्ता यांनी माहिती मिळाल्याचे समाधान व्यक्त केल्यामुळे अपील खारीज करण्यात आली. परंतु अपीलाचे निर्णयामध्ये दिनांक १५.५.२०१० ला माहिती मिळाली असे अपीलकर्ता यांनी सांगितले असा उल्लेख आहे. वर नमुद केल्याप्रमाणे दिनांक १५.५.२०१० च्या पत्राचे अवलोकन केले असता त्यात कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही तर नकाशा क्रमांक उपलब्ध झाल्यास माहिती उपलब्ध होईल असे सांगितले आहे व याबाबत माहिती मिळाली व समाधान झाले असे अपीलकर्ता सांगू शकत नाही हे सर्वसाधारण समजण्यासारखे आहे. परंतु तरीही प्रथम अपीलीय अधिकारी यांनी तसा निष्कर्ष काढून निर्णय दिलेला आहे. याचा अर्थ त्यांनी दिनांक १५.५.२०१० चे उत्तराचे अवलोकन केलेले दिसून येत नाही. म्हणजेच सुनावणी घेण्याचे एक प्रकारे नाटक केले जाते व माहिती देण्याची टाळाटाळ केली जाते असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. जनमाहिती अधिकारी मंगळवारी झोन यांचेकडे माहिती उपलब्ध नाही हे त्यांना माहिती असून सुध्दा त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे सदरचा अर्ज हस्तांतर केलेला नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळच केलेली आहे असा निष्कर्ष काढून त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रुपये २५०/- ची शास्ती लादणे संयुक्तिक राहिल. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे विरुध्द सुध्दा प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता याचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्या पासून १० दिवसांचे आंत संबंधित जनमाहिती अधिकारी (नगर रचना) यांचेकडे हया आदेशाप्रमाणे कामकाजाचे दिवशी तारीख व वेळ लेखी कळवून त्यावेळेस उपस्थित होऊन संबंधित अभिलेखाचे निरिक्षण करुन माहिती उपलब्ध असल्यास छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन घ्याव्यात.

२) जनमाहिती अधिकारी नगर रचना विभाग यांनी अपीलकर्ता यांचा लेखी अर्ज आल्यावर त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अभिलेख उपलब्ध करुन देऊन माहिती उपलब्ध असल्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी.

३) जनमाहिती अधिकारी मंगळवारी झोन क्रमांक १० यांनी सदरचा अर्ज विहित मुदतीत हस्तांतर न केल्यामुळे त्यांचे विरुध्द रुपये २५०/- शास्ती लादण्यात येते. शास्तीचे बद्यल त्यांचे म्हणणे ऐकून घेतले आहे ते समाधानकारक नाही. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहाचे वेतनातून आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांनी करावयाची असून लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावे.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११७२/२०१०.**

श्री. सुनिल जॅकब,
यीशु हाऊस, ६४०/ब, एन.आर.सी.डी.सी. कॉलोनी,
खलाशी लेन, नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. एच. गुज्जेलवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.

श्री. के. एस. देशभ्रतार,
जनमाहिती अधिकारी तथा
वसुली अधिकारी,
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.९.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१०.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा वसूली अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांचेकडे दिनांक २०.९.२००८ के आर्डर प्रती किस नियम के तहत कारवाई की गयी अथवा की जायेगी अथवा नही की गयी. अधिक्षक अभियंता तथा अपीलीय अधिकारी की आज्ञा का पालन

कितने दिनों में करना आवश्यक आहे अन्यथा नियम के अनुसार कोन कोनसी कारवाई की जा सकती है. अर्जदारको अभी तक कुछ लाभ दिया गया है अथवा नही. प्लॉट नं. २३६, २३७, २३८ संत मार्टीननगर मौजा इंदोरा, जरीपटका, नागपूर. अर्जदार द्वारा दिनांक १.१२.२००८, दिनांक २३.९.२००८, दिनांक १८.९.२००८ आदि अर्जपर किस नियम के अनुसार कारवाई की गई और की जायेगी. इस एरियामें नागपूर सुधार प्रन्यास द्वारा सभी प्लॉट धारको को जमीन का विकास कार्य का डिमांड नोट दिया गया अथवा नही व संपूर्ण A, B, C, D, E, F व अन्य एरिया में कुल प्लॉट कितने है उस सबकी माहिती हेतु नकाशा नामों की लिस्ट आदि माहिती हेतु दी जाये अशी माहिती मागितलेली दिसते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३.११.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ६.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २७.१.२०१० रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांनी कार्यालयात उपस्थित राहून धारिकेचे निरिक्षण करावे व मूळ अर्जात अभिप्रेत असलेले दस्तावेज विनामुल्य उपलब्ध करुन द्यावेत असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१.२०१० व दिनांक २२.४.२०१० ला धारिकेचे प्रत्यक्ष निरिक्षण केले व नकाशाची छायाप्रत विनामुल्य प्राप्त करण्याकरिता दिनांक २२.४.२०१० रोजी विभागीय कार्यालयात हजर झाले आणि प्राप्त केल्याची नोंद सुध्दा आहे. परंतु तरीसुध्दा अपूर्ण माहिती मिळाली या कारणास्तव आयोगापुढे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतानां असे सांगितले की, त्यांना मुद्या क्रमांक १ मध्ये मागितलेल्या माहितीच्या संदर्भात संबंधित आदेश पालनाचे बाबत माहिती मागितलेली होती परंतु त्या आदेशाचे पालन केलेले दिसून येत नाही. मुद्या क्रमांक २ मध्ये ज्या तक्रारीचा उल्लेख केलेला आहे त्या तक्रारीवर चौकशी करण्यात आली किंवा नाही तेही कळविण्यात आलेले नाही. मुद्या क्रमांक ४ च्या संदर्भामध्ये माहिती दिलेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, दिनांक २०.९.२००८ च्या आदेशाप्रमाणे नोंदणी २ वेळ करुन झालेली आहे व त्याप्रमाणे त्यांना कळविण्यात आलेले आहे. परंतु ती त्यांना मान्य नाही असा आक्षेप घेतला आहे. परंतु ते माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा विषय होत नाही. मुद्या क्रमांक

४ च्या संदर्भामध्ये निरिक्षणा अंती त्यांनी जो नकाशा उपलब्ध करुन घेतला आहे त्या नकाशामध्ये मुद्या क्रमांक ४ चे उत्तर आहे. मुद्या क्रमांक २ च्या संदर्भामध्ये त्यांच्या तक्रारीची चौकशी झालेली नाही. परंतु त्यांची तक्रार ही असंबंध आहे असे दिसून आलेले आहे. असे असले तरी त्यांच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये चौकशी करुन जो निष्कर्ष आला असेल तो निष्कर्षाचे आधारे कळविणे संयुक्तिक झाले असते व तसेच त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक ७.१०.२००९ च्या अर्जातील मुद्या क्रमांक २ मध्ये नमुद केलेल्या तक्रारीच्या संदर्भात हा निर्णय मिळाल्या पासून १० दिवसांचे आंत त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१०१२-१०१४/२.९.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११८४/२०१०.

श्री. जगन्नाथ बळवंतराव दलदले,
प्लॉट नं. १२, अयोध्यानगर बस स्टॉप,
न्यु सुभेदार रोड, गल्ली क्र. ३, नागपूर - ४४० ०२४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. संजय पवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
मौदा, जि. नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्राम पंचायत, मोहाडी, पो. गोवरी,
ता. मौदा, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.९.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मौदा यांना मोहाडी गावातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची माहिती एकूण १ ते ६ मुद्यांमध्ये

... २

मागितलेली दिसून येते व ७ ते १२ मुद्यांमध्ये रेशन दुकान परवाना संदर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाने घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगांने दिनांक १०.५.२०१० रोजी सदरची माहिती ग्रामपंचायत स्तरावर असल्यामुळे माहिती अधिकारी तथा अधिक्षक, पंचायत समिती, मौदा यांनी सचिव, ग्रामपंचायत, मोहाडी यांना १ ते ६ मुद्यांवर माहिती द्यावी असे पत्र दिले व तहसीलदार, तहसील कार्यालय, मौदा यांना ७ ते १२ मुद्यांवर माहिती द्यावी असे पत्र दिलेले आहे. अपीलकर्ता यांना दिनांक २०.११.२०१० रोजी तहसीलदार, मौदा यांचे कार्यालयातून ७ ते १२ मुद्यांवरील माहिती उपलब्ध झाली. परंतु १ ते ६ मुद्यांवरील माहिती उपलब्ध झाली नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी तहसीलदार, मौदा यांचेकडे दिनांक ११.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतु माहिती ही पंचायत समिती यांचे अखत्यारितील असल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी हे तहसीलदार नाही व त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय हा देण्यात आलेला दिसून येत नाही. त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना मुद्या क्रमांक १ ते ६ ची माहिती मिळाली नाही. परंतु अपीलकर्ता यांनीच अर्ज करतांना एकाच अर्जामध्ये २ कार्यालयातील माहिती मागितलेली आहे व तसेच ज्या कार्यालयातील माहिती मिळाली त्याच कार्यालयातील प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. माहितीचा अर्ज सुध्दा त्यांनी गट विकास अधिकारी यांचेकडे दाखल केला व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. अपीलकर्ता यांना सुध्दा अधिनियमाच्या तरतुदी लागू आहेत व त्यांनी योग्य त्या माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्ज किंवा अपील केल्यास त्यांना माहिती उपलब्ध होऊ शकते. राज्य माहिती आयोगापुढे सुध्दा अपील करतांना त्यांनी माहिती अधिकारी म्हणून (सचिव, ग्रामपंचायत, मोहाडी यांचेकडे अर्ज केलेला नाही) त्यांना पक्षकार केले व त्यांचे अपीलीय अधिकारी खंड विकास अधिकारी असून सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून तहसीलदार यांना पक्षकार केले. वास्तविक अपीलकर्ता यांचे अपील हे त्या कारणास्तव खारीज करण्यास पात्र आहे. परंतु आज सचिव, ग्रामपंचायत, मोहाडी हे हजर नाहीत. तरी सचिव, ग्रामपंचायत, मोहाडी यांना दिनांक १०.५.२०१० रोजी

हस्तांतर केलेला अर्जाप्रमाणे मुद्या क्रमांक १ ते ६ ची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. अपीलकर्ता यांनीच अर्ज व अपील हे उलटसुलट केले असल्यामुळे शास्ती लादण्याची आवश्यकता नाही. मात्र माहिती उपलब्ध करुन घेण्याकरिता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, मोहाडी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना दिनांक २८.४.२०१० च्या अर्जातील मुद्या क्रमांक १ ते ६ ची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११८१/२०१०.

श्री. बबन तुळशीराम उराडे,
तुळशीनगर, खात रोड,
भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अध्यक्ष/सचिव,
राष्ट्रीय आदर्श विद्यालय शिक्षण मंडळ,
रामटेक, जि. नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
राष्ट्रीय आदर्श विद्यालय, मनसर,
ता. रामटेक, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.९.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, राष्ट्रीय आदर्श विद्यालय, मनसर, ता. रामटेक यांचेकडे वर्ग ५ ते ८ पर्यंत शाळा सुरु करण्याची मंजूरी ज्या आदेशान्वये प्राप्त

... २

झाली त्या मंजूरी आदेशाची साक्षांकित प्रत देण्यात यावी. चौथे वेतन आयोगानुसार तसेच सुधारित वेतन वाढीनुसार डिसेंबर १९८९ पासून जानेवारी १९९२ पर्यंत श्री. बी. टी. उराडे, शारिरीक शिक्षक यांना वेतनाची थकबाकी दिलेली नाही. थकबाकी देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती द्यावी. थकबाकी दिली असल्यास त्याचा पुरावा देण्यात यावा. सन १९९१-९२ चे बोनसची रक्कम श्री. बी. टी. उराडे यांना दिलेली नाही. दिली असल्यास त्याचा पुरावा देण्यात यावा. बोनसची रक्कम देण्याबाबत केलेली कार्यवाहीची माहिती देण्यात यावी. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १४.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, आता पर्यंत काहीही माहिती किंवा पत्रव्यवहार मिळाला नाही. आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.८.२०१० रोजी आज रोजीच्या सुनावणीची नोटीस निर्गमित करण्यात आलेली आहे व ती ज्याअर्थी भंडारा जिल्हयातील अपीलकर्ता यांना मिळते त्याअर्थी नागपूर जिल्हयातील ता. रामटेक मधील राष्ट्रीय आदर्श विद्यालय, मनसर येथील मुख्याध्यापकास मिळाले असले पाहिजे असे गृहीत धरण्यात येते व त्यावरुन त्यांना संधी देण्यात आली तरी ते हजर झाले नाही व त्यांनी आयोगाचा अवमान केला आहे.

४. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी माहिती सुध्दा दिली नाही व पत्रव्यवहार सुध्दा काहीही केलेला नसल्यामुळे त्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली असल्याने त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा संस्थेचे सचिव किंवा अध्यक्ष यांनी प्रथम अपीलाची सुध्दा सुनावणी घेतली नाही किंवा निर्णय दिलेला नाही. या कारणास्तव अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे. तरी त्यांचेबाबत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांनी परवानगी काढून घेणे किंवा अनुदान कपात करण्याचे सदंर्भामध्ये शिफारस करणे आवश्यक राहिल. जेणे करुन भविष्यामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदींची संस्था अंमलबजावणी करेल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता याचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १५.४.२०१० च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे किंवा अर्जाची दखल घेतली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रुपये १००००/- शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसूली शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांनी करावयाची असून त्यांचे दरमहाचे वेतनातून वसूल करुन लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावे.

३) संस्थेचे सचिव किंवा अध्यक्ष यांनी प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून प्रथम अपीलाचा निर्णय दिला नसल्यामुळे अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले असल्यामुळे शाळेची परवानगी काढून घेणेबाबत किंवा अनुदान कपातीचे संदर्भामध्ये शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांनी शासनाकडे शिफारस करण्यात यावी.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत **<u>शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर</u>** यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११८२/२०१०.**

श्री. बबन तुळशीराम उराडे,
तुळशीनगर, खात रोड,
भंडारा. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

श्रीमती एस. जी. पतंगे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.९.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे नागपूर जिल्हयातील बिना अनुदानित मान्यता प्राप्त माध्यमिक शाळेतील

शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीस मान्यता (अप्रुवल) देण्याची कार्यवाही ज्या वर्षापासून सुरु करण्यात आली त्याची माहिती देण्यात यावी. ज्या शैक्षणिक वर्षापासून बिना अनुदानित मान्यता प्राप्त माध्यमिक शाळेतील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना आपले कार्यालयाकडून मान्यता प्रदान करण्यात आली असा कोणत्याही एका शाळेच्या कर्मचाऱ्यांना प्रदान केलेल्या मान्यता पत्राची प्रत देण्यात यावी अशी माहिती मागितलेली दिसते. सदरची माहिती सर्वसाधारण टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १५.६.२०१० रोजी प्रथम अपील पुन्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे दाखल केले व प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांचेकडे ते वारंवार गेले परंतु त्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली व प्रथम अपीलाची नोटीसही त्यांना २ महिन्यानंतर उपलब्ध झाली व त्यामुळे प्रथम अपीलाचे सुनावणीस ते हजर राहू शकले नाही. तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी अर्जाची दखल घेतली नाही व कोणताही पत्रव्यवहार केला नसल्यामुळे, माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा खुलासा करतांना अपीलकर्ता हे हजर झाले नाही म्हणून सुनावणी घेतली नाही असा जो खुलासा सादर केलेला आहे त्याबद्यल अपीलकर्ता यांनी सुनावणीचे पत्र त्यांना २ महिन्याचे नंतर मिळाले असे आयोगाचे निदर्शनास आणले. परंतु अपीलकर्ता हजर झाले नाही तर माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे पहाण्याची जबाबदारी प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांची असल्यामुळे त्यांनी जनमाहिती अधिकारी यांना विचारणे आवश्यक होते. परंतु तसे त्यांनी विचारलेले दिसत नाही. माहिती अधिकारी यांना अधिनियमाच्या तरतुदीची काहीही माहिती दिसून येत नाही व माहिती करुन घेण्याची त्यांना आवश्यकता वाटत नाही. अपीलकर्ता यांनी जर प्रथम अपीलात माहिती उपलब्ध झाली नाही असे कारण दिलेले असेल तर पुन्हा अपीलकर्ता यांना काय विचारणार त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे असाच निष्कर्ष काढावा लागतो. अधिकारी व जावक लिपिक हे

एकच कार्यालयाचा भाग आहे. त्यामुळे जावक लिपिक यांनी विलंबाने पत्र निर्गमित केले ती जबाबदारी विभाग प्रमुखांची आहे त्यामुळे विभाग प्रमुखांनी जावक लिपिका विरुध्द कार्यवाही करणे आवश्यक असते. परंतु शिक्षणाधिकारी हे आयोगापुढे हजर होत नाही व लिपिकांना पाठवितात त्यामुळे यापुढे वारंट काढण्यात येतील याची त्यांनी नोंद घ्यावी. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता याचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ७.४.२०१० च्या अर्जाप्रमाणे विनामुल्य रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास विद्यमान जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.

२) तत्कालीन जनमाहिती अधिकारी शिक्षणाधिकारी कार्यालय (माध्यमिक) यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ७.४.२०१० च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रुपये १००००/- शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांनी करावयाची असून "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावे.

३) **शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर** यांचेकडे निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पुढील कार्यवाहीसाठी पोस्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-       दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११९३/२०१०.

श्री. विलास देविदास खोंड,
प्लॉट नं. ४६, महात्मा गांधी नगर,
म्हाळगीनगर, रिंगरोड चौक, नागपूर - ४४० ०२४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्रीमती एस. एस. हळवे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक व्यवस्थापक,
अधिक्षक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित,
शहर प्रविभाग, प्रकाश भवन, लिंक रोड,
सदर, नागपूर - ४४० ००१.

श्री. डी. एम. मानकर,
जनमाहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित,
शहर प्रविभाग, प्रकाश भवन, लिंक रोड,
सदर, नागपूर - ४४० ००१. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.९.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ४.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

... २

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.८.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी, शहर प्रविभाग, प्रकाश भवन, सदर, नागपूर यांचेकडे चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या जेष्ठता, बढती, बदली बाबत एकूण ६ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २०.८.२००९ रोजी एकूण ६ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दिनांक २३.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही. परंतु अपीलकर्ता यांना दिनांक १५.१०.२००९ रोजी एकूण ५ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ७.८.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील हे १० महिने विलंबाने दाखल केले आहे व विलंब माफ करण्याबद्यल कोणत्याही प्रकारचा खुलासा केला नाही किंवा युक्तिवादात त्यांनी तसे सांगितले नाही. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे संदर्भात माहिती मिळाली किंवा नाही असे विचारले असता त्यांना अद्यापपर्यंत काहीही माहिती मिळाली नाही असे सांगितले. प्रथम अपीलाचे नंतरही माहिती मिळाली नाही असे सांगितले. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक २०.८.२००९ रोजी तारीख असेलेले माहितीचे पत्र दिनांक २४.८.२००९ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहे. प्रथम अपीलाची मात्र सुनावणी घेण्यात आलेली नाही व आज प्रथम अपीलीय अधिकारी सुध्दा हजर नाही व त्यामुळे त्यांना अधिनियमाचे तरतुदीबद्यल गांभीर्य आहे असे दिसून येत नाही. दिनांक १५.१०.२००९ रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती जनमाहिती अधिकारी यांनीच उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचा अपीलाचा निर्णय दिसून येत नाही. अर्जदारास जी माहिती पाठविली ती प्राप्त झाली आहे व त्याची पोच सुध्दा आहे. तरीसुध्दा अपीलकर्ता यांनी माहिती प्राप्त झाली नाही असे आयोगापुढे सांगितले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय द्यावयाचा असतो व प्रथम अपीलाचा निर्णय हा प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कार्यालयातून निर्गमित करावयाचा असतो याबद्यलची माहिती प्रथम अपीलीय अधिकारी यांना दिसून येत नाही. त्यांनी अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले दिसून येते. त्याबाबत त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही होणे आवश्यक आहे. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## **<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता याचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१०२४-१०२६/४.९.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११९४/२०१०.

श्री. संजय महेंद्रकुमार जैन,
परवारपुरा, इतवारी जैन मंदीर जवळ,
नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. किशोर ए. जाधव,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपायुक्त,
परिमंडळ क्रमांक ३, नागपूर.

श्री. डॉ. सुर्यभान ग. इंगळे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लकडगंज विभाग, नागपूर शहर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.९.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ४.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा पोलीस अधिकारी, नागपूर यांचेकडे अर्जदार यांनी केस नं. १७/०३ संजय विरुध्द ग्यानचंद व इतर या केसचा कोर्ट नं. ३ ज्यु.मॅ.साहेब वर्ग

१ ला यांनी U/S २०२ चौकशी अहवाल मागितला त्याचा अहवाल २४.४.२००३ रोजी कोर्टात पेश केला त्या अहवाल रिपोर्ट व लावलेले कागदपत्र यांची प्रत देण्यात यावी. तसेच कोर्टात वाटणी पत्राची प्रत जोडली आहे त्याची कॉपी पाहिजे आहे अशी माहिती मागितलेली दिसते. (अपीलकर्ता यांनी निश्चित असा कोणत्याही माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केलेला नाही. तसेच अर्जावर तारीख सुध्दा दिलेली नाही. वरील तारीख ही कागदपत्रावरुन काढण्यात आलेली आहे) सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १०.३.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १३.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १०.५.२०१० रोजी देण्यात आलेला असून जनमाहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिलेली आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय सुध्दा योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता याचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१०२७-१०२८/४.९.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०५७/२०१०.**

श्री. मो. नईमुद्दीन कमरुद्दीन,
मराठा तेलीपूरा, नागोबा मंदीर के पास,
बजरिया, नागपूर - ४४० ०१८. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभाग नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,
रेल्वे स्टेशन रोड, नागपूर.

श्री. जे. आर. आंभोरे,
जनमाहिती अधिकारी तथा
विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी,
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,
रेल्वे स्टेशन रोड, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.९.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २९.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची पुढील सुनावणी आज दिनांक ४.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे दिनांक १६.८.२०१० रोजी हजर होते त्यांचे म्हणणे ऐकून घेतले आहे. उत्तरवादी यांनी मुदत मिळण्याची विनंती केली होती ती मान्य केली असल्यामुळे आज त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आज माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. व्ही. टी. गव्हाळे, प्रभारी विभाग नियंत्रक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, रेल्वे स्टेशन रोड, नागपूर यांचेकडे किती कर्मचाऱ्याला कोर्टाचा आदेश प्रमाणे १८० दिवसाचा ऐरिअस देण्यात आला आहे. कोर्टात गेल्या शिवाय १८० दिवसाचा लाभ कर्मचारीला मिळणार नाही कां ? असा सरक्युलर आला आहे का ? ग्रेज्युटीसाठी कोर्टात न जाता आता सर्व कर्मचाऱ्याला डेलीविजेस पासून ग्रेज्युटी देण्यात येत आहे. तसेच १८० दिवसासाठी देण्यात यावा. असा केल्यावर कर्मचारी व प्रशासनाचा बराच खर्च वाचेल व कर्मचारीला न्याय लवकर मिळेल. टपालाद्वारा माझे पत्तेवर उत्तर देण्यात यावा असे नमुद केलेले आहे. अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक ५.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २६.६.२०१० रोजी देण्यात आलेला असून अपील अंशतः मंजूर करण्यात आलेले दिसून येते. त्यामध्ये अर्जदाराला सुचविल्याप्रमाणे फरकाची योग्य ती रक्कम अर्जदार यांनी राज्य विभागीय कार्यालयात भरावी व त्याची रशीद दाखविल्यावर माहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती दोन दिवसाची आत पुरवावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना माहिती ही विलंबाने प्राप्त झाली. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दिनांक ३.५.२०१० रोजी विहित मुदतीमध्ये आपण मागितलेली माहिती संकलित करुन इतर शाखेकडून प्राप्त झाल्यावर आपणास लवकरात लवकर कळविण्यांत येईल असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक ९.६.२०१० रोजी म्हणजे प्रथम अपील दाखल झाल्यानंतर अपीलकर्ता यांना माहितीचा खर्च रुपये ९/- येईल याचा भरणा करावा व संबंधित माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे अपीलकर्ता यांना कळविलेले आहे व त्यानंतर अपीलकर्ता यांना दिनांक २२.६.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यानंतर दिनांक २५.६.२०१० रोजी सुध्दा परिपत्रक क्रमांक ४८५६ ची झेरॉक्स प्रत सुध्दा उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये मात्र अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलाची २०/- रुपये कोर्ट फी ही न लावता १०/- रुपये कोर्ट फी स्टॅम्प लावला

असल्यामुळे फी अपूर्ण भरली होती. प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये अपीलकर्ता यांना वेळोवेळी पत्र दिले असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. परंतु सर्व पत्रे ही विलंबाने दिली आहेत. त्याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, सदरची माहिती पर्सनल विभाग व लेखा विभाग या २ विभागातील आहे व या २ विभागातील माहिती उपलब्ध करुन घ्यावयाची असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेला आहे. वास्तविक पर्सनल विभाग हा त्यांचा स्वतःचाच विभाग आहे व लेखा विभागाकडून त्यांना माहिती उपलब्ध करुन घ्यावयाची होती. परंतु लेखा विभाग यांनी अपीलकर्ता यांना २२.६.२०१० ला कळविले आहे याचा अर्थ विलंबाने लेखा विभागाने कळविलेले आहे. तसेच अपीलकर्ता यांना जे उत्तर दिले आहे ते अतिशय निष्काळजीपणाचे व अधिनियमाचे तरतुदीची काहीही माहिती नाही व माहिती असली तरी ते बेफीकीरपणाचे उत्तर दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे अर्ज हस्तांतर हे पहिल्या ५ दिवसांत करावयाचा असतो व त्यानंतर अभिलेख खर्चाचे पत्र सुध्दा मुदतीत देऊन माहिती विहित मुदतीत म्हणजे ३० दिवसांत उपलब्ध झाली पाहिजे अशी तरतुद आहे. परंतु सदरच्या प्रकरणामध्ये जनमाहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांना योग्य वाटेल त्यावेळेस प्रक्रिया केलेली दिसून येते. त्यामुळे ती माहिती विलंबाने उपलब्ध झालेली आहे असेच दिसून येते. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी समज दिलेली आहे. यावरुन जनमाहिती अधिकारी यांनी अधिनियमाचे तरतुदीचे पालन केलेले नाही हे स्पष्ट दिसून येते. त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाचे कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. जेणे करुन भविष्यात माहितीच्या अर्जाची दखल ताबडतोब घेण्यात येईल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## **<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत २००९ च्या परिपत्रकाची प्रत उपलब्ध असल्यास विनामुल्य देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक १३.४.२०१० च्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत प्रक्रिया केली नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरच्या शिस्तभंगाची कार्यवाही ही प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, गणेशपेठ, नागपूर यांनी करावयाची आहे.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत **<u>प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, गणेशपेठ, नागपूर</u>** यांना पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

४)अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१०२९-१०३२/४.९.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२१२/२०१०.

श्री. गिरीधर पांडुरंग वानखेडे,
समता कॉलनी, टिळक नगर,
ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्रीमती गिता वंजारी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, ब्रम्हपूरी,
जि. चंद्रपूर.

श्री. निरंजन निलकंठ मालोदे,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रभारी वरिष्ठ लिपिक,
नगर परिषद, ब्रम्हपूरी,
जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.९.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ६.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, ब्रम्हपूरी यांचेकडे मा. जिल्हाधिकारी यांचे कार्यालयातील पत्र दिनांक २८.८.२००८ व दिनांक १२.९.२००८

... २

अन्वये आपणांस सविस्तर अहवाल सादर करण्याकरिता कळविण्यात आलेले असून सुध्दा अद्यापपावेतो आपणाकडील अहवाल अप्राप्त आहे. त्या अनुषंगाने श्री. पी. बी. काळभोर, जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे कार्यालयीन अ.शा.प. दिनांक ९.४.२०१० संदर्भांकित पत्रानुसार आपणास विषयाबाबतचा सविस्तर अहवाल आपल्या अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रासह ७ दिवसांचे आंत त्यांच्या कार्यालयात सादर करण्याविषयी कळविण्यात आलेले होते. त्यानुसार आपणाकडून केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल आपल्या अभिप्रायासह मा. पी. बी. काळभोर, जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना सादर केलेल्या कार्यवाहीची प्रमाणित प्रत अर्जदारास त्वरित देण्याची कृपा करावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः शिघ्र, तारीख व वेळ देण्यात यावी असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांनी माहितीचे शुल्क रुपये १८/- चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते व त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १५.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २९.७.२०१० रोजी दिलेला असून तत्कालीन मुख्याधिकारी तथा अपीलीय अधिकारी श्री. संतोष माहाले यांचे उपरोक्त आदेशान्वये श्री. जे. पी. बेंदरे, तांत्रिक सहाय्यक यांचेकडून माहिती मागविण्यात आली व ती माहिती पुढील कार्यवाहीसाठी मा.जिल्हाधिकारी यांचेकडे दिनांक २९.७.२०१० ला पाठविण्यात आली. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, राज्य माहिती आयोगाने शिस्तभंगाचे कार्यवाहीचे आदेश दिले होते. परंतु सदरच्या शिस्तभंगाची अंमलबजावणी झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी जिल्हाधिकारी यांचे कार्यालयाकडून त्या कार्यवाहीच्या संदर्भामध्ये कागदपत्रे मागितली होती व त्यासंदर्भामध्ये काय अहवाल पाठविण्यात आला ती माहिती त्यांना अपेक्षित होती. परंतु अशा प्रकारचा अहवाल कार्यालयात उपलब्ध नाही असे पुर्वी सुध्दा त्यांना कळविलेले असल्यामुळे त्यांनी माहितीच्या अर्जामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरच्या शास्तीची अंमलबजावणी करण्याकरिता संबंधित शास्ती ही मुख्याधिकारी यांचे संदर्भातच असल्यामुळे विद्यमान

मुख्याधिकारी यांनी अहवाल करणे योग्य नव्हते. कारण मुख्याधिकारी हे पुर्वीच्या मुख्याधिकाऱ्यांकरिता कार्यवाही करण्यासाठी सक्षम नाही. त्यामुळे मा. जिल्हाधिकारी यांचे पत्राप्रमाणे श्री. वानखेडे यांचे संदर्भातील उपलब्ध कागदपत्रे ही जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात आली. त्यात कोणत्याही प्रकारचा अहवाल तयार करण्यात आलेला नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती दिली आहे ती योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. अपीलकर्ता यांना शिस्तभंगाचे कार्यवाहीचा पाठपुरावा करावयाचा असल्यास त्यांनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे कार्यालयास माहिती विचारणे संयुक्तिक राहिल.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१०३३-१०३५/६.९.२०१०

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२१६/२०१०.

सौ. ज्योती गौतम वानखेडे,
३१, झाडे ले आऊट, जयताळा,
नागपूर. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी,
चंद्रपूर.

श्रीमती एस. एस. निखारे,
जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हा खनिकर्म अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,
चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.९.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक १२.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ६.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती हे गैरहजर आहेत व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. के. व्ही. घाटगे, अव्वल कारकून हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक ३०.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी, चंद्रपूर यांचेकडे श्री. गौतम तुकाराम वानखेडे यांच्याबाबत सहाव्या वेतन प्रमाणे वेतनाची माहिती तसेच

... २

सेवानिवृत्ती संदर्भातील माहिती एकूण ९ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १९.४.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ती यांनी दिनांक २५.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २२.६.२०१० रोजी देण्यात आलेला असून अपीलार्थीस पाहिजे असलेली माहिती जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी, चंद्रपूर यांनी स्वतः लक्ष देऊन संबंधित कार्यालयाकडून मागावून ७ दिवसांचे आंत तात्काळ विनामुल्य पुरविण्यांत यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतर अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ती यांचा दिनांक ३०.३.२०१० रोजीच्या अर्जाची माहिती ही दिनांक १९.४.२०१० रोजी देण्यात आली. परंतु अपीलकर्ती यांना पुन्हा दिनांक २८.४.२०१० रोजी माहितीचा अर्ज दाखल केला. परंतु त्या अर्जाचे संदर्भामध्ये त्यांनी प्रथम अपील दाखल केलेले आहे. दिनांक ३०.४.२०१० च्या अर्जाप्रमाणे मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांनी प्रथम अपील दाखल केलेले नाही व द्वितीय अपील दाखल केले नाही. सदरच्या आयोगाच्यापुढे असलेल्या नस्तीमध्ये सुध्दा दिनांक १०.४.२०१० चा अर्ज नाही त्यामुळे अपीलकर्ती यांचा दिनांक ३०.४.२०१०, दिनांक १.४.२०१० च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१०३६-१०३७/६.९.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२११/२०१०.

श्री. गिरीश मोरेश्वर खोरगडे,
६९२, श्री निवास, गितानगर, झिंगाबाई टाकळी,
I/F/O भारतीय कृषी विद्यालय, नागपूर - ४४० ०३०. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

श्रीमती पतंगे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.९.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ६.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे प्रागतीक अध्यापक शिक्षण संस्था, नागपूर द्वारा संचालित प्रागतिक माध्यमिक विद्यालय, विद्युत विहार, कोराडी, तालुका कामठी, जिल्हा नागपूर येथील पदाकरिता मंजूरी आदेश दिनांक ८.१.२०१० रोजी

काढण्यात आला त्याची प्रमाणित प्रत देण्यात यावी. सदर आदेशातील पद कोणत्या जातीकरिता राखीव ठेवण्यात आले होते. कोणत्या तरतुदी अंतर्गत सदर पद दोन जातीच्या (एस.टी. किंवा एन.टी.) उमेदवाराकरिता राखीव ठेवण्यात आले. सदर माहिती देत पर्यंत वरील उल्लेख केलेल्या शाळेत कोणत्या जातीच्या उमेदवाराची नेमणूक करण्यात आली. नेमणूक करण्याची प्रक्रिया/पध्दत कोणती आहे व ती योग्यरित्या पाळण्यात आली काय ? सदरच्या अर्जाचे अनुषंगाने मुद्या क्रमांक १ ची माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु मुद्या क्रमांक २ ते ५ पर्यंतची माहिती शाळा संस्था स्तरावरील असल्यामुळे संबंधित मुख्याध्यापक यांनी माहिती दिलेली आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १५.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये अपीलकर्ता व मुख्याध्यापक यांना सुनावणीस उपस्थित राहण्यास कळविण्यात आले होते व त्यांचेकडून मुद्या क्रमांक २ ते ५ ची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. मात्र त्यामध्ये माहिती उपलब्ध झालेली आहे किंवा नाही याबद्यल काहीही नमुद केलेले नाही.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक १ ची माहिती उपलब्ध करुन दिलेली होती. मुद्या क्रमांक २ ते ५ ची माहिती शाळा संस्था स्तरावरील असल्यामुळे मुख्याध्यापक यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे असे सांगितले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१०३८-१०३९/६.९.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२१४/२०१०.**

श्री. खुशाल विश्वनाथ ठलाल,
SF ८/२, उर्जानगर, चंद्रपूर - ४४२ ४०४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,
द्वारा - समाज कल्याण अधिकारी कार्यालय,
चंद्रपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,
द्वारा - समाज कल्याण अधिकारी कार्यालय,
चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.९.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ६.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. माहिती अधिकारी हे गैरहजर असून त्यांचे तर्फे श्री. संजय देवकाते, जनसंपर्क अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.३.२०१० रोजी माहिती अधिकारी तथा विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, नागपूर विभाग, जि. चंद्रपूर यांचेकडे जात पडताळणी संदर्भातील श्री. गजानन रुधा रायपूरे

... २

यांचेबाबतची तसेच त्यांचे अर्जावरील कार्यवाही माहिती व संबंधित कागदपत्राबाबत एकूण ४ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी माहिती आयुक्त, नागपूर यांना निवेदन दिले असून त्यात संबंधित कार्यालयानी माहिती पुरविल्यामुळे माझा संबंधित कार्यालयाशी तक्रार राहिलेली नाही. सबब मी सुनावणीस हजर राहणार नाही. आपल्या कार्यालयाचा मी कृतज्ञ आहे. जय हो माहिती अधिकार असे लेखी दिले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२२१/२०१० व अपील क्रमांक १२२२/२०१०.

श्री. विजय झुंगरुजी नगराळे,
मालविय वार्ड, वरोरा रेल्वे पुलाजवळ,
ता. वरोरा, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम. एम. शहा,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, वरोरा, जि. चंद्रपूर.

श्री. वाय. टी. देवतळे,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रशासन अधिकारी (शिक्षण)
नगर परिषद, वरोरा, जि. चंद्रपूर.

श्री. ग. भ. डोईफोडे,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रशासन विभाग,
नगर परिषद, वरोरा, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.९.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ७.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ७.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षण विभाग, नगर परिषद, वरोरा व मुख्याधिकारी, नगर परिषद, वरोरा यांचे कार्यालयात माहितीचा अधिकार कायदा २००५ चे कलम

... २

४(१) (घ) अन्वये माहिती तसेच सौ. विमल नगराळे यांनी सेवेतून निवृत्त होण्यापूर्वी दिनांक २९.४.२०१० चे पत्रान्वये कार्यालयास लिहिलेल्या पत्रास अद्यापि उत्तर का देण्यात आलेले नाही. अशाच प्रकारे एकूण १२ मुद्यांच्या संदर्भात त्यांच्या सौभाग्यवतीच्या संदर्भात वेगवेगळया मुद्यांवर कारणे विचारली आहेत. तसेच नगरपरिषदे मध्ये दिनांक १.४.२००६ ते दिनांक ३१.३.२०१० पर्यंत शासनाकडून कोणकोणती अनुदान प्राप्त झालेत आणि प्रत्येक वित्तीय वर्षात, प्रत्येक कामावर एकूण किती खर्च झाला अशा प्रकारची माहिती ३ मुद्यांमध्ये तपशीलात मागितलेली आहे. अर्जाचे अनुषंगाने अनुक्रमे दिनांक १९.६.२०१० रोजी त्यांनी मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असून जनमाहिती अधिकारी यांचे मत मागितलेले आहे. माहितीच्या अधिकाराखाली आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती पुरविण्याचा अधिकार आहे. तसेच मागितलेल्या माहितीचा अर्थबोध होत नसल्यामुळे कार्यालयात येऊन स्पष्टीकरण द्यावे व दस्तऐवजामधून माहिती अवगत करावी असे त्यांना कळविलेले दिसून येते. परंतु त्यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २२.६.२०१० रोजी दोन प्रथम अपीले दाखल केली. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १९.७.२०१० रोजी देण्यात आलेला असून ती खारीज करण्यात आलेली आहेत व दुसऱ्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २६.७.२०१० रोजी देण्यात आलेला असून प्रथम अपील अंशत: मान्य करुन अपीलार्थीना आवश्यक असलेली माहिती त्यांनी कार्यालयात येऊन उपलब्ध करुन घ्यावी अशा प्रकारे आदेश दिलेला आहे व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत.

३. दोन्ही द्वितीय अपीलाची सुनावणी घेतली असतांना अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सागितले की, त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या अपील क्रमांक १२२१/२०१० मध्ये जी माहिती त्यांनी दिनांक २१.५.२०१० च्या अर्जात मागितली ती त्यांच्या पत्नीच्या संदर्भामध्ये असून त्यांनी प्रत्येक मुद्यांमध्ये कारणे मागितलेली आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे एखाद्या प्रक्रियेतील निर्णय प्रक्रियाबाबत जनमाहिती अधिकारी यांचे मत मागता येत नाही. त्यामुळे त्यांना तसे कळविण्यात आले आहे व त्याच कारणावरुन प्रथम अपील खारीज करण्यात आलेले आहे. अपील क्रमांक १२२२/२०१० मधील अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती एकूण ५ विषयांची माहिती असून अतिशय व्यापक प्रमाणातील माहिती आहे.

नगर परिषदेच्या कामकाजामध्ये अनेक प्रकारचे अनुदान प्राप्त होत असतात व तो अनुदान खर्च हा त्या त्या प्रकल्पावर खर्च होत असतो व त्या सर्व अनुदानाची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे हे अशक्यप्राय आहे व त्यातही अपीलकर्ता यांनी ही माहिती तयार करुन मागितलेली आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे "माहिती" या संज्ञेच्या व्याख्येमध्ये व "माहितीचा अधिकार" या संज्ञेच्या व्याख्येमध्ये माहिती ही साहित्याच्या स्वरुपात म्हणजे कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध असते व त्यांची पाहणी करुन त्यातून छायांकित प्रती उपलब्ध करुन देता येतात व त्यामुळेच अतिशय व्यापक प्रमाणात माहिती मागितलेली असल्यामुळे सदरची माहिती ही संकलीत करणे सुध्दा किंवा अपीलकर्ता यांना उपलब्ध करण्यासाठी नगरपरिषेच्या व्यक्तिंना प्रमाणाबाहेर वळवावी लागेल व प्रत्यक्ष संख्या सुध्दा ५०,००० च्यावर जाईल असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. वास्तविक अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली त्यात कोणतेही सार्वजनिक व्यापक हित दिसून येत नसून त्यांचे पत्नीच्या सेवेच्या व निवृत्तीच्या संदर्भामध्ये त्यांना कार्यवाही करुन पाहिजे असल्यामुळे त्यांनी नगर परिषद प्रशासनास वेठीस धरले आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे. त्यामुळे अशा प्रकारे व्यापक प्रमाणात असंबंध अशी माहिती मागितलेली आहे असे दिसून येते. त्यामुळे सदरची दोन्ही अपीले ही खारीज करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांची दोन्ही अपीले ही खारीज करण्यात येतात.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१०४२-१०४४/७.९.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२२४/२०१०.

श्री. राम आखरे,
संत कृपा ३०, साई कृपा सोसायटी,
नरेंद्रनगर, नागपूर - ४४० ०१५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा कृषी अधिक्षक,
बुलढाणा.

जनमाहिती अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी,
ता. शेगांव, जि. बुलढाणा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.९.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ७.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. माहिती अधिकारी हे गैरहजर असून त्यांचे तर्फे श्री. शुक्ला, कृषी अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, शेगांव, जि. बुलढाणा यांचेकडे अ) शेगांव तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी सन २००९-२०१० या आर्थीक वर्षात शेततळयासाठी शासनाने किती अनुदान मंजूर केले. ब) सन २००९-२०१० मध्ये शेततळयांसाठी दिलेल्या

... २

अनुदानाची गाव निहाय अर्जदाराच्या नावासहित माहिती देण्यात यावी. क) तालुक्यातील सन २००९-२०१० मध्ये एकूण किती शेतकऱ्यांचे शेततळयासाठी अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी किती अर्ज मंजूर झाले व किती नामंजूर झाले. त्यांच्या नावासहीत गाव निहाय माहिती देण्यात यावी. ड) शेततळे मंजूर झालेल्या शेतकऱ्यांना शासन निर्णय प्रमाणे कोणते निकष लावण्यात आले. याविषयी संबंधित शासन निर्णयाची प्रमाणित प्रत देण्यात यावी. इ) सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात रामराव प्रल्हाद आखरे, रा. पहुजिरा या नावाने आपल्या कार्यालयात अर्ज केलेला होता. त्या अर्जाची प्रमाणित प्रत देण्यात यावी. च) वरील अर्जाच्या अनुषंगाने आपल्या कार्यालयातून जिल्हा कार्यालयाकडे पाठविलेल्या शेतातील निरिक्षण अहवालाची प्रमाणित प्रत देण्यात यावी. ज) वरील अर्ज कोणत्या कारणास्तव नामंजूर झाला त्याची माहिती देण्यात यावी. सदरची माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १४.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी दिनांक १४.५.२०१० च्या अर्जाप्रमाणे जी माहिती मागितलेली आहे ती माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही. तसेच अर्जाची दखल सुध्दा घेण्यात आलेली नाही. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा देण्यात आलेला नाही व त्यामुळेच मला द्वितीय अपील दाखल करावे लागले. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा अर्ज दिनांक २५.५.२०१० रोजी प्राप्त झाला. त्यावेळेसचे जनमाहिती अधिकारी यांची बदली झाली आहे. परंतु विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी नस्तीमध्ये दिनांक १८.६.२०१० रोजी मागितलेल्या माहितीकरिता अतिरिक्त खर्चाचा भरणा करावा असे पत्र दिलेले आहे. ते पत्र त्यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. परंतु त्याबाबत कागदपत्रे दाखल केली नाही. तसेच सदरचे पत्र निर्गमित केले आहे किंवा नाही याबाबत जावक नोंदवहीचा पुरावा सुध्दा दाखल केलेला नाही व तसेच अपीलकर्ता यांनी सदरचे पत्र मिळालेले नाही असे अपीलकर्ता यांनी आयोगाकडे सांगितले व त्यामुळे विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी जरी आयोगाचे निदर्शनास दिनांक १८.६.२०१० चे पत्र आणले असले तरी ते निर्गमित केल्याचा पुरावा सादर केलेला नसल्यामुळे व ते अपीलकर्ता यांना मिळाले नसल्यामुळे ते गृहीत धरता येत नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला

नाही. त्यामुळे त्यांनी अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे. तसेच शासन निर्णयाचे सुध्दा उल्लंघन केले त्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी ३० दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे ते दोषी आढळून येतात अशी आयोगाची खात्री झालेली आहे. त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु अधिनियमाचे कलम २०(१) च्या परंतुकाप्रमाणे शास्ती लादण्यापूर्वी जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक असल्यामुळे व ते आज आयोगापुढे हजर नसल्यामुळे त्यांना त्याबाबत कारणे दाखवा नोटीस काढणे आवश्यक आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही व तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द शास्ती लावणे आवश्यक असल्यामुळे सदरचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दिनांक १४.५.२०१० च्या अर्जाचे अनुषंगाने मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, शेगांव यांनी अपीलकर्ता यांच्या दिनांक १४.५.२०१० च्या अर्जाचे अनुषंगाने अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे विहित मुदतीत म्हणजे ३० दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे व अर्जाची दखल सुध्दा घेतली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रुपये १००००/- शास्ती कां लादण्यात येऊ नये याबद्यलचा खुलासा तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाकडे करावा. तसे न केल्यास सदरची शास्ती कायम होईल याची नोंद घ्यावी.

३) विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांना सदरच्या निर्णयाची प्रत अवगत करावी व तसे न केल्यास विद्यमान जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे व अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले असल्यामुळे त्यांचे विरुध्द जिल्हा कृषी अधिकारी, बुलढाणा यांनी योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१०४५-१०४८/७.९.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२२७/२०१०.

श्री. राजू पांडूरंग चांदेकर,
बबीना अशोक रामटेके,
गोलबाजार, वार्ड नं. ५, खापरखेडा,
ता. सावनेर, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. विरेंद्रसींह रामकुवरसींह बैस,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सचिव,
माधूरीताई देशमुख शिक्षण एवम् सामाजिक संस्था,
विद्याभवन, कामाक्षी नगर, मिलन चौक, चनकापूर,
पो. खापरखेडा, ता. सावनेर, जि. नागपूर.

श्री. प्रविण नत्थुजी गेडाम,
जनमाहिती अधिकारी तथा
प्राचार्य,
इंदिरा अध्यापक विद्यालय, विद्याभवन,
कामाक्षी नगर, मिलन चौक, चनकापूर,
पो. खापरखेडा, ता. सावनेर, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.९.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ७.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. अपीलकर्ता यांचे नावासमोर दुसऱ्याने सदर सही केली आहे व युक्तिवाद करतांना आणखी ३ व्यक्ती आलेले आहेत ते म्हणतात वकील आहेत पण वकीलपत्र दाखल केले नाही. उत्तरवादी हे हजर आहेत.

... २

२.	अपीलकर्ता यांनी दिनांक ४.५.२०१० रोजी माहिती अधिकारी तथा प्राचार्य, इंदिरा अध्यापक विद्यालय, खापरखेडा यांचेकडे पुर्वीपासून ते २०१० पर्यंत इमारत बांधकामाची खर्चाचे एकूण बिले व जोडपत्र अ मध्ये एकूण १२ मुद्यांची माहिती मागितलेली आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २५.५.२०१० रोजी प्राचार्य यांनी अपीलकर्ता यांना मा. मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाच्या दिनांक २०.८.२००९ च्या आदेशान्वये विनाअनुदानित संस्थेस/विद्यालयास माहिती अधिकार अधिनियम लागू होत नाही असे कळविले असून तक्रार अर्जाचे संदर्भात सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १६.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक ३.७.२०१० रोजी संस्थेचे सचिव यांनी अपील खारीज केलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३.	अपीलकर्ता गैरहजर आहेत. अपीलकर्ता तर्फे एक व्यक्ती वकील म्हणून हजर झाले. परंतु त्यांनी वकीलपत्र दाखल केले नाही. युक्तिवाद करतांना असे सांगितले की, केंद्रीय माहिती आयोगाच्या पूर्ण खंडपीठाच्या निकालामुळे सरकारकडून अनुदान घेणाऱ्या आणि न घेणाऱ्या खासगी शिक्षण संस्थाही माहिती अधिकाराच्या कक्षेत येणार असा निर्णय दिलेला असल्यामुळे सर्व विनाअनुदानित शिक्षण संस्थांना सुध्दा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागू होतात असे त्यांनी युक्तिवाद केला. वास्तविक सदरची व्यक्ति ही अधिवक्ता आहे असे त्यांनी सांगितले. त्यामुळे मा. मुंबई, उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ यांच्या निर्णयाची माहिती त्यांना देण्यात आली होती. सोबत याचिका क्रमांक ५१३२/२००८ च्या निर्णयाची प्रत सुध्दा त्यांना देण्यात आली होती. परंतु तरी सुध्दा केंद्रीय माहिती आयोगाचा निर्णय हा लागू होतो असा युक्तिवाद त्यांनी केला. केंद्रीय माहितीचा आयोग हाच राज्य माहिती आयोगाचा वरिष्ठ आयोग नाही. दोन्ही आयोग हे स्वतंत्र आहेत. त्यामुळे केंद्रीय माहिती आयोग हा केंद्र शासनाच्या अखत्यारित असल्यामुळे केंद्रास लागू होतो. राज्यातील संस्थांना लागू होत नाही किंवा राज्य माहिती आयोगास सुध्दा बंधनकारक नाही. तसेच मा. उच्च न्यायालय, मुबई हे महाराष्ट्र राज्यामध्ये असल्यामुळे महाराष्ट्र राज्यामध्ये मा. मुंबई उच्च न्यायालय यांचा निर्णय लागू होतो. त्यामुळे विनाअनुदानित शिक्षण संस्थेस सदरचा अधिनियम लागू होत नाही. मा. मुंबई

उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांचे असल्यामुळे सदरच्या संस्थेस सुध्दा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागू होणार नाही. वास्तविक हे सुरुवातीस अर्जदारास कळविले तरी अर्जदाराने प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक नव्हते. तसेच सदरचे अध्यापक विद्यालयाकरिता श्री. रामटेके यांनी माहिती मागितलेली व आयोगाकडे तक्रार केली होती. ती तक्रार सुध्दा खारीज करण्यात आली होती व ती माहिती सुध्दा महाविद्यालयाचे प्राचार्य व संस्थेचे सचिव यांनी अपीलकर्ता यांना दिली होती. परंतु सध्या आपल्या देशामध्ये कोणालाच कुठेच थांबावयाचे नाही. माहिती मिळाली तरी अर्ज करीत राहायचे, अपील करीत राहायचे. जे काम होणार नाही त्या कामाकरिता शेकडो अर्ज संस्थेकडे करीत राहायचे हा फार मोठा उद्योग या देशात आहे त्यामुळे न्यायालयाकडे किंवा शासनाकडे हजारो अर्ज व याचिका प्रलंबित असतात. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१०४९-१०५१/७.९.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२२५/२०१०.

श्री. भास्कर हिरामण मेश्राम,
मु. डोनाळा, पो. पेटगांव,
ता. सावली, जि. चंद्रपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा कृषि अधिक्षक,
गडचिरोली.

जनमाहिती अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी,
ता. चामोर्शी, जि. गडचिरोली. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.९.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ७.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी तर्फे श्री. एम. एस. राऊत, कृषी अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.४.२०१० रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा तालुका कृषी विभाग, चामोर्शी यांचेकडे कार्यालयीन जीपचालकाचे काम केल्याबाबत वेतनाची माहिती दोन मुद्यांमध्ये मागितलेली आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक ६.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी/प्रथम

अपीलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, चामोर्शी यांचेकडे निवेदन सादर केले आहे व त्यात मला २००२ ते २००४ या कालावधीतील वेतनासंबंधी माहितीच्या झेरॉक्स प्रती ३८ दिलेल्या आहेत. या माहितीच्या झेरॉक्स प्रती मी कार्यालयीन रेकार्ड पाहून ताब्यात घेतले आहे. त्यामुळे माझी माहिती मिळाल्याबद्यल पुर्णतः समाधान झालेले आहे. याबद्यल माझी कसलीही तक्रार नाही. तरी माझा माहिती मागणे अर्ज व अपील अर्ज दोन्ही निकाली काढण्यात यावे असे लेखी निवेदन सादर केले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२३४/२०१०.

श्री. अशोक रायभान चिमनकर,
प्लॉट नं. १७६, शिक्षक कॉलनी,
भरतनगर, कळमना मार्केट रोड,
नागपुर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर.

श्रीमती पतंगे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.९.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ८.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे दिनांक ३०.३.१९९९ पासून शालेय कायद्यानुसार तसेच शिक्षण उपसंचालक,

... २

नागपूर यांच्या आदेशानुसार माझे अतिरिक्त शिपाई म्हणून माझे आजपर्यंत शिक्षणाधिकारी यांनी माझे समायोजन केलेले नाही. दिनांक १.४.१९९९ पासून दिनांक २४.५.२०१० पर्यंत नागपूर जिल्हयातील शाळेत शिपाई पदावर केलेले दर वर्षाचे समायोजन/नियुक्तीचे अप्रुव्हलच्या प्रमाणित प्रती देऊन माहिती द्यावी. माहिती स्पीड पोस्टाने घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २९.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही. मात्र दिनांक ७.८.२०१० रोजी काही माहिती दिलेली दिसून येते व ती माहिती त्यांना दिनांक १३.८.२०१० रोजी मिळालेली दिसून येते. सदरची माहिती ही दिनांक ९.१२.२००९ च्या अर्जाप्रमाणे आहे. परंतु अपीलकर्ता यांच्या दिनांक २४.५.२०१० च्या अर्जातील मुद्यांची माहिती व अपीलकर्त्यास निर्णय दिलेला दिसून येत नाही व ती माहिती आता आज उपलब्ध करुन आणली आहे असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. याचा अर्थ तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत म्हणजे ३० दिवसामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही व त्यामुळे ते दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रुपये ५००/- ची शास्ती लादणे आवश्यक आहे. शास्ती बद्यल विचारणा केली असता जनमाहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, माहिती त्याचेकडे उपलब्ध नसते व ज्या अधिकाऱ्यांना किंवा कर्मचाऱ्यांना मागितली असता ती विलंबाने उपलब्ध करुन देतात. परंतु सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याचे संदर्भात कोठेही इतर कर्मचारी किंवा अधिकारी यांना पत्र दिलेले दिसून येत नाही. त्यामुळे त्यांचा खुलासा हा समाधानकारक नाही त्यामुळे आज माहिती उपलब्ध करुन दिली असली तरी विलंबाने उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही. अपीलकर्ता ज्यावेळेस प्रथम अपीलात माहिती मिळाली नाही असे म्हणतात ते उपस्थित राहिले नाही तरी जनमाहिती अधिकारी यांना विचारणा केली असता त्यांनी काहीही सांगितले नाही. परंतु शिक्षण विभागात शिक्षणाधिकारी असले तरी ते कायदा कधीही वाचत नाही असे दिसून येते. माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही ही जबाबदारी अधिनियमाचे कलम १९(५) अन्वये जनमाहिती अधिकारी यांची आहे. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांना सर्वसामान्य ज्ञान नसल्यामुळे अपीलकर्ता हजर नाही असे कारण देऊन अपीलाची सुनावणी घेत नाही किंवा खारीज करतात. त्यामुळे अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन तर होतेच तसेच शासन निर्णयाचे सुध्दा उल्लंघन होते व त्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. ती मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी करावयाची आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

... ३

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक २४.५.२०१० च्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये दोषी आढळून येतात अशी आयोगाची खात्री झालेली असल्यामुळे त्यांचे विरुध्द रुपये ५००/- ची शास्ती लादण्यात येत आहे.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत सदरच्या शास्तीची वसूली **<u>शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर</u>** यांनी करावयाची असून त्यांचे दरमहाचे वेतनातून वसूल करुन लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" यात जमा करावे.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत **<u>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर</u>** यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२४०/२०१०.

श्री. ज्योतिष गौरीशंकर शर्मा,
सिल्लेवाडा, ता. सावनेर,
जि. नागपुर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
नागपूर मेडीकल, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
नागपूर मेडीकल, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.९.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २४.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ८.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे डॉ. दिक्षित, अधिष्ठाता हे हजर आहेत. माहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. दोरवे, मुख्य प्रशासकीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक, मेडीकल हॉस्पीटल, नागपूर यांचेकडे बिरेंद्र शर्मा ज्योतिष शर्मा पोस्टमाडम केलेले उपचार १९ फेब्रुवारी २०१० ते २० फेब्रुवारी २०१० मृत्युचे कारण. पोस्टमाडम न केले असल्यास कारण. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे

... २

नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ५.६.२०१० रोजी संबंधित माहिती रुग्णालयाशी संबंधित नसून ती कॉलेजशी संबंधित असल्यामुळे ती आपल्याकडे पाठविण्यात येत आहे. तरी उपरोक्त संदर्भांकित पत्रानुसार कार्यवाही करुन आपल्यास्तरावर ती माहिती अर्जदारास देण्यात यावी असे कळविलेले दिसते. त्यानंतर दिनांक ११.६.२०१० रोजी माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनी अर्ज या कार्यालयास दिनांक १०.६.२०१० रोजी प्राप्त झाला आहे. तरी अर्जदारानी मागितलेली माहिती २ प्रतीत ३ दिवसात या कार्यालयास पाठविण्यात यावी. असे प्राध्यापक व विभाग प्रमुख, न्यायवैद्यकशास्त्र विभाग यांना कळविले. त्यानंतर दिनांक ३.७.२०१० रोजी मागितलेली माहिती पोलीस डिपार्टमेंटशी संबंधित असल्यामुळे संबंधित पार्टीला त्यांचेशी संपर्क करण्यास सांगण्यात यावे. त्यांच्या पत्राची छायांकित प्रत यासोबत जोडून आपणाकडे पाठवित आहे. त्यानंतर दिनांक २४.८.२०१० रोजी अर्जदाराने मागितलेली माहिती या कार्यालयाशी संबंधित नसून ती आपल्या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे ती आपल्याकडे मुळ अर्जासोबत आपणाकडे पाठविण्यात येत आहे व त्याची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना दिलेली आहे. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १५.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ७.९.२०१० रोजी देण्यात आलेला असून आपण मागितलेली माहिती ही पोलीस विभागाचा अभिलेख आहे. सदरची माहिती न्यायवैद्यक कारणांमुळे या संस्थेतून आपणास उपलब्ध करुन देणे योग्य होणार नाही असे कळविलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी तत्पुर्वी दिनांक २०.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. आयोगाची नोटीस दिनांक २४.८.२०१० रोजी निर्गमित केल्यानंतर प्रथम अपीलाचे संदर्भात अपीलकर्ता यांना उत्तर दिलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी दिनांक ३१.५.२०१० रोजी अर्ज करुन सुध्दा त्यांना माहिती मुदतीत मिळाली नाही. परंतु प्रथम अपीलाची सुनावणी न घेता आयोगाची नोटीस आल्यानंतर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु सदरची माहिती ही चुकीची व दिशाभूल करणारी आहे. पोस्टमार्टम विभागाने पोस्टमार्टम झाले आहे किंवा नाही हे विहित मुदतीत त्यांना कळविता आले असते. परंतु ते सुध्दा त्यांनी केले नाही. या विभागाकडून त्या विभागाकडे माहिती अधिकारी यांनी अर्ज पाठविला

असल्यामुळे माहिती अधिकारी यांनाच संपूर्ण रुग्णालयाची माहिती आहे असे दिसून येत नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी वास्तविक प्रथम अपील दाखल झाल्यानंतर ३० दिवसाचे आंत प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय देणे आवश्यक असते. अपीलकर्ता जर हजर झाले नाही तर अपीलकर्ता यांचे अपील मेमोमध्ये माहिती उपलब्ध झाली नाही असे म्हटले असते व त्यामुळे अधिनियमाचे कलम १९(५) अन्वये माहिती उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी व ती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी जनमाहिती अधिकारी यांची असते. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांना त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन ३० दिवसांचे आंत प्रथम अपीलाचा निर्णय देणे बंधनकारक आहे. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी सुध्दा ४ महिन्याने सही करतात. परंतु त्याबाबत त्यांचे माहिती अधिकारी किंवा कनिष्ठ कर्मचारी काहीही विचारणा करीत नाही. पुर्वी शासकीय कार्यालयामध्ये कोणत्याच अर्जाचे संदर्भामध्ये निर्णय घेतले जात नव्हते किंवा वर्षानुवर्षे अर्ज प्रलंबित राहात होते व नागरिकांना त्याबद्यल माहिती सुध्दा मिळत नव्हती. त्यामुळेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा हा कायदा आणावा लागला व त्यातुन कोणत्याही अर्जाची माहिती ही ३० दिवसांचे आंत उपलब्ध करुन द्यावी असे बंधन घालण्यात आले. परंतु त्याबाबत शासकीय कर्मचाऱ्यांनी दखल घ्यावयाची नाही व अर्जावर टोलवाटोलवी करीत राहावयाचे अशीच कार्य पध्दती आहे असे दिसून येते. माहिती अधिकारी हे जर प्रशासकीय अधिकारी आहेत तर ती माहिती कोणत्या विभागाची आहे त्यानुसार संबंधित विभागास तातडीने कळविणे आवश्यक असते. कारण त्या विभागाकडे ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन घेणे अपेक्षित आहे. परंतु तशी कार्यपध्दती अवलंबविण्यात येत नाही असे दिसून येते व पुर्वीप्रमाणे अर्जाची टालवाटोलवी सुरु असते.

४. आयोगाकडील सुनावणीत अपीलकर्ता यांना काय हवे आहे एकदा समजून घेतल्यानंतर ती माहिती कोणत्या कार्यालयात उपलब्ध होईल हे जनमाहिती अधिकारी यांनीच अपीलकर्ता यांना सांगितले. परंतु ही बाब पूर्वीच त्यावेळेस करता आली असती व त्यानंतरच विनाकारण प्रथम अपील व द्वितीय अपील हे टाळता आले असते. असे असले तरी अपीलकर्ता यांना आता पुन्हा माहिती कोणत्या अधिकाऱ्याकडे व कशा पध्दतीने मिळेल असे कळविले आहे. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## **आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२३९/२०१०.

सौ. जिराबाई शालीकराम राऊत,
मु. पो. चुरचुरा माल, ता. जि. गडचिरोली. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
चंद्रपूर.

श्री. कुनार पवार,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
सावली, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.९.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक २०.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २४.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ८.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती हे गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक २५.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, सावली यांचेकडे मौजा निपुंद्रा सर्वे नं. ५६६/१५ चे फेरफार क्रमांक ३०९ ची सत्यप्रत सन १९९७-१९९९ ची माहिती प्रत्यक्ष घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ती यांनी दिनांक ३०.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

... २

३.	जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की, ते ग्रामपंचायत निवडणूकीमध्ये व्यस्त असल्यामुळे हा सदरचा अर्ज त्यांचे निदर्शनास आलेला नसल्यामुळे अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. परंतु त्यानंतर दिनांक २७.७.२०१० रोजी अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नाही त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केले व तसेच शासन निर्णयाचे सुध्दा उल्लंघन केले आहे. त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. जनमाहिती अधिकारी यांनी जरी सांगितले की, माहिती ही दिनांक २७.७.२०१० रोजी देण्यात आलेली आहे तरी त्यासंदर्भात जावक नोंदवहीची छायांकित प्रतीचा पुरावा म्हणून त्यांनी सादर केलेला नाही. त्यामुळेच सदरची प्रत पाठविली किंवा नाही याबद्यलचा संशय उत्पन्न होतो. परंतु आज अपीलकर्ती गैरहजर असल्यामुळे त्यांना ती प्रत मिळाली असावी असे गृहीत धरले तरी त्यांना पुन्हा सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी ज्या अधिकारी किंवा कर्मचारी यांनी माहितीचा अर्ज निदर्शनास आणला नसतील त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे संयुक्तिक राहिल. अन्यथा आयोगापुढे ते शास्तीस पात्र राहतील. त्यामुळे अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसाचे आंत अपीलकर्ती यांना सदरची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-		दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१०६१-१०६२/८.९.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२३६/२०१०.

श्री. भाऊराव दत्तुजी जंगम,
एन.आय.टी.कॉम्प्लेक्स,
महाबोधी अपार्टमेंट, के- १/७,
सी.एम.पी.डी.आय. रोड,
जरिपटका, नागपुर - ४४० ०१४. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. शि. दी. गिरी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ, अमरावती.

श्री. सु. के. सरोदे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक अधिक्षक,
उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ, अमरावती. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.९.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २४.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ८.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ, अमरावती यांचेकडे आपल्या मंडळ कार्यालयाचे अपात्र ठरविल्याचा आदेश क्रमांक

... २

६/उवप्रमं/आ-३/१९९७, दिनांक २८.११.१९९७ नुसार कशाचे आधारावर निर्गमित करण्यात आला त्यांच्या संस्करण केलेल्या सत्यप्रती पुरविण्यात याव्यात. आपण संस्करण केलेल्या सत्यप्रती पुरविण्याबाबत अपात्र घोषित करण्याचा तपशील द्यावा. सदरची माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे व नमुना प्रपत्र अ भरुन द्यावा अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ७.५.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच ज्या कार्यालयातून (विभागीय कार्यालय) सेवानिवृत्त झालात त्यांचेकडून सदर माहिती प्राप्त करावी असे कळविलेले दिसून येते. तसेच जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक अभियंता यांनी दिनांक ७.५.२०१० च्या उत्तरान्वये मंडळ कार्यालयातील कार्यासनाकडे उपलब्ध असलेले दस्तऐवजातील तत्कालीन अधिकाऱ्यांनी कालबध्द पदोन्नतीकरिता अपात्र घोषित केल्याबाबत घेतलेल्या निर्णयाबाबत नोंदवहीच्या पृष्ठाची छायाप्रत पुरविण्यात आली. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २९.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३०.८.२०१० रोजी देण्यात आला असून जनमाहिती अधिकाऱ्याने विहित कालावधीत त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविली असल्याने अपील खारीज करण्यात आले व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, गोपनीय अहवाल मिळण्याच्या संदर्भातील संस्करण केलेली कागदपत्रे त्यांना मिळाली नाही. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांना संबंधित कार्यालयाकडून प्रपत्र भरुन देण्यात आलेले आहे. मात्र संस्करण केलेली कागदपत्रे त्यांना मिळाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे व संस्करण कागदपत्रे हे ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले त्या कार्यालयातून ते मिळू शकतील असे त्यांना कळविण्यात आले होते. परंतु तसे संस्करण केलेली कागदपत्रे अधिनियमाचे कलम ८(१) अन्वये अपवाद करावी लागतात. त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१०६३-१०६५/८.९.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०८४/औरंगाबाद/२०१०.**

श्री. दिलीपसिंग प्रतापसिंग पाटील,
मु. खर्ची खुर्द, ता. एरंडोल,
जि. जळगांव. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. व्ही. सोनवणे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, एरंडोल, जि. जळगांव.

श्री. एन. एस. माळी,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्राम सेवक,
ग्राम पंचायत, खर्ची खुर्द,
ता. एरंडोल, जि. जळगांव. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.८.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दिनांक २७.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.८.२००९ रोजी ग्रामसेवक, ग्रामपंचायत, खर्चीखुर्द यांचेकडे सन २००७-०८ चे किर्द व प्रोसिडिंग व व्हावचर बिलांचे झेरॉक्स प्रमाणित प्रत व सन २००७-०८ मध्ये तंटामुक्त गाव

... २

मोहिम अंतर्गत दोन लाख रुपयांचे बक्षीस कुठे व कसे वापरले (खर्च ) त्याबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक २४.८.२०१० रोजी कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचेकडे निवेदन सादर केले असून त्यात आज अजंठा विश्रामगृह, जळगांव कॅम्प मध्ये मी मागितलेली माहिती मिळाली. माझा अर्ज निकाली काढण्यात यावा असे लेखी निवेदन सादर केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०९९/औरंगाबाद/२०१०.

श्री. धनंजय बन्सिलाल सोनार,
देशमुख वाडा, ता. अमळनेर,
जि. जळगांव - ४२५ ४०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एन. डी. पारधे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, अमळनेर, जि. जळगांव.

श्री. अशोक बिऱ्हाडे,
जनमाहिती अधिकारी तथा
शिक्षण विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, अमळनेर, जि. जळगांव. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.८.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दिनांक २७.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.२.२०१० रोजी माहिती अधिकारी म्हणून पंचायत समिती, अमळनेर यांचेकडे अमळनेर शहरात व तालुक्यात खाजगी शिकवणी वर्गाबाबतची एकूण ६ मुद्यांची माहिती मागितलेली

... २

दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक २४.८.२०१० रोजी राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद (जळगांव कॅम्प) यांचेकडे निवेदन सादर केले. अपील क्रमांक १०९९ ची माहिती उशिरा का असेना म्हणून माझे समाधान झाले आहे. कृपया अर्ज निकाली काढणेस हरकत नाही असे लेखी लिहून दिले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११०५/औरंगाबाद/२०१०.**

श्री. रामकृष्ण भगवान बागुळ,
श्रीकृष्ण कॉलनी, मु. पो. ता. अमळनेर,
जि. जळगांव - ४२५ ४०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, अमळनेर, जि. जळगांव.

श्री. व्ही. एन. शिंदे,
जनमाहिती अधिकारी तथा
आरोग्य निरिक्षक,
नगर परिषद, अमळनेर, जि. जळगांव. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.८.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दिनांक २७.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. बी. एम. देशमुख, प्रशासन अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१२.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अभियंता, नगर परिषद, अमळनेर यांचेकडे अमळनेर टि पी हद्यीतील फे. प्लॉ. २०३ बाबत एकूण ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली

... २

दिसून येते.  सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक १२.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचेकडे निवेदन सादर केले असून मला आपणाकडे अपील दाखल केल्यानंतर जनमाहिती अधिकारी तथा अभियंता, नगरपरिषद, अमळनेर न दिलेली माहिती पुरविणेत आलेली आहे.  म्हणून मी माझे दिनांक ६.३.२०१० रोजी केलेले अपील मागे घेत आहे असे लेखी निवेदन जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-        दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२४८/२०१०.

श्री. दिपक कुंजिलाल फुलसंगे,
मु. पो. ता. ऐटापल्ली, जि. गडचिरोली - ४४२ ७०४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. बी. बेजलवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, गडचिरोली.

श्री. किशोर चिलमवार,
जनमाहिती अधिकारी तथा
गट प्रमुख,
जिल्हा सुलभीकरण गट जलस्वराज प्रकल्प,
जिल्हा परिषद, गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.९.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा गट प्रमुख, जिल्हा सुलभीकरण गट जलस्वराज प्रकल्प, जिल्हा परिषद, गडचिरोली यांचेकडे जलस्वराज प्रकल्पाच्या योजनेमधून विहिर बांधकामाची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक

१६.९.२०१० रोजी लेखी निवेदन राज्य माहिती आयुक्तास सादर करुन मी मागितलेली संपूर्ण माहिती मला मिळाली असून प्राप्त माहितीमुळे माझे समाधान झाले आहे व आता त्याबाबत माझी कोणतीही तक्रार राहिलेली नाही. तेंव्हा मा. आयोगाकडील अपील क्रमांक १२४८/२०१० खारीज करण्यात यावे अशी मी आपणास विनंती करीत आहे. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१०७२-१०७३/१६.९.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२६६/२०१०.**

श्री. श्रीराम सोमाजी धुर्वे,
गांधी वार्ड, ता. तिरोडा, जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी,
गोंदिया.

श्री. करणकुमार चव्हाण,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, तिरोडा, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.९.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून नगर परिषद, तिरोडा यांचेकडे दिनांक १४.१०.२००९ ला संतसजन वार्ड नं. १ मध्ये शेतीचे भुखंड असून त्याला अकृषक करण्याकरिता ३६८०/- रुपये (४६० चौ. मिटर) नगरपरिषद फंडात जमा केले. परंतु पाच महिन्याचा

... २

कालावधी लोटून सुध्दा अकृषक भूखंड प्रमाणपत्र मिळाले नाही न देण्याचे कारण काय ? सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २१.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. परंतु दिनांक ११.६.२०१० रोजी अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेली कार्यवाही करुन आदेशाची प्रत देण्यात आलेली दिसून येते. परंतु माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे प्रथमतः त्यांनी असे सांगितले की, त्यांना आता पर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी तथा लिपिक यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांचे प्रकरण मा. मुख्याधिकारी यांचेकडे मंजूरीकरिता सादर करण्यात आले होते. त्यामुळे अपीलकर्ता यांना त्याप्रमाणे तोंडी सांगितले होते. अपीलकर्ता यांनी सुध्दा मान्य केले की, त्यांनी मुख्याधिकारी यांचेकडे प्रकरण सादर केले असल्यामुळे माहिती देता येत नाही. परंतु नंतर माहिती दिनांक ३०.६.२०१० रोजी प्रकरणातील आदेश हे गुणवत्तेवर पारित करुन ती घेऊन जावे असे कळविले आहे व ते त्यांना उपलब्ध करुन दिलेले आहे. आयोगापुढे माहिती अधिकारी यांनी दाखल केलेला खुलासा योग्य नाही. माहितीच्या अर्जाप्रमाणे माहिती जर उपलब्ध नव्हती तर अपीलकर्ता यांना माहिती घेऊन जावे असे तोंडी सांगण्याचे कारण नव्हते व मुळात जे आदेश दिले आहेत ते दिनांक ११.६.२०१० रोजी झालेले आहेत. माहितीचा अर्ज सादर झाल्यानंतर ३० दिवसांचे आंत मुदतीत योग्य ते उत्तर देणे बंधनकारक असल्यामुळे (माहिती उपलब्ध झाल्यावर नसेल) ती माहिती दिली नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी तथा लिपिक यांचे विरुध्द रुपये २५०/- ची शास्ती लादणे संयुक्तिक राहील असे आयोगाचे मत झाले आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी तथा लिपिक यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे किंवा मागितलेल्या माहिती बद्यल वस्तुस्थिती कळविली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रुपये २५०/- ची शास्ती लादण्यात येते.

२) सदरच्या शास्तीची वसुली मुख्याधिकारी, नगर परिषद, तिरोडा, जि. गोंदिया यांनी करावयाची असून लिपिक यांचे दरमहाचे वेतनातून कपात करुन लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-        दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२६५/२०१०.**

श्री. वामन काशीनाथ हेंडवे,
मु. पो. रसुलाबाद, ता. आर्वी, जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्रीमती सुलोचना निघडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक,
जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा.

श्री. अे. डी. खातदेव,
जनमाहिती अधिकारी तथा
लिपिक,
जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.९.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांचेकडे विषयांकित दोनही पत्रात बनावट करणाऱ्यांचे नांव व पद याची माहिती मागितलेली दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ६.४.२०१० रोजी प्रथम अपील हे जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा सनियंत्रण समिती कार्यालय यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

... २

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांच्या प्रकरणामध्ये कोणत्याही प्रकारची कार्यवाही करुन मिळत नाही व त्यामुळे त्यांनी माहिती मागितलेली आहे. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता हे जनमाहिती अधिकारी यांचेकडे अर्ज न करता जिल्हाधिकारी यांचेकडे अर्ज करतात व त्यामुळे तो अर्ज प्राप्त होतोच असे नाही. प्रथम अपील सुध्दा जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा संनियंत्रण समिती यांचेकडे दाखल केलेला आहे व त्यामुळे त्यांचे अपील अर्जावर व माहितीचे अर्जावर विचार झालेला दिसून येत नाही. परंतु आता सुध्दा त्यांच्या अर्जाचे अवलोकन केले असता त्यांना कोणत्या प्रकारची माहिती पाहिजे त्याचा अर्थबोध होत नाही. त्यांनी महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती जमाती आयोग यांचेकडे सुध्दा अर्ज केलेला होता व त्यांनी वास्तविक जिल्हाधिकारी कार्यालयास कळविण्यात आलेले आहे. अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक ३४४/२००९ व अपील क्रमांक ३४५/२००९ यांचा सुध्दा निर्णय या आयोगापुढे देण्यात आलेला आहे. त्यांना सर्व प्रकारची माहिती आता पर्यंत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु त्यांची कारवाईची मागणी आहे व ती त्यांनी न्यायालयात जाऊन करणे आवश्यक राहिल असे आयोगापुढे सांगितले. त्यांना दिनांक ८.३.२०१० रोजी सुध्दा आयोगाचे निर्णयाप्रमाणे कळविण्यात आलेले आहे. त्यांनी माहितीच्या अर्जात कारवाई करण्याच्या दृष्टिने माहिती मागितली तरी कारवाई करुन मिळणार नाही असे त्यांना सांगितले. त्यांना अपेक्षित कारवाई करुन मिळणार नाही असेही सांगितले आहे. तरी ते वारंवार माहितीच्या अधिकारात अर्ज करीत असतात. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दाखल केलेल्या कागदपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे योग्य आहे. अपीलकर्ता यांची कारवाई करुन घेण्याची अपेक्षा असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१०७७-१०७८/१७.९.२०१०

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२६१/२०१०.

श्री. गुलाबराव दिनकरराव कुलथे,
लक्ष्मीनगर, जुना वडेगांव रोड,ता. जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. विजय लोखंडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, वणी, जि. यवतमाळ.

श्री. एस. ई. बोरगांवकर,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्राम पंचायत, शेलु (बुजरुक),
ता. वणी, जि. यवतमाळ. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.९.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१२.२००९ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, वणी, जि. यवतमाळ यांचेकडे सचिव, ग्रामपंचायत शेलू-शिरपूर या ठिकाणी कु. आशा आनंदराव चटप हिचा श्री. भालेकर मामा यांचे घरी दिनांक २९.८.१९८१ रोजी जन्म झाला. श्री.

... २

आनंदराव चटप, आवळपूर यांनी कु. आशा हिचे मॅरेज फिक्स करते वेळी दिनांक ३०.८.१९८० व दिनांक २९.८.१९८१ अश्या दोन जन्म तारखा दिल्या. सरकारी कामकाजाकरिता ग्रामपंचायत शेलू कार्यालयात असलेल्या जन्म नोंदीची आवश्यकता आहे. तरी ग्रामपंचायत कार्यालयात वरील पैकी कोणत्या तारखेची नोंद आहे याची माहिती टपालाद्वारे कळविण्यात यावी. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २.१.२०१० रोजी अपीलकर्ता यांना सन १९८० व १९८१ च्या जन्मनोंद रजिस्टरचा शोध घेतला असता ग्रामपंचायत दप्तरी वरील दोन्ही वर्षाचे जन्म नोंद रजिस्टर उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे जन्मनोंद दाखला देऊ शकत नाही असे त्यांना रजिस्टर पोस्टाने कळविण्यात आलेले आहे. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ५.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ५.४.२०१० रोजी देण्यात आलेला असून कक्ष अधिकारी, पंचायत समिती, वणी यांनी वरिष्ठ सहाय्यक, आस्थापना (पंचायत) उक्त आदेशाप्रमाणे श्री. एस. इ. बोरगांवकर, जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, शेलू (बु.) यांची एक वार्षिक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर फरक न करता रोखून त्यांच्या सेवा पुस्तकात नोंदी घेऊन कार्यवाही करण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळे माहिती न मिळाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, जन्म रजिस्टर जतन करुन ठेवणे हे ग्राम पंचायत सचिव यांची जबाबदारी असते. त्यामुळे ही माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. परंतु जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत यांनी आयोगापुढे असे सागितले की, त्यांनी ग्रामपंचायत मधील संपूर्ण अभिलेखाचा शोध घेतला. परंतु १९७९-८० चे जन्म रजिस्टर हे मिळून येत नाही. तत्कालीन सचिवांनी ते जतन करुन ठेवणे आवश्यक आहे. परंतु त्याबाबत तत्कालीन सचिव यांनी जबाबदारीने कोणतीही कार्यवाही केलेली दिसून येत नाही. मला प्रभार देतांना जी कागदपत्रे व अभिलेख दिली आहेत ती जशीच्या तशी कार्यालयात आहेत. त्यामुळे जर १९७९-८० चे जन्म रजिस्टर नसेल तर त्यास मी जबाबदार नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांना कोणत्याही प्रकारची शास्ती लादण्याचे अधिकार हया माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे नाही व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो आदेश पारित

केलेला आहे तो त्यांचे अधिकार कक्षेचे उल्लंघन करणारे आहे. त्यामुळे तो रद्य करणे आवश्यक आहे. संवर्ग विकास अधिकारी यांना प्रशासकीय आदेशाचे माध्यमातून स्वतंत्रपणे सचिव, ग्रामपंचायत यास लागू असलेल्या सेवाशर्ती प्रमाणे कार्यवाही करण्याचा अधिकार आहे व त्याप्रमाणे त्यांची कार्यवाही योग्य ठरली असती. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी माहिती द्यावी असे आदेश त्यांनी दिलेले असल्यामुळे त्याच जन्मरजिस्टर नोंदीचा शोध घ्यावा व माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी यांनी स्वतःचे अधिकारात शोध घेऊन माहिती उपलब्ध झाल्यास ती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२६२/२०१०.

श्री. निलेश अधिकराव वरभे,
मु. मेसा, पो. शेगांव बुज, ता. वरोरा,
जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. पी. देशपांडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, चंद्रपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
सावित्रीबाई फुले विद्यालय, शेगांव (बुज)
ता. वरोरा, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.९.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. माहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. शेष भोयर, कनिष्ठ लिपिक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सावित्रीबाई फुले विद्यालय, शेगांव बुज, ता. वरोरा यांचेकडे माहितीशी संबंधित कालावधी सत्र १ जानेवारी २००२-०३ पासून सत्र २०१०-११

... २

पर्यंत शाळेला शासन मान्यता प्रदान केल्याची साक्षांकित प्रत. सत्र २००९-१० चे विद्यालयाचे वेळापत्रक साक्षांकित प्रत. सत्र २००९-१० चे शिक्षक व विषय निहाय कार्यभार तक्ता साक्षांकित प्रत. सत्र २०१०-११ चे विद्यालयाचे वेळापत्रक व शिक्षकांचा विषय निहाय कार्यभार तक्ता साक्षांकित प्रत. सत्र २००९-१० चे शिक्षक वेतन वाटप दस्तऐवज प्रती. शासन मान्य माध्यमिक शाळेचा ३१ मार्च २०१० चा उत्पन्न, खर्च तक्ता प्रत. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ८.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ८.९.२०१० रोजी देण्यात आला असून जी माहिती उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. माहिती अधिकारी यांनी शाळेत उपलब्ध असलेली माहिती अर्जदारास ७ दिवसांचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. त्याप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तत्पुर्वीच अपीलकर्ता यांनी दिनांक १६.८.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले होते.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सागितले की, त्यांना माहिती विलंबाने उपलब्ध झाली व मुद्दा क्रमांक ई व फ ची माहिती अद्याप पर्यंत उपलब्ध झालेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मुद्दा क्रमांक ई व फ ची माहिती त्यांचेकडे उपलब्ध नाही. त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही तसे त्यांना कळविण्यात आलेले आहे. परंतु पुन्हा जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची शाळा ही कायम विनाअनुदान तत्वावर आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागू होत नाही. त्यावर अपीलकर्ता यांनी केंद्रीय माहिती आयोगाचा निर्णय वर्तमानपत्रात दिलेले असल्यामुळे त्याचे कात्रण आयोगाचे निदर्शनास आणले व त्यामध्ये विनाअनुदान शैक्षणिक संस्थांना सुध्दा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागू होतात असे त्यांनी सांगितले. परंतु केंद्रीय माहिती आयोगाचा निर्णय हा राज्य माहिती आयोगावर बंधनकारक नाही. तसेच राज्य माहिती आयोगाने दिनांक १.९.२००९ रोजी आयोगापुढील अपील क्रमांक १७७२/२००७ व अपील क्रमांक १७७३/२००७ मध्ये विनाअनुदान शैक्षणिक संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागू होतात असा निर्णय दिलेला होता. परंतु सदरच्या निर्णयास नगर युवक शिक्षण संस्था यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ

नागपूर येथे याचिका दाखल करुन आवाहन देऊन विना अनुदान शैक्षणिक संस्थांना कायदा लागू होत नाही असे प्रतिपादन केले व त्यामुळे याचिका क्रमांक ५१३२/२००८ ही मंजूर करुन मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांनी विनाअनुदान शैक्षणिक संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागू होत नाही असा निर्णय दिलेला आहे व महाराष्ट्रामध्ये मा. मुंबई उच्च न्यायालय, मुंबईचा निर्णय हा बंधनकारक असल्यामुळे केंद्रीय आयोगाचे निर्णय हा लागू होत नाही व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१०८२-१०८४/१७.९.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२६०/२०१०.

श्री. कुंदनलाल मणिराम प्रजापती,
रंजन बिछायत केंद्र, हंसापूरी,
धोंडबा चौक, नागपूर - ४४० ०१८. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.९.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे दिनांक ३१.३.२०१० को हुई सुनावणी का अहवाल देणेबाबत (कॉपी संलग्न). मेरे पत्र दिनांक २०.४.२०१० एवं स्मरणपत्र दिनांक २१.५.२०१०. विषय :- अवैध रुपसे चलाई जा रही जॉच

... २

समिती रद्य करने बाबत, पर क्या कार्यवाही हुई इसका संपूर्ण अहवाल मिलनेबाबत. (कॉपी संलग्न) अशी माहिती मागितलेली दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ५.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे व आयोगापुढे सुध्दा जनमाहिती अधिकारी हजर राहिले नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा कोणत्याही प्रकारे प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक २.६.२०१० च्या अर्जाचे अनुषंगाने विनामुल्य रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक २.६.२०१० च्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

३) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची दखल न घेतल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत **मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर** यांना पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९५१/२०१०.**

श्री. डॉ. सिध्दार्थ नामदेव बुटले,
हनुमाननगर, वार्ड नं. १२, वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डॉ. अब्दुल बारी,
जनमाहिती अधिकारी तथा
प्राचार्य,
गो. से. वाणिज्य महाविद्यालय, वर्धा.

श्री. डॉ. अब्दुल कादर मंसुरी,
प्राध्यापक,
गो. से. वाणिज्य महाविद्यालय, वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.९.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची पुढील सुनावणी आज दिनांक १८.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर. आहेत. त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून गो. से. वाणिज्य महाविद्यालय, वर्धा यांचेकडे प्रा. अे. के. मंसूरी यांचे जातीचे प्रमाणपत्र, १० वी बोर्डाचे प्रमाणपत्र, जात पडताळणीचे प्रमाणपत्र, पुंजाराम पटेल शिक्षण महाविद्यालय, गोंदिया येथील २ जन्मतारखा बद्यल दिलेले स्पष्टीकरण व पुराव्याच्या सत्यप्रतीलिपी, सेवेत रुजू होतांना दाखल केलेले उपविभागीय अधिकारी यांनी दिलेले

... २

ओ.बी.सी.चे प्रमाणपत्र इत्यादी माहिती व्यक्तिशः हवी आहे असे नमुद करुन माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १७.४.२०१० रोजी आपण या अगोदर प्रा. मंसूरी यांच्या संबंधाने बरेचदा माहिती मागितली होती व ती वेळोवेळी आपणास पुरविण्यात आली आहे. पोलीस स्टेशन, वर्धा येथे प्रा. मंसूरीच्या विरुध्द आपण तक्रार दिल्यामुळे गुन्हा क्रमांक ३३७/०९ पोलीस स्टेशन, वर्धा येथे नोंद झालेला आहे. पोलीसने उपरोक्त तक्रारवर चौकशीच्या दरम्यान सर्व कागदपत्राची पाहणी केली आहे. तसेच कागदपत्र सुध्दा तपासले आहेत. आपण मागितलेली माहिती श्री. मंसूरी यांची व्यक्तिगत स्वरुपाची आहे. तसेच सदरहु सार्वजनिक कामकाजाची किंवा सार्वजनिक हितसंबंधाबद्यल नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियमाप्रमाणे देता येणे शक्य नाही. त्याचप्रमाणे आपल्या तक्रारीवरुन वर्धा पोलीस स्टेशन येथे गुन्हयाची नोंद झाली असल्यामुळे व सध्या गुन्हयाचा तपास सुरु आहे. म्हणून आपण मागितलेली माहिती देता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ११.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. द्वितीय अपीलाची सुनावणी दिनांक ३.८.२०१० रोजी ठेवण्यात आली होती. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, प्रा. मंसूरी यांची माहिती मागितली असे सांगितले व त्यावर जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी सुध्दा ती प्रा. मंसूरी यांची वैयक्तिक माहिती असल्यामुळे व प्रा. मंसूरी यांचे संबंधामध्ये आता पर्यंत ज्या ज्या तक्रारी आलेल्या आहेत त्या तक्रारीच्या संदर्भामध्ये चौकशी सुध्दा झालेली आहे व ती त्यांची वैयक्तिक माहिती आहे व त्यामुळे ती देता येणार नाही असे आयोगापुढे प्रतिपादन केले.

४. अपीलकर्ता यांनी प्रा. मंसूरी यांची जी माहिती मागितलेली आहे ती माहिती ही त्रयस्थ पक्षाची माहिती आहे. प्रा. मंसूरी यांनी सेवेत नियुक्तीचे वेळेस जी कागदपत्रे दाखल केलेली आहेत ती कागदपत्रे ही त्यांची स्वतःची असल्यामुळे ती त्रयस्थ पक्षाची माहिती होते व त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे जनमाहिती

अधिकारी तथा प्राचार्य यांनी अधिनियमाचे कलम ११(१) प्रमाणे त्रयस्थ पक्ष म्हणून प्रा. मंसूरी यांना मागितलेल्या माहितीचे बद्यल पुरविण्याबद्यल विचारणा करणे आवश्यक होते. परंतु त्यांनी ती विचारणा केली नाही असे दिसून येते. मात्र माहिती उपलब्ध करुन देण्यास नकार दिलेला असल्यामुळेच विचारणा करण्याची आवश्यकता नव्हती असे माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. असे असले तरी राज्य माहिती आयोगापुढे ज्यावेळेस अपील सुनावणीस येते त्यावेळेस अधिनियमाचे कलम १९(४) प्रमाणे त्रयस्थपक्षाचे माहितीचे संदर्भात जनमाहिती अधिकाऱ्यांचा निर्णय असला तरी राज्य माहिती आयोग त्या त्रयस्थ पक्षाला आपले म्हणणे मांडण्यास वाजवी संधी देईल अशी तरतुद आहे. त्याप्रमाणे त्रयस्थपक्ष प्रा. मंसूरी यांना आयोगाचे कार्यालयातून आयोगापुढे त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी उपस्थित राहण्याकरिता दिनांक ३०.८.२०१० रोजी आयोगाचे आदेशाप्रमाणे नोटीस काढण्यात आली होती व त्यामुळे आज त्रयस्थपक्ष श्री. मंसूरी हे आयोगापुढे हजर झाले असून त्यांनी त्यांचे म्हणणे लेखी दिलेले आहे तसेच त्यांनी तोंडी युक्तिवाद केला. तोंडी युक्तिवादामध्ये त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता स्वत: श्री. मंसूरी व प्राचार्य हे गो. से. वाणिज्य महाविद्यालयामध्ये सेवेत आहेत. अपीलकर्ता हे सेवेत जेष्ठ आहेत. यापुर्वी अपीलकर्ता यांनी २००७ मध्ये माहितीच्या अधिकारात त्यांची वैयक्तिक कागदपत्रे मिळवीली आहेत व त्यावेळेस मला कोणत्याही प्रकारची विचारणा करण्यात आली नव्हती. माझ्या वैयक्तिक नस्तीमधून माहिती परस्पर उपलब्ध करुन घेतली असल्यामुळे मी महाविद्यालयाला तक्रार केलेली आहे. माहितीच्या अधिकारात माहिती मागतांना अपीलकर्ता हे माझे विरुध्द प्रत्येक वेळेस वेगवेगळे आरोप करतात. प्रत्यक्ष त्यांना कागदपत्रें मिळाल्यावर सुध्दा ते कोणतेही आरोप सिध्द करु शकले नाही. अपीलकर्ता हे माझे विरुध्द सहसंचालक (उच्च शिक्षण) यांचेकडे व महाविद्यालयाकडे वेगवेगळया तक्रार करतात व माझे दाखल केलेले दस्तऐवज हे बोगस आहे हयाची चौकशी करावी अशी मागणी करतात. त्या चौकशीत माझे स्पष्टीकरण मागितले गेले आहे. माझे कोणतेही दस्तऐवज बोगस नाही व त्याबाबत विद्यापीठाने, संस्थेने व सहसंचालक (उच्च शिक्षण) यांनी चौकशी केली असल्यामुळे त्याबाबत माझेवर कोणतीही कार्यवाही झाली नाही. सोबत सर्व कागदपत्रे दाखल केलेली आहेत. त्यानंतर अपीलकर्ता यांनी १ वर्ष काहीही केले नाही. परंतु पुन्हा जुलै २००९ मध्ये माझे सर्व दस्तऐवज विश्व हिंदू परिषद व बजरंग दल यांना उपलब्ध करुन दिली व माझे विरुध्द भा.द.वि. ४२०, ४६८ तसेच ४७१ या कलमांतर्गत

... ४

कार्यवाही करावी तसेच वेगवेगळया वर्तमान पत्रामध्ये माहिती प्रसारीत करुन माझे चरित्रहनन केले. त्याकरिता मी २० जुलै २००९ ला डॉ. सिध्दार्थ नामदेव बुटले यांचे विरुध्द मानहानीची नोटीस दिली आहे. असे असून सुध्दा त्यांनी एफ.आय.आर. क्रमांक ३३७/०९ पोलीस स्टेशन, वर्धा येथे माझे विरुध्द दाखल केले. माझी जी कागदपत्रे आहेत त्या संदर्भामध्ये महाविद्यालयाने त्या त्या संस्थेमध्ये चौकशी केली आहे. मात्र पोलीस विभागाने मात्र त्याबाबत अद्याप पर्यंत महाविद्यालयाकडून चौकशी न करता त्यांचे विरुध्द अपराध मात्र दाखल केलेला आहे. मला अटक पूर्व जामीन घ्यावा लागला व प्रत्येक रविवारी पोलीस स्टेशनमध्ये हजर राहण्यास भाग पाडले. माझे सर्व नातेवाईकांना पोलीस स्टेशनमध्ये जाबजबाब द्यावा लागला. जसा काही फार मोठा खुनासारखा गुन्हा केला आहे हे सर्व अपीलकर्ता यांनी घडवून आणले आहे व तसा जातीय रंग देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे माझ्या शारिरीक व पारिवारीक जीवन धोक्यात आले आहे. माझ्या विद्यार्थ्यांसमोर वर्तमान पत्राची कात्रणे देणे व नातेवाईकांना सुध्दा पाठविली. अपीलकर्ता हे जिथे शक्य असेल तिथे माझे विरुध्द अपप्रचार करीत असतात. अपीलकर्ता यांना संस्थेने कार्यकारी प्राचार्य बनविले नाही त्याचा बदला ते माझे विरुध्द घेत आहेत व त्यामुळेच माझी वैयक्तिक माहिती ही जरी सार्वजनिक अभिलेख असेल तरी अपीलकर्ता यांना देण्यास माझा विरोध आहे. अपीलकर्ता हे त्याचा गैरवापर करीत आहेत व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी हया वैयक्तिक स्वार्थाने प्रेरित होऊन गैरवापरासाठी नाही. त्याकरिता सोबत त्यांनी श्री. किशोर पोफळी, प्राचार्य, गो. से. वाणिज्य महाविद्यालय, वर्धा यांनी दिनांक १८.८.२००८ रोजी श्रीमान प्राचार्य, पुंजाभाई पटेल बी.एड.कॉलेज, गोंदिया यांना प्रमाणपत्र पडताळणीकरिता दिलेल्या प्रमाणपत्र पत्राची प्रत सादर केलेली आहे. डॉ. के. एम. भांडारकर, प्राचार्य, पुंजाभाई पटेल बी.एड. कॉलेज, गोंदिया यांनी दिनांक २०.८.२००८ रोजी श्री. ए. के. मंसूरी यांची टी.सी. पूर्णपणे खरी असून आमच्या महाविद्यालयाने दिनांक २१.९.१९९६ रोजी दिलेली आहे. उपरोक्त टी.सी. ची सत्यता महाविद्यालयातील रेकॉर्डचे आधारे पडताळून पाहाण्यात आली आहे असे मी प्रमाणित करतो. सदर टी.सी. बोगस नसल्यामुळे पुढील स्पष्टीकरणाचा प्रश्न उद्‌भवत नाही असेही त्यात नमुद केले आहे. त्यांचे विरुध्द दाखल झालेल्या एफ.आय.आर व तक्रारीच्या प्रती सुध्दा त्यांनी दाखल केलेल्या आहेत. त्यावर श्री. किशोर पोफळी, प्राचार्य, गो.से.वाणिज्य महाविद्यालय, वर्धा यांनी जिल्हा पोलीस अधिक्षक, वर्धा यांना दिनांक २५.७.२००९ रोजी

महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. ए. के. मंसूरी यांचेवर प्राचार्यामार्फत चौकशी न करता गुन्हा दाखल करण्याबाबत दिलेल्या पत्राची प्रत दाखल केली. त्यामध्ये तक्रारीबद्यल महाविद्यालयाच्या प्राचार्याद्वारा सत्यता पडताळणी न करता गुन्हा दाखल करण्यात आला आहे तो नियमाच्या विरोधात आहे. तरी आपण याबाबत सखोल चौकशी करुन गुन्हा दाखल करणाऱ्या विरुध्द योग्य कार्यवाही करावी वगैरे पत्र दिलेले आहे. तसेच इंडियन मुस्लीम असोशियेशन नुरी या संस्थेचे सचिव यांनी ठाणेदार, वर्धा शहर पोलीस स्टेशन, वर्धा यांना दिलेल्या पत्राची प्रत सुध्दा दाखल केलेली आहे. यावरुन त्रयस्थ पक्ष श्री. डॉ. ए. के. मंसूरी यांचे विरुध्द महाविद्यालयाने चौकशी केलेली आहे. त्यांचे विरुध्द एफ.आय.आर. दाखल झालेला आहे त्या कागदपत्राची पडताळणी किंवा चौकशी ही पुन्हा न्यायालयात होईल. तसेच अपीलकर्ता हे स्वतः त्याच महाविद्यालयात जेष्ठ प्राध्यापक आहेत व यात सेवा जेष्ठतेचा संबंध दिसून येतो. त्यामुळेच ही माहिती मागितलेली आहे असे दिसून येते. वास्तविक यापुर्वी अपीलकर्ता यांनी ती माहिती उपलब्ध करुन घेतली आहे व त्यासंदर्भात चौकशी झालेली आहे व सुरु सुध्दा आहे व स्पष्टीकरण सुध्दा दिलेले आहे. त्याबाबत माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी सुध्दा जे स्पष्टीकरण आयोगापुढे दिलेले आहे त्यामध्ये प्राध्यापक डॉ. ए. के. मंसूरी यांच्या २ जन्मतारखेच्या स्पष्टीकरणाचे संदर्भामध्ये त्यांना दिनांक १६.९.२००८ ला स्पष्टीकरण मागितले होते ते त्यांनी दिनांक २१.९.२००९ ला सादर केलेले आहे. परंतु सदरचे स्पष्टीकरण हे एफ.आय.आर. दाखल करण्यापुर्वी मागितले नाही. एफ.आय.आर.ची नोंद झाल्याने प्राध्यापक ए. के. मंसूरी यांचे स्पष्टीकरण हे या प्रकरणात पुराव्यासाठी सुरक्षित दस्तावेज आहे म्हणून डॉ. बुटले यांना माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ (१) (छ) (ज) च्या अन्वये देण्यास नकार दिला आहे. जर पोलीस तपासात प्राध्यापक मंसूरी वर आरोप सिध्द झाले तर त्यांना शिक्षा भोगावी लागेल. जर डॉ. बुटले यांची एफ.आय.आर. खोटी किंवा निष्प्रभ ठरविण्यात आली तर डॉ. बुटले वर कोणती कारवाई करावी ही संस्थेला ठरवावे लागेल. अर्थातच जे प्रकरण पोलीस तपासात आहे, जे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे त्याचा निकालावर पुढील निर्णय प्रक्रिया अवलंबून असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ (१) (छ) (ज) तसेच कलम ११ चे आधारे अपीलकर्ता यांचे माहिती अधिकार अधिनियम अंतर्गत केलेली अपील हे मंजूर करण्यात येऊ नये अशी त्यांनी आयोगापुढे विनंती केलेली आहे व लेखी निवेदन दिलेले आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सेवेत

नियुक्ती होतांना जे कागदपत्रे दाखल केली आहेत ती सार्वजनिक अभिलेखे असल्यामुळे ती त्यांना मागण्याचा अधिकार आहे. सार्वजनिक अभिलेखे ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे उपलब्ध करुन घेणे जर आवश्यक असले तरी प्रत्येक प्रकरणामध्ये प्रकरणपरत्वे त्याबाबतचा तपशील जाणून घेऊन निर्णय देणे योग्य असते व त्यामुळे वर नमुद केल्याप्रमाणे व जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी जो निर्णय दिलेला आहे तो योग्य आहे असे दिसून येते. प्रकरण हे माहिती उपलब्ध करुन देणे इथपर्यंत मर्यादित राहिले नाही. जी कागदपत्रे मागण्यात आलेली आहेत त्या कागदपत्रांच्या संदर्भामध्ये आधीच ३ वर्षापासून कार्यवाही सुरु आहे. वास्तविक कागदपत्रे उपलब्ध करुन घेऊन त्या आधारे योग्य ती तक्रार किंवा कारवाई करणे अपेक्षित असते. परंतु या प्रकरणात सर्वच उलट घडलेले दिसून येते. त्यामुळे कागदपत्रांचा गैरवापर होणे हेच दिसून येते व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१०८७-१०९२/१८.९.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२६७/२०१०.

श्री. जिवन तुळशीरामजी फलके,
मु. पो. तेलकामठी, ता. कळमेश्वर,
जि. नागपूर (व्हाया सावनेर) - ४४१ १०७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. बा. ह. पाटील,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.९.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचे कार्यालयामध्ये सचिव, श्री. चंद्रकांत शिक्षण संस्था, तेलकामठी हयांनी सादर

केलेल्या शपथपत्राची प्रमाणित प्रत. सन १९९२-९३ मध्ये श्री. आर. आर. लाखपाले, हयांच्या नियुक्तीला मान्यता देतांना मान्यता पत्र क्रमांक झेडपीएन/शिक्षण मंजूरी/क्यू , दिनांक ३१.१.१९९३ संस्था सचिवाने सादर केलेल्या शपथपत्राची प्रमाणित प्रत तसेच संपूर्ण प्रस्तावाची प्रमाणित प्रत अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ७.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक ९.७.२०१० ला घेण्यात आली. परंतु सुनावणी दरम्यान माहिती उपलब्ध नाही असे सचिवांनी स्पष्ट केले. त्यामुळे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती अद्याप पर्यंत मिळाली नाही व त्यांच्या अर्जाची सुध्दा दखल घेण्यात आलेली नाही. प्रथम अपीलात सुध्दा संस्थेच्या सचिवांनी माहिती उपलब्ध नाही या कारणासाठी अपीलात निर्णय दिलेला नाही. परंतु त्यांनी माहिती ही शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे कार्यालयातील माहिती अधिकारी यांना मागितली होती. ती संस्थेच्या सचिवांना मागितली नव्हती. कार्यालयातील माहिती अधिकारी यांनी माहितीचा शोध घेऊन माहिती उपलब्ध आहे किंवा नाही हे कळविणे आवश्यक होते. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे कार्यालयातून त्यांना सुनावणीकरिता न बोलाविता शिक्षण संस्थेचे सचिवांना बोलाविलेले दिसते. शिक्षण संस्थेकडे अपीलकर्ता यांनी माहिती मागितली नाही व त्यामुळे ते पक्षकार होऊ शकत नाही. त्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी अर्जाची दखल न घेतल्यामुळे माहिती देण्यास टाळाटाळ केलेली आहे व विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांच्या विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाचे कार्यवाहीची शिफारस करणे संयुक्तिक राहील. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील जनमाहिती अधिकारी यांनाच बोलाविणे आवश्यक होते. त्यामुळे माहिती उपलब्ध आहे किंवा नाही हे कळून आले असते. अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जामध्ये निश्चित असे वर्णन केले आहे. माहिती १९९२-९३ ची असली तरी त्यातील मंजूरी प्रस्ताव हा कायम स्वरुपी जतन करुन असावा. त्यामुळे सदरची माहिती त्या नस्तीमधून उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून व जनमाहिती अधिकारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचा त्याच कार्यालयात शोध घेऊन माहिती विनामुल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक २६.४.२०१० च्या अर्जाप्रमाणे अधिनियमाचे कलम ७(१) अन्वये विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही किंवा माहितीच्या संदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला नसल्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी करावयाची असल्याने त्यांचेकडे निर्णयाची प्रत स्वतंत्रपणे पाठविण्यात यावी.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत **<u>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर</u>** यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-        दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१०९३-१०९५/१८.९.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२५०/२०१०.**

सौ. बिना अशोक गायकवाड,
मु. पो. शेगांव (बुज), ता. वरोरा,
जि. चंद्रपूर - ४४२ ९०६. **..... अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. देवकाते,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जनसंपर्क अधिकारी,
विशेष समाज कल्याण अधिकारी,
जात पडताळणी कार्यालय, नविन प्रशासकीय भवन,
चद्रपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
विशेष समाज कल्याण अधिकारी,
जात पडताळणी कार्यालय, नविन प्रशासकीय भवन,
चद्रपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.९.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक १८.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची पुढील सुनावणी आज दिनांक १८.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. माहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. अनील काळे, संशोधन अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक १५.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण

... २

अधिकारी, चंद्रपूर यांचेकडे क्रमांक विजिसकअ/जाप्रत/मुलाखती/ कार्यालय, विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, चंद्रपूर, दिनांक १७.१.२००९ चे पत्राबाबत एकूण ४ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ती यांनी दिनांक २.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ती यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना आता पर्यंत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, दिनांक १६.६.२०१० रोजी जात पडताळणी समिती ही ३ सदस्यीय निमन्यायिक स्वरुपाची असून त्यांचे प्रकरण समितीच्या निर्णयाधीन आहे. त्यावर निर्णय होताच संबंधितास कळविण्यांत येईल. प्रश्नउत्तराच्या स्वरुपात माहिती, माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ती यांना माहिती न मिळाल्यामुळे अपीलकर्ती यांनी दिनांक २.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये निर्णय घेण्यात आलेला नाही. याबद्यल कोणताही खुलासा करण्यात आलेला दिसून येत नाही. मात्र आयोगाची नोटिस निर्गमित झाल्यानंतर दिनांक ८.९.२०१० रोजी त्यांच्या माहितीच्या अर्जातील मुद्यांप्रमाणे एकूण ५ मुद्यावर मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. याचा अर्थ सदरची माहिती त्यांना विलंबाने उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ती यांनी जी माहिती मागितलेली आहे त्यातील प्रश्नाचे माध्यमातून जनमाहिती अधिकारी यांचे अभिमत मागितले नाही तर अर्ज केंव्हा सादर करण्यात आला किंवा कार्यालयास प्राप्त झाला असा तो प्रश्न विचारला आहे. परंतु प्रश्नाचे उत्तर हे कागदपत्राचे स्वरुपात उपलब्ध असल्यास जनमाहिती अधिकारी यांनी देणे आवश्यकच असते. परंतु कोण, किती, केंव्हा, कधी, कां अशा प्रकारचे शब्द दिसले की, ते प्रश्न विचारले आहे व त्याचे सोयीस्कर असे उत्तर नाही द्यावयाचे आहे असा समज माहिती अधिकारी यांनी करुन घेतला आहे. त्याप्रमाणे ते उत्तर पाठवित असतात. त्यांचा गैरसमज दूर करण्याकरिता त्यांना शास्ती करणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ती यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ती यांच्या दिनांक १५.५.२०१० च्या अर्जाचे अनुषंगाने तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २(१) प्रमाणे रुपये ५००/- ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहाचे वेतनातून वसूल करुन लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावे.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-        दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२४१/२०१०.

श्री. अजय बालपुरे,
वकील,
प्लॉट नं. ७, कन्नमवार नगर, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
नगर रचना विभाग,
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.

सौ. सुनिता अलोणी,
जनमाहिती अधिकारी तथा
नगर रचना विभाग,
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.९.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.६.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २४.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची पुढील सुनावणी आज दिनांक १८.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांचेकडे खसरा क्रमांक ८३/२, मौजा गोरेवाडा येथील जमीनीबाबत २००० ते १५.२.२०१० या कालावधीतील अभिन्यास व बांधकाम नकाशा मंजूरीची संपूर्ण फाईल

... २

व कार्यालय टिपणी व सर्व जोडपत्राची प्रत उपलब्ध करुन देणे अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः किंवा प्रतिनिधीद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ४.३.२०१० रोजी अपीलकर्ता यांना प्रथम संपूर्ण धारिकेचे अवलोकन करावे. जेणे करुन आपणांस आवश्यक असलेले व पुरविता येण्याजोगे नेमके दस्तऐवज शुल्क आकारणी करुन उपलब्ध करुन देता येतील असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक १८.३.२०१० रोजी आपणातर्फे अद्याप कोणीही धारिकेचे अवलोकन करण्यास्तव माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना यांचेशी संपर्क साधलेला नाही असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक २९.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २६.५.२०१० रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना दिनांक ४.५.२०१० च्या पत्रात नमुद दस्तावेज विनामुल्य उपलब्ध करुन द्यावेत असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांचे तर्फे प्रतिनिधी म्हणून कु. मानसी खराबे, वकील हया हजर झाल्या असून त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना अद्याप पर्यंत माहिती उपलब्ध झाली नाही. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे अधिकार हा व्यक्तिस दिलेला आहे त्यांच्या प्रतिनिधीस परवानगी देण्याबाबत कोणत्याही प्रकारची तरतुद अधिनियमात दिसून येत नाही. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कलम २ (ज) प्रमाणे "माहितीचा अधिकार" या संज्ञेच्या व्याख्येमध्ये माहिती उपलब्ध करुन देण्याच्या करिता प्राथम्यक्रम दिलेला आहे व त्या प्राथम्यक्रमामध्ये एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे व त्यातून दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिपण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे अशा प्रकारे तरतुद करण्यात आलेली आहे व त्या तरतुदीप्रमाणेच त्यांना दिनांक ४.३.२०१० रोजी धारिकेचे अवलोकन करावे असे कळविण्यात आलेले होते. मात्र दिनांक १८.३.२०१० पर्यंत कोणीही हजर झाले नाही व अपीलकर्ता यांनी कु. मानसी खराबे, वकील यांना कागदपत्रे घेण्यासाठी पाठविण्यात आले असे पत्र दिले. परंतु त्यांचे प्रतिनिधीस मात्र माहिती देता येणार नाही या

कारणासाठी जनमाहिती अधिकारी म्हणून नस्ती दाखविण्यास नकार दिला. परंतु त्यानंतर पुन्हा दिनांक १.४.२०१० रोजी अपीलकर्ता यांनी पत्र पाठविले. दरम्यान नानीक इंटरप्रायजेस यांनी सदरची माहिती उपलब्ध करुन देऊ नये अशा प्रकारची हरकत घेतली आहे. परंतु त्यानंतर नस्तीतील दस्तऐवज हे इतर विभागाशी निगडीत असल्यामुळे अभिन्यास नकाशा व करारनाम्याची प्रत पुरविता येईल. सदर्हु दस्ताऐवज आपणास अपेक्षित असल्यास आपण रुपये ४८/- चा भरणा रोख विभाग, नागपूर सुधार प्रन्यास, मुख्य कार्यालय नागपूर येथे करावा. रक्कम भरणा केल्याच्या पावतीची छायाप्रत या विभागात देउन प्रत प्राप्त करुन घ्यावे असे कळविलेले दिसून येते. मात्र प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला आहे त्यामध्ये विनामुल्य माहिती द्यावी असा निर्णय दिलेला आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रथम अपीलाचा निर्णयामध्ये कोणत्याही प्रकारे जनमाहिती अधिकारी यांनी अधिनियमाचे तरतुदी प्रमाणे प्रक्रिया केली आहे याची दखल घेतलेली दिसून येत नाही. जनमाहिती अधिकारी यांनी अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे प्रक्रिया केलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे हा अधिकार अर्जदारास व्यक्तिशः दिलेला आहे व अर्जदाराचे तर्फे कोणत्याही प्रतिनिधीस परवानगी देण्याची तरतूद नाही. कारण जी कागदपत्रे मागितली जातात किंवा जी माहिती मागितली जाते ती स्विकारली किंवा नाही किंवा ती गोपनीय असल्यास ती अर्जदारास उपलब्ध होऊ शकते व त्याची जबाबदारी हेही अर्जदारास कळणे आवश्यक असते. अर्जदार हे वकील आहेत व वकीलपत्र हे सर्व ठिकाणी ग्राहय असते असे नाही. वकीलपत्र हे फक्त एखाद्या न्यायालयामध्ये किंवा न्यायाधिकरणाकडे ॲडव्होकेट ॲक्ट प्रमाणे दाखल करणे संयुक्तिक असते. ज्या ठिकाणी वैयक्तिक अधिकार दिलेला आहे त्या ठिकाणी प्रतिनिधी पाठविणे हे अभिप्रेत नाही व त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदाराचे प्रतिनिधीस नस्ती दाखविली नाही ही त्यांची कृती अतिशय योग्य आहे. हयाबाबतची दखल प्रथम अपीलीय अधिकारी यांनी घेणे आवश्यक होते. यास नानीक इंटरप्रायजेस हरकत घेणे त्याबाबत नानीक इंटरप्रायजेसच्या बाबतची कागदपत्रे असतील तर योग्य होईल. परंतु आराखडा हा जो मंजूर होतो त्यामध्ये ज्या अटी व शर्ती असतात त्यामध्ये ना हरकत प्रमाणपत्र असते त्या शिवाय आराखडा मंजूर होत नाही. त्यामुळे त्या आराखडयाची कागदपत्रे ही सार्वजनिक अभिलेखाचा भाग होतो. तसेच नस्तीमधील टिपणी, विभागातील टिपणीची आवश्यकता असल्यास ती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक असते. त्याकरिता

जनमाहिती अधिकारी यांनी नस्तीचे निरिक्षण करावे व आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन घ्यावी हे योग्यरितीने कळविले होते. यावरुन जनमाहिती अधिकारी यांनी जी प्रक्रिया केलेली आहे ती विहित मुदतीत केलेली असल्यामुळे विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. त्याकरिता प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय रद्य करणे आवश्यक आहे. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन घेण्याकरिता मात्र सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना नस्तीतील सर्व कागदपत्रांच्या पृष्ठांची संख्या व प्रत्येक प्रतीकरिता रुपये २/- प्रमाणे खर्चाचे विवरण हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत कळवावे व अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केल्यानंतर त्यांना पोस्टाच्या खर्चासहीत खर्चाचा भरणा केल्यानंतर त्यांना किंवा व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१०९९-११०२/१८.९.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२७९/२०१०.**

श्री. ईश्वर तुळशीरामजी अमृतकर,
वार्ड नं. ३, भगतसिंग चौक, राधाकृष्ण मंदिराजवळ,
ता. नागभिड, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. द. शं. धोपटे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, नागभिड,
जि. चंद्रपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, नागभिड,
जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.९.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. माहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. अशोक मेश्राम, सहाय्यक माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, नागभिड यांचेकडे अर्जदाराने प.नं.ह. ११ भुमापक क्रमांक १७३ आराजी २.१० हे.आर.

... २

जमीनीस पाणी मिळण्याकरिता अनेक वेळा अर्ज सादर करुन अर्जदारास पाणी देण्यात आले नाही त्या प्रकरणी कोणत्या नियमाने पाणी दिले नाही याबद्यलची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २९.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे दिनांक ३०.७.२०१० रोजी नुकसान भरपाईची कार्यवाही हया कार्यालयाकडून होत नसल्यामुळे हयाबाबतचे पत्र देता येत नाही. राज्य माहिती आयोगाकडे आपण अपील अर्ज सादर करावे. ग्राम पंचायत, नागभिड हयांचेकडे झेरॉक्सचे पैसे भरुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोागाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, तलावाचे पाणी त्यांना नंतर दिल्यामुळे त्यांच्या शेतीचे नुकसान झाले आहे तरी तलावामध्ये अतिरिक्त पाणी असते. पाणी कोणत्या नियमाप्रमाणे दिले नाही याबद्यलची माहिती त्यांनी संवर्ग विकास अधिकारी यांना मागितली होती. संवर्ग विकास अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरची माहिती ही ग्रामपंचायतीच्या संदर्भात असल्यामुळे दिनांक ४.६.२०१० रोजी अपीलाची सुनावणी घेतली व त्या सुनावणीमध्ये सचिव, ग्राम पंचायत यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे सांगितले. परंतु सचिव, ग्रामपंचायत यांनी कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यावर सचिव, ग्रामपंचायत यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांचा ओलीतांचा हक्क नसल्याने त्यांना तलावाचे पाणी देण्यात येत नाही. तसेच देवतलाव पाणी वाटप समितीने निर्णय घेतला नसल्याने त्यांना पाणी देण्यात आले नाही. परंतु ही बाब अपीलकर्ता यांना कळविण्यात आली नाही. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी वेळोवेळी पाणी मिळण्याकरिता अर्ज सुध्दा दिला होता. परंतु त्यांना कोणतीही माहिती देण्यात आली नाही व कोणतेही कारण दिले नाही. संवर्ग विकास अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, दिनांक २४.७.२००९ रोजी उपविभागीय अधिकारी यांचे निर्णयात जो निर्णय झालेला आहे त्या निर्णयामध्ये अर्जदाराच्या जमीनीस देवतलावाचे वलीताचे कायमचे निस्तार हक्क लागू करता येत नाही असा निर्णय दिलेला आहे. परंतु त्याच निर्णयामध्ये अपीलकर्ता यांनी असे निदर्शनास आणले की, नागभिड येथील देवतलावाचे पाणी प्रथम निस्तार

धारक कास्तकारांना घेण्याचा हक्क असल्यामुळे त्यांना पाणी वाटप झाल्यानंतर तलावात पाणी उरत असल्यास पाणी वाटप कमिटी व निस्तारधारक शेतकरी यांना विचारात घेऊन व आवश्यक पाण्याची डिमांड भरुन पाणी देता येईल अशी शिफारस केली आहे. असे असतांना व आवश्यक त्या नियमानुसार डिमांड भरण्यास तयार असले तरी त्यांच्या कोणत्याही अर्जाचे उत्तर दिलेले नाही व म्हणूनच त्यांनी माहिती मागितलेली आहे. ग्राम पंचायत सचिव यांनी वरिष्ठ समितीने निर्णय घेतला नाही असे कळविणे संयुक्तिक झाले असते. परंतु त्याही बाबत काहीही कळविण्यात आले नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांना विषय समजला नाही त्यांना विषय समजला असता तर सदरचा अर्ज हा सुरुवातीलाच ग्रामपंचायतीकडे हस्तांतर केला असता. उडवाउडवीचे उत्तर दिले असल्यामुळे प्रथम अपीलामध्ये नुकसान भरपाईची मागणी केली आहे. परंतु अशा प्रकारे नुकसान भरपाई मिळत नसल्यामुळे प्रथम अपील व द्वितीय अपीलात माहिती न मिळाल्यामुळे नुकसान झाले असले तरी कार्यवाही करुन मिळत नाही. सदरच्या प्रकरणात माहिती न मिळाल्यामुळे कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेले नाही. पाणी वाटप केले नाही तो हक्काचा प्रश्न आहे व त्यामुळे नुकसान भरपाईचा प्रश्न उपस्थित होत नाही व प्रथम अपीलामध्ये नवीन मुद्दे किंवा नुकसान भरपाई मागता येत नाही. त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय जो झाला आहे तो त्या अनुषंगाने दिलेला आहे. मात्र अपीलकर्ता यांच्या पाणी वाटपाचे संदर्भामधील अर्जाचे संदर्भात ग्रामपंचायत किंवा पाणी वाटप कमिटीने काय निर्णय घेतला या बद्यलची माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे व हीच माहिती जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. त्यामुळे जनमाहिती अधिकारी किंवा सहाय्यक माहिती अधिकारी किंवा सचिव, ग्राम पंचायत जे दोषी असतील त्यांचे विरुध्द रुपये ५००/- ची शास्ती लादण्यात येते. मागितलेली माहिती ज्या कार्यालयाशी संबंधित असेल त्या कार्यालयाकडे सुरुवातीला ५ दिवसांचे आंत मध्ये अर्ज हस्तांतर करावयाचा असतो. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जबाबदारी निश्चित करुन शास्तीची वसुली करणे संयुक्तिक राहिल. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांच्या दिनांक ७.५.२०१० च्या अर्जातील मागितलेल्या माहितीचे प्रमाणे माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) जनमाहिती अधिकारी पंचायत समिती कार्यालय, सहाय्यक जनमाहिती अधिकारी किंवा खंड विकास अधिकारी किंवा सचिव, ग्राम पंचायत यापैकी ३० दिवसांत माहिती उपलब्ध करुन न देण्यास जे जबाबदार असतील त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रुपये ५००/- ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली त्यांचे दरमहाचे वेतनातून वसूल करुन लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावे.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत **<u>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर</u>** यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-        दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२८१/२०१०.

श्री. लक्ष्मण जयदेव पराते,
आंधळगांव रोड, टिळक वार्ड,
ता. मोहाडी, जि. भंडारा. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. जे. आर. गहाणे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, मोहाडी,
जि. भंडारा.

श्री. एस. टी. भाजीपाले,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्राम विकास अधिकारी,
ग्रामपंचायत मोहाडी,
जि. भंडारा. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.९.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सरपंच/सचिव, ग्राम पंचायत कार्यालय, मोहाडी यांचेकडे मौजा वडेगांव येथील शिट नं. १, नं. भु. क्र. ३ शासकीय जागेचे कागदपत्र

... २

मिळणेबाबत तसेच शासकीय जागेबाबत गैरअर्जदार लक्ष्मणरावजी निनावे यांचे एकूण दस्ताऐवज सादर केल्याचे पुरावे व ग्रामपंचायत कार्यालयाकडून नाव व प्रोसेडींगची प्रत मिळण्याबाबत त्या संदर्भात एकूण ६ मुद्यांवर तपशीलवार माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३१.६.२०१० रोजी रुपये १०/- फी जमा करावी व माहिती घेऊन जावी असे कळविलेले दिसून येते. परंतु फीचा भरणा केला नसल्यामुळे दिनांक ६.७.२०१० रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक २६.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १८.८.२०१० रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांनी अपील सुनावणीचे पत्र घेण्यास नकार दिला. तसेच माहिती घेण्यास नकार दिले या कारणावरुन सदरचे अपील खारीज केलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना चुकीची माहिती देत होते म्हणून त्यांनी माहिती घेतली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाकडे असे सांगितले की, माहिती त्यांनी लिफाफा बंद करुन ठेवली होती व तो लिफाफा आज ही बंद आहे व कार्यालयातील मुळ प्रत वाचून माहिती चुकीची देत आहेत म्हणून त्यांनी माहिती घेतली नाही. त्यांचे घरी जाऊन सुध्दा कार्यालयातील कर्मचारी गेले असता त्यांनी माहिती घेण्यास नकार दिला. आधी त्यांनी फी भरावयास पाहिजे त्यानंतर माहिती चुकीची आहे की बरोबर हे सिध्द झाले असते. यावरुन त्यांनी माहितीची आवश्यकता नाही असे दिसून येते असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आलेले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणलेली बाब ही खरी आहे. असे अपीलकर्ता यांनी मान्य केले. त्यामुळे अपीलकर्ताच माहिती घेण्यास नकार देतो. फी भरत नाही याकारणासाठी सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ३

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये किरकोळ अर्ज क्रमांक ६/२०१०.**

श्री. विचित्रकुमार दिगम्बरजी कटेर,
मु. डोंगरगांव, पो. चिखली,
ता. तिरोडा, जि. गोंदिया - ४४१ ९११. **..... अर्जदार**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संचालक व्यवस्थापक,
दि गोंदिया डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑप. बँक लि.
दुर्गा चौक, ता. जि. गोंदिया.

जनमाहिती अधिकारी तथा
दि गोंदिया डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑप. बँक लि.
दुर्गा चौक, ता. जि. गोंदिया. **..... गैरअर्जदार**

**(आदेश पारित दिनांक २०.९.२०१०)**

**नि र्ण य**

गैरअर्जदार यांनी दिनांक ११.६.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये किरकोळ अर्ज दाखल केले आहे. अर्जदार व गैरअर्जदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.९.२०१० रोजी सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या सुनावणी आज दिनांक २०.९.२०१० रोजी घेण्यात आली. अर्जदार हे उपस्थित आहेत व गैरअर्जदार यांचे तर्फे श्री. पी. डी. पिंपळकुटे, प्रथम श्रेणी अधिकारी हे हजर आहेत.

२. सदरचा अर्ज हा अपील क्रमांक ५७३/२०१० च्या निर्णयातून उद्‌भवला आहे. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा दि गोंदिया डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑप. बँक लि.दुर्गा चौक, ता. जि. गोंदिया यांचेकडे माहिती मागितली होती. माहिती मिळाली नाही म्हणून प्रथम अपील दाखल केले व

... २

प्रथम अपीलाचे माध्यमातून सुध्दा निर्णय झाला नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले होते. सुनावणीस दि गोंदिया डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑप. बँक लि. चे अधिकारी उपस्थित न झाल्यामुळे त्यांना कारणे दाखवा अशा प्रकारची नोटीस दिली होती व त्याप्रमाणे आज त्यांनी त्यांचा खुलासा सादर केलेला आहे व त्यास किरकोळ अर्ज म्हणून संबोधिले आहे. त्यातून दि गोंदिया डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑप. बँक लि ही सहकारी बॅंक असल्यामुळे व शासनाकडून कोणत्याही प्रकारचा निधी उपलब्ध होत नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा लागू होत नाही असा निर्णय मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी दिलेला असल्यामुळे व आयोगाने सुध्दा यापूर्वी निर्णय दिलेला असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात यावे अशी विनंती केली होती. त्याप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीतील कलम २ (ज) मध्ये सार्वजनिक प्राधिकरण या व्याख्येत सहकारी बँक येत नसल्यामुळे सदरच्या अधिनियमाचे तरतुदी लागू होत नाही त्यामुळे सदरचा किरकोळ अर्ज हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) किरकोळ अर्ज हे खारीज करण्यात येते.

२) अर्जदार व गैरअर्जदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२८४/२०१०.**

श्री. चुन्नीलाल शामलाल चौरावार,
श्रीनगर, चंद्रशेखर वार्ड, मराठा वाईन्स जवळ,
ता. जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. जे. एच. भानुसे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
(रोजगार हमी योजना) ता.जि. गोंदिया.

श्री. डी. के. भगत,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
(रोजगार हमी योजना) ता.जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.९.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.६.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (रो.ह.यो), गोंदिया यांचे कार्यालयामध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग गोंदियाच्या

... २

ऑफीस क्षेत्रामध्ये तयार होत असलेल्या कल्चरल हॉल बाबत व श्री. घनश्याम सोलंकी, शाखा अभियंता, उपविभाग, गोंदिया यांच्या द्वारे किती कामे करविण्यात आली अशी एकूण ४ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ४.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले व त्या प्रथम अपीलाचे अनुषंगाने दिनांक १७.५.२०१० रोजी अपीलकर्ता यांना ४ मुद्यांमध्ये सहपत्रासहीत माहिती दिलेली दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना आता पर्यंत माहिती उपलब्ध झाली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा अर्ज हा मुळात दिनांक २९.३.२०१० रोजी मिळाला होता व मार्च अखेर असल्यामुळे अपीलकर्ता यांच्या अर्जावर कोणत्याही प्रकारची माहिती किंवा उत्तर देता आले नाही. परंतु मार्च अखेर हे १२-१३ तारखेपर्यंत संपला असला तरी पुढील दिवसाकरिता माहिती देता आली असती व माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात कोणतीही प्रक्रिया केलेली दिसून येत नाही. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील केल्यानंतरच माहिती देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांना सदरची माहिती दिनांक १७.५.२०१० रोजी पोस्टाने पाठविली असता ती अपीलकर्ता यांनी घेण्यास नकार दिला. पोस्टमनने घेण्यास नकार दिला असा शेरा दिलेला आहे. अर्थात माहिती ३० दिवसानंतर उपलब्ध करुन दिल्यास अपीलकर्ता यांनी घेण्यास नकार दिलेला दिसून येतो. माहितीचा अर्ज कार्यालयात आल्यावर सुरवातीच्या ५ दिवसांत त्याबाबतची प्रक्रिया करावयाची असते. परंतु ३० दिवसांचे कालावधीतील सुरवातीच्या कालावधीची काहीही प्रक्रिया केलेली आढळून येत नाही. त्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जात मागितल्या नुसार मुद्येनिहाय माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक २९.३.२०१० च्या अर्जाचे अनुषंगाने ३० दिवसाचे आंत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नव्हती व दखल घेतली नव्हती. त्यामुळे जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रुपये ५०००/- शास्ती लादण्यात येते.

३) सदरच्या शास्तीची वसुली जनमाहिती अधिकारी यांचे दरमहाचे वेतनातून वसूल करुन लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावे.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-        दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२९२/२०१०.**

श्री. शेख सलीम शेख अकबर,
इस्माईलपूरा, ता. कामठी, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम.एम. शहा,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, वरोरा, जि. चंद्रपूर.

श्री. वाय. टि. देवतळे,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रशासन अधिकारी, (शिक्षण),
नगर परिषद, वरोरा, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.९.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ४.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, वरोरा यांचेकडे शिक्षण विभाग मे उर्दु शिक्षक निश्चितीकरण और शिक्षा का समायोजन की माहिती उर्दु माध्यम में शिक्षक मंजूर पद की माहिती. अतिरिक्त करके नगर परिषद, कामठी मे समायोजन किया गया उसको वापस

... २

बुलाने हेतु कार्यवाही की माहिती और रिक्त पद की माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती शिघ्र टपालाने घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १२.४.२०१० रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २२.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३०.७.२०१० रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांनी नंतर केलेल्या अर्जाचे संदर्भातील माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता गैरहजर आहेत. परंतु अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या मिळालेल्या माहितीतून पुन्हा दिनांक २६.४.२०१० रोजी साधा अर्ज केला. त्या अर्जाचे संदर्भात दिनांक ११.५.२०१० रोजी त्यांना उत्तर देण्यात आलेले आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये अपीलकर्ता यांच्या साध्या अर्जाचे संदर्भात सुध्दा माहिती पुरवावी असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना सर्व माहिती दिनांक २.८.२०१० व दिनांक १६.८.२०१० रोजी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता हे मिळालेल्या माहितीतून पुन्हा अर्ज करीत असल्यामुळे माहिती उपलब्ध झाली नाही अशा प्रकारे प्रथम अपीलामध्ये तक्रार करीत आहेत असे दिसून येते. परंतु त्यांना संपूर्ण माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१११५-१११६/२१.९.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२९१/२०१०.**

श्री. सुदाम तुकारामजी चापले,
काल्यायणी दवाखान्या मागे, बालाजी वार्ड,
चंद्रपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आ. डो. पेंदाराम,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख,
जि. चंद्रपूर.

श्री. एस. जी. गौरकर,
जनमाहिती अधिकारी तथा
तालुका निरिक्षक भुमि अभिलेख,
ता. जि. चंद्रपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.९.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ४.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.५.२०१० रोजी अपीलकर्ता यांनी तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, चंद्रपूर यांचेकडे राज्य माहिती आयुक्त, नागपूर यांचेकडे केलेल्या अपील क्रमांक ८९६/२००९

... २

मधील दिनांक ३१.१०.२००९ च्या आदेशाप्रमाणे जागेची मोजणी कां केली नाही. जागेची मोजणी करुन जागेचा नकाशा पाठवावा. बांधकामाची माहिती अशा प्रकारे माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ७.६.२०१० रोजी अपीलकर्ता यांना संपूर्ण वस्तुस्थिती कळविलेली दिसून येते व तालुका निरिक्षक भूमि अभिलेख, चंद्रपूर यांनी अधिक्षक, भुमी अभिलेख, चंद्रपूर यांना पाठविलेल्या अहवालाची प्रत सुध्दा दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे त्यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. परंतु आयोगाचे निर्णयाप्रमाणे मौका चौकशी करुन पुन्हा दिनांक १९.७.२०१० रोजी अधिक्षक, भूमि अभिलेख यांनी तालुका भूमि अभिलेख यांना आयोगाचे आदेशाप्रमाणे अहवाल कार्यालयास सादर करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, आयोगाचे आदेशाप्रमाणे दिनांक ५.१२.२००९ रोजी अधिक्षक भूमी अभिलेख, चंद्रपूर यांचेकडे अहवाल सादर केलेला होता. दिनांक ३१.१०.२००९ रोजी अपीलकर्ता हजर होते. त्यानंतर सामायिक हिस्स्याच्या संदर्भात आदेश दिले व त्याप्रमाणे मौका चौकशी करुन नवीन नकाशा तयार करुन अपीलकर्ता यांच्या हिस्स्याची जागा त्यात दर्शविण्यात आलेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरची जागा ही सामायिक असल्यामुळे ५०% हिस्सा दाखविण्यात यावा. परंतु मौका चौकशी करतांना जेवढी जागा कब्जात आहे तेवढी करता येते. नकाशा प्रमाणे जागा दाखविण्याचा अधिकार नाही. तसा अधिकार भुमि अभिलेख यांचा नाही. सामायिक जागा असल्यामुळे तो हिस्स्याचा प्रश्न आहे. त्यामुळे मा.न्यायालयाकडून, दिवाणी न्यायालयाकडून मंजूर करणे कायदेशीर होते. त्याबाबत त्यांना कळविण्यात आले परंतु त्यांना मान्य नाही. राज्य माहिती आयोगाचे आदेशाप्रमाणेच कार्यवाही केलेली आहे. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास विनंती आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे "माहिती" ही कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध असल्यास त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. कोणत्याही प्रकरणात कारवाई करुन देण्याची तरतूद नाही. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचा युक्तिवाद व कागदपत्रे पाहिल्यानंतर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२९०/२०१०.**

श्री. हिराजी ब्रम्हानंद कन्नाके,
मु. जुने हनुमान मंदिराजवळ,
डॉ. झुरे यांचे दवाखान्याजवळ,
ता. गोंडपिपरी, जि. चंद्रपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, चंद्रपूर.

श्री. हो. गो. डेकाटे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, चंद्रपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.९.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ४.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे दिनांक १९.७.२००८ ला श्री. हिराजी कन्नाके व तुकाराम गेडाम यांना केंद्र प्रमुख पदावरुन पदावनत करण्यापूर्वी सादर केलेली मंजूरीस्तव टिपणीची सत्यप्रत देणे. पदावनत

... २

करण्यापूर्वी शासन स्तरावरुन परवानगी घेण्यात आली काय ? सध्या अनुसुचित जमातीचे किती केंद्र प्रमुख कार्य करीत आहेत त्यांचे वैधता जात प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती देण्यात यावे. रोस्टर रजिस्टरवर मा.सहआयुक्त, नागपूर यांनी श्री. नंदनवार व श्रीमती निखारे बाबत दिलेल्या सुचनांचे पालन का केले नाही २००५ अशा प्रकारे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती ही दिनांक ७.६.२०१० रोजी अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात आली. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १६.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ४.८.२०१० रोजी देण्यात आला असून माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे टिपणीवर नमुद केले आहे व उपस्थितांच्या सहया घेतल्या आहेत. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी माहिती चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली असे कारण देऊन द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना जी माहिती दिली ती चुकीची आहे. त्याबाबतचा खुलासा केलेला नाही. मात्र उपलब्ध झालेल्या माहितीमधून त्रुटी काढून ती माहिती चुकीची आहे असे त्यांचे म्हणणे आहे. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, जशी माहिती आहे त्याची छायाकिंत प्रत त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता जशी माहिती आहे तशीच माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/११२०-११२१/२१.९.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये किरकोळ अर्ज क्रमांक ७/२०१० व किरकोळ अर्ज क्रमांक ८/२०१०.**

श्री. भास्कर मिठुजी डोंगरे,
कस्तुरबा वार्ड, पंचशील झेंडयाजवळ,
जि. गोंदिया - ४४१ ६०१. **..... अर्जदार**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अध्यक्ष,
दिक्षा भूमी शिक्षण संस्था,
सनफ्लॅग गेट जवळ, वरठी, भंडारा रोड,
ता. मोहाडी, जि. भंडारा.

सौ. सुरेखा गणविर,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
दिक्षा भूमी शिक्षण संस्था,
सनफ्लॅग गेट जवळ, वरठी, भंडारा रोड,
ता. मोहाडी, जि. भंडारा.

श्री. डॉ. एस. एम. कोरे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अध्यक्ष,
श्री. संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्था, कातुर्ली,
पो. सितेपार, ता. आमगांव, जि. गोंदिया.

श्री. किशोर कोरे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
श्री. संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्था, कातुर्ली,
पो. सितेपार, ता. आमगांव, जि. गोंदिया. **..... गैरअर्जदार**

**(आदेश पारित दिनांक २१.९.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

... २

अर्जदार यांनी दिनांक १२.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन किरकोळ अर्ज दाखल केले आहेत. अर्जदार व गैरअर्जदार यांना आयोगाचे कार्यालयातून न्दिनांक २.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१.९.२०१० रोजी सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरची सुनावणी आज दिनांक २१.९.२०१० रोजी घेण्यात आली. अर्जदार व गैरअर्जदार हे हजर आहेत.

२. सदरच्या दोन्ही किरकोळ अर्जाचे संदर्भामध्ये माहिती उपलब्ध झाली असे अर्जदार यांनी सांगितले व तसे लेखी सुध्दा दिले. त्यामुळे दोन्ही किरकोळ अर्ज खारीज करण्यात येतात.

## आ दे श

१) अर्जदार यांची दोन्ही किरकोळ अर्ज हे खारीज करण्यात येते.

२) अर्जदार व गैरअर्जदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/११२२-११२३/२१.९.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२९४/२०१०.**

सौ. कालिंदी शांतीलाल धमगाये,
द्वारा - रामेश्वर राऊत, शास्त्रीवार्ड,
आंबेडकर शाळेजवळ,
ता. जि. गोंदिया. **..... अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्रीमती ममता झा,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, गोंदिया.

जनमाहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, गोंदिया. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.९.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक ३१.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ४.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २२.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती यांच्या तर्फे त्यांचे पती हे उपस्थित आहेत व माहिती अधिकारी हे गैरहजर. आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक १६.१०.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडे दिनांक १.८.२००९ ला अर्जदाराने शिक्षण विभाग शिक्षणाधिकारी यांना दिलेल्या

... २

अर्जावरील कारवाई बाबत पुर्ववत रुजू करुन स्थगितवेतन अदा करण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ती यांना दिनांक ९.११.२००९ रोजी माहितीची सत्यप्रत उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ती यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ती यांनी दिनांक २०.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २४.१२.२००९ रोजी देण्यात आलेला असून श्री. कालिंदी शांतीलाल धमगाये यांना मा. न्यायालयाचे आदेशानुसार मुख्याध्यापक पदावर रुजू केल्याबाबतच्या प्रकरणी कोणती कार्यवाही केलेली आहे तसे कळविण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्याची व्यवस्था त्वरित करावी असा निर्णय दिला आहे. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही याकारणासाठी अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ती यांचे वतीने त्यांचे पती यांना प्रकृती अस्वास्थाचे कारणामुळे प्राधिकार पत्र दिलेले आहे व त्यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितलेली होती ती पुर्ववत रुजू करुन घेण्यास व स्थगित वेतन अदा करण्याची माहिती मागितली होती. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मा. न्यायालयाचे आदेशानुसार योग्य ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा अशा प्रकारे श्री. आर. एस. रामटेके, अध्यक्ष, महात्मा ज्योतिबा फुले शिक्षण मंडळ, गोंदिया यांना कळविण्यात आले होते. परंतु त्यावर त्यांनी कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली दिसून येत नाही. त्यामुळे त्यांनी पुन्हा न्यायालयाचे आदेशानुसार कार्यवाही करावी असे कळविण्यात आले होते व हीच माहिती अपीलकर्ती यांना उपलब्ध करुन दिली आहे. शिक्षण संस्था ही स्वायत्य संस्था असल्यामुळे मा. न्यायालयाचे निर्णयाप्रमाणे कार्यवाही ही शिक्षण संस्थेने करावयाची आहे व त्याप्रमाणे त्यांना कळविले आहे. परंतु शिक्षण संस्थेने शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे आदेशाचे पालन न केल्यामुळे संस्थेची मान्यता काढण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे. तसेच मा. न्यायालयाचे निर्णयाची अंमलबजावणी न केल्यामुळे अवमान याचिका केली आहे. शिक्षणाधिकारी यांचे कार्यालयाकडून जी कार्यवाही झाली आहे ती माहिती दिली आहे. यावरुन सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-        दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२९७/२०१०.**

श्री. तपसकुमार तारकचंद्र बोस,
प्लॉट नं. १९, दाभा ले आऊट,
जी.पी. सोसायटी, दाभा,
नागपूर - ४४० ०२३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.

श्री. डी. एम. सोनावणे,
जनमाहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, (मुख्यालय)
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.९.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.९.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ४.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २२.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. (a) Copy of the information provided by State Public Information Officer, office of the Chief Secretary dated

२३.१२.२००६ on encl.(१.(b)) (b) Copy of the information asked from office of the Chief Secretary, State of Maharashtra, dated १५.१२.२००६ on encl.१.(c) & १.(d) (c) Copy of the communication received from Rashtrapati Bhavan dated ३rd August, २००५ on encl.(१(d)) (d) Copy of the Statement made before local media on the issue of unconstitutional act, "The Nagpur Improvement Trust Act, १९३६" dated १४.७.२००५. Photocopy of the news of २५.१.२०१०. Photocpy of the news of २.२.२०१०. सदरच्या अर्जाचे सोबत त्यांनी पुन्हा ८ मुद्दे उपस्थित केलेले आहेत व त्यामध्ये स्पष्टीकरण दिलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १८.३.२०१० रोजी एकूण ८ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ११.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ४.६.२०१० रोजी देण्यात आलेला असून कार्यकारी अभियंता (मुख्यालय) यांचे कार्यालयात जाऊन उपलब्ध अभिलेखाचे अवलोकन करावे. कार्यकारी अभियंता (मुख्यालय) तथा माहिती अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांनी अपीलार्थीस संबंधित अभिलेख अवलोकनार्थ उपलब्ध करुन द्यावी व अपीलार्थी यांनी मुळ अर्जात मागितलेले दस्तावेज विनामुल्य उपलब्ध करुन द्यावेत असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यानंतर मात्र अपीलकर्ता यांनी अभिलेखाचे निरिक्षण न करता राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपील मेमोमध्ये अपीलकर्ता यांनी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्या मुद्यांचा व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदींचा काहीही संबंध नाही. प्रथम अपीलात किंवा द्वितीय अपीलामध्ये माहिती कोणती मागितलेली आहे ती योग्यरितीने दिली आहे किंवा नाही. मुदतीत दिली आहे किं वा नाही एवढेच अपील करण्याचे कारण असते. परंतु अपीलकर्ता यांच्या द्वितीय अपील मेमोमध्ये राष्ट्रपतींनी नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर असंवैधानिक असल्यामुळे अशा प्रकारची त्यांची मागणी दिसून येते व महामहीम राष्ट्रपती यांनी राज्याच्या मुख्य सचिवांस तशा प्रकारचे आदेश दिलेले आहेत असे त्यांचे म्हणणे दिसून येते व दिनांक २३.१२.२००६ च्या पत्रामध्ये अवर सचिव यांनी नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांचेकडे माहितीचा अर्ज सादर करणे योग्य होईल असे कळविले असल्यामुळे त्यांना माहिती मागितलेली दिसून येते.

परंतु जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मा. मुख्य सचिव यांचे पत्र हे नागपुर सुधार प्रन्यास, नागपूरकडे आलेले नाही. त्यामुळे त्यांना तशी माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. अपीलकर्ता यांचा भारतीय संविधान व कायदा व पत्रे यांचा दांडगा अभ्यास दिसून येतो व त्यामुळेच त्यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये संविधानाच्या अनुच्छेद ७३, ७४ च्या संदर्भामध्ये उल्लेख करुन नागपूर सुधार प्रन्यास हे असंवैधानिक आहे व ते रद्य करावे अशी मागणी केलेली आहे.

४. परंतु नागपूर सुधार प्रन्यासचा अधिनियम हा राज्य विधान मंडळाने पारित केलेला अधिनियम आहे. तो सदरचा अधिनियम जो पर्यंत मा. उच्च न्यायालय किंवा मा. सर्वोच्च न्यायालय असंवैधानिक असे जाहीर करीत नाही तो पर्यंत त्या कायद्याची अंमलबजावणी सुरु राहिल किंवा राज्य विधान मंडळाने निरसित केले तर त्यांची अंबलबजावणी संपुष्टात येईल. कोणतेही मुख्य सचिव किंवा कोणतेही मुख्य पदस्थ पत्राप्रमाणे व आदेशाप्रमाणे राज्य विधान मंडळ कायदा रद्य करुन देण्याचे आदेश देता येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती दिलेली आहे ती योग्य दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२९९/२०१०.

श्री. रामदास दशरथजी दहाट,
द्वारा - श्री. जी. ए. बन्सोड,
६५, विवेकानंद नंगर, साई मंदीर मागे,
वर्धा रोड, नागपूर - ४४० ०१५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. अ. मु. सोलेगांवकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसचिव, (सेवा ४)
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.

श्री. र. आ. नागरगोजे,
जनमाहिती अधिकारी तथा
अवर सचिव,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.९.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.९.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ४.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २२.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे शिक्षणाधिकारी यांनी दिनांक १९.११.२००९ च्या प्रस्तावानुसार केलेल्या कार्यवाहीची तसेच शिक्षण उपसचालक, नागपूर व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांच्या स्पष्टीकरणाची प्रमाणित प्रत देऊन माहिती द्यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने

दिनांक १०.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव यांनी आपल्या अर्जातील विषय शालेय शिक्षण विभागाशी संबंधित असल्याने आपला हा अर्ज त्या विभागाकडे उचित कार्यवाहीसाठी हस्तांतरीत करण्यात येत आहे. यासंबंधातील पुढील पत्रव्यवहार कृपया राज्य जनमाहिती अधिकारी शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ यांचेकडे करण्याची आपणांस विनंती आहे. असे त्यांना कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी प्रथम अपील हे दिनांक १०.७.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसचिव (सेवा-४) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ यांचेकडे दाखल केले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २०.८.२०१० रोजी निर्णय दिलेला असून अपीलकर्ता यांना दिलेले जनमाहिती अधिकारी यांचे उत्तर योग्य आहे असा निर्णय देऊन अपील खारीज केलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, वित्त विभागाने ज्या त्रुटया किंवा आक्षेप घेतला असेल त्या आक्षेप किंवा त्रुटयांची माहिती त्यांनी मागितली होती. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाकडे असे सांगितले की, त्यांच्या वरील अर्जामध्ये तशी मागणी नाही व मंत्रालयीन कार्य पध्दती प्रमाणे आलेल्या नस्तीवर त्रुटी किंवा आक्षेप काढला जातो व त्याबाबत प्रत दाखविण्यात येते. परंतु त्यासंदर्भातील नस्तीचा उल्लेख केल्यावर तशी माहिती उपलब्ध होऊ शकते. तशा नस्तीचा उल्लेख केलेला नाही व शिक्षणाधिकारी यांच्या प्रस्तावावर कार्यवाही मागितली ती अर्थातच शालेय शिक्षण विभागांनी करावयाची आहे व त्याप्रमाणे त्यांना कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे त्यांनी पुढील कार्यवाही केली असती तर त्यांना कदाचित शालेय शिक्षण विभागाकडून माहिती उपलब्ध झाली असती. परंतु त्यांनी पुन्हा प्रथम अपील हे वित्त विभागाकडे केले व द्वितीय अपील मध्ये वित्त विभागातील जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांना उत्तरवादी दाखविले आहे. त्यामुळे आज आयोगापुढे हजर राहून सुध्दा त्यांचे उत्तर ते कायम आहे व शालेय शिक्षण विभागाकडे त्यांचा अर्ज हस्तांतर केला असून सुध्दा त्यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये शालेय शिक्षण विभागाकडे माहिती अधिकाऱ्याचा उल्लेख केला नसल्यामुळे ते आज हजर नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना वित्त विभागाने दिलेली माहिती योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२९५/२०१०.

श्री. अण्णा मारोतराव रायबोले,
भामटी (परसोडी), डॉ. साबळे यांचे दवाखान्याजवळ,
नागपूर - ४४० ०२२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एच. एल. उंम्बरकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर.

श्री. बी. व्ही. चौधरी,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन),
पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.९.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २.९.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ४.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २२.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचेकडे महाराष्ट्र शासन पत्र क्र. एमआयएस-१००२/मा.अ./२६/पोल-६ अ, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ३२, दिनांक ३.३.२०१० अन्वये आम्हाला शासनाकडून पत्र प्राप्त झाले असून त्यात नमुद दिनांक २२.१२.२००९ चे पत्र कार्यासन, पोल-६ अ, गृह विभाग या कार्यासनात प्राप्त झालेले नाही. मात्र

... २

आपण नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात दिलेल्या दिनांक २१.१२.२००९ च्या पत्रावर पोलीस आयुक्त, नागपूर यांचा अहवाल मागितलेला आहे असे कळविलेले आहे. तरी आपणाकडून शासनास सादर केलेल्या अहवालाची प्रतची मला आवश्यकता असल्याने कृपया मला देण्यात यावी ही विनंती. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३.४.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ५.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १६.८.२०१० रोजी देण्यात आला असून सदर प्रकरण हे सन १९९१ चे असल्याने या प्रकरणाची नस्ती मिळून येत नाही आणि याच नस्तीवरुन अहवाल तयार करायचा असल्याने विनानस्ती अहवाल तयार करणे शक्य नाही करिता आपण मागितलेल्या अहवालाची प्रत पुरविणे शक्य नाही असा निर्णय दिलेला आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, दिनांक २१.१२.२००९ च्या पत्रावर पोलीस आयुक्त, नागपुर यांचा अहवाल शासनाने मागितलेला आहे व त्या अहवालाची प्रत त्यांनी मागितलेली आहे. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सागितले की, सदरचा अहवालच सादर झालेला नाही व १९९१ चे प्रकरण असल्यामुळे नस्ती सापडत नसल्यामुळे तो अहवाल तयार करता येत नाही व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना कळविले असल्यामुळे सदरची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/११३३-११३४/२२.९.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२४३/२०१० व अपील क्रमांक १३०५/२०१०.**

श्री. सचिदानंद नथ्थुजी लोखंडे,
संघर्ष - ५८, मोहगांव झिल्पी,
ता. हिंगणा, जि. नागपूर - ४४१ ११०. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. पी. सानप,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, हिंगणा, जि. नागपूर.

श्री. प्रकाश ढाके,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्राम पंचायत मोहगांव झिल्पी,
ता. हिंगणा, जि. नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.९.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.८.२०१० व दिनांक ६.९.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २४.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची पुढील सुनावणी आज दिनांक २३.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपील क्रमांक १३०५/२०१० मध्ये दिनांक १३.९.२०१० रोजी नोटीस काढून सुनावणी आज दिनांक २३.९.२०१० रोजी घेण्यात आली अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपील क्रमांक १२४३/२०१० व अपील क्रमांक १३०५/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक १९.५.२०१० रोजी व दिनांक १८.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत मोहगांव

झिल्पी यांचेकडे श्री. मधुकर रामजी डुले यांचे घराचे बांधकामाचे संदर्भातील माहिती एकूण ८ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी १९६० ते २०१० पर्यंत आहे. पक्की इमारत बांधण्यास परवानगी मागणारी व नियमानी इमारत बांधली काय वगैरे माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. तसेच मृतक अरुण भैय्याजी बागडे यांचे नावानी मोहगांव झिल्पी येथे असलेल्या घराचा नमुना ८ द्वारे माहिती एकूण ६ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी १९६० ते २०१० पर्यंत दिसून येतो. सदरची माहिती व्यक्तिशः विशेष दुताद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २५.५.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २८.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ५.७.२०१० रोजी देण्यात आला असून त्यामध्ये अपीलकर्ता यांना न दिलेली माहिती आदेश प्राप्त होताच ७ दिवसात देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. दुसऱ्या अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक १७.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २३.८.२०१० रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना न दिलेली माहिती आदेश प्राप्त होताच ७ दिवसात देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक १९.५.२०१० रोजीच्या अर्जाचे संदर्भात जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, दिनांक ५.२.२००२ रोजी सचिव, ग्रामपंचायत, मोहगांव झिल्पी यांना जो इमारत बांधकामाचा परवानगीचा अर्ज दिला आहे व जो जनमाहिती अधिकारी यांनी उत्तरउपलब्ध करुन दिले आहे त्यामध्ये तफावत आहे. अपीलकर्ता यांनी जी बांधकामाची सत्यप्रत सादर केली आहे ती सत्यप्रत ही हाताने लिहिली आहे व त्यावर सही अस्पष्ट असे लिहिलेले आहे. त्यामुळे ते ग्राहय धरता येत नाही. मात्र जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, कार्यालयाचे अभिलेखामध्ये जे उत्तर उपलब्ध आहे त्या उत्तराची छायाप्रती उपलब्ध करुन दिलेली आहे. असे कोणतेही उत्तर तयार करुन प्रती दिलेल्या नाही व ग्रामपंचायतीच्या इतिवृत्ताची छायाप्रती सुध्दा दिलेली आहे. त्यामुळे

माहिती चुकीची दिली असे म्हणता येत नाही. त्यापेक्षा अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे उपस्थित होऊन आलेल्या अर्जाच्या नस्तीमधून उत्तराची मुळ प्रतीची तपासणी करुन स्वतःची खात्री करुन घेणे संयुक्तिक राहिल.

४. अपील क्रमांक १३०५/२०१० मधील अर्जाचे संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती प्रत्यक्षात त्यांचे घर मौक्यावर कुठे आहे ते मौक्यावर येऊन खोदून मला दाखविण्यात यावे अशी माहिती मागितलेली दिसून येते. असे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीमध्ये तरतुद नाही. कार्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या कागदपत्राची माहिती उपलब्ध होते. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचे जे म्हणणे आहे की, सदरची माहिती ही मोघम आहे त्यामुळे ती उपलब्ध करुन देता आली नाही हे योग्य आहे. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे आज असे सांगितले की, त्यांना अपील क्रमांक १३०५/२०१० ची नोटीस मिळाली नाही. त्यामुळे त्यासंबंधीची कागदपत्रे त्यांनी आज आणले नाही व त्यामुळे त्याबाबत त्यांचे विरुध्द शास्ती लादण्यात येऊ नये याबाबत त्यांनी पुन्हा विनंती केली. सदरच्या अर्जाचे संदर्भात सुध्दा मुद्या क्रमांक १ घर मौक्यावर कुठे आहे ते अर्जदारास दाखवावे व मुद्या क्रमांक ४ ची माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. इतर मुद्यांची माहिती ही कागदपत्राचे स्वरुपात उपलब्ध असल्यास त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता दोन्ही अपीले ही अंशतः मंजूर करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १२४३/२०१० व अपील क्रमांक १३०५/२०१० हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, मोहगांव झिल्पी यांचेकडे कामकाजाचे दिवशी तारीख व वेळ लेखी कळवून उपस्थित होऊन संबंधित अभिलेखांचे निरिक्षण करावे व खात्री करुन घ्यावी. तसेच दिनांक १८.५.२०१० च्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना कागदपत्राचे स्वरुपात माहिती उपलब्ध असल्यास उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/११३५-११३८/२३.९.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२४४/२०१०.**

श्री. सचिदानंद नथ्थुजी लोखंडे,
संघर्ष - ५८, मोहगांव झिल्पी,
ता. हिंगणा, जि. नागपूर - ४४१ ११०. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डोनगांवकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक ३,
ग्रामीण पोलीस अधिक्षक कार्यालयाचे पुर्वेस,
सिव्हील लाईन, नागपूर.

श्री. मजुमदार,
जनमाहिती अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक ३,
ग्रामीण पोलीस अधिक्षक कार्यालयाचे पुर्वेस,
सिव्हील लाईन, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.९.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २४.८.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची पुढील सुनावणी आज दिनांक २३.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर. आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक ३, नागपूर यांचेकडे उपविभाग हिंगणा सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक ३ येथील अधिकारी वर्गाच्या संदर्भातील एकूण १० मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती विशेष दुताद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १६.७.२०१० रोजी एकूण १० मुद्यावर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी त्यापूर्वीच दिनांक १४.६.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १२.७.२०१० रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांनी कागदपत्राचे निरिक्षण करावे अथवा ७ दिवसात माहिती पुरविण्यात यावी असा निर्णय दिला होता व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांचे चर्चेनुसार दस्तऐवजांच्या छायांकित प्रती पुरविण्यात आलेल्या आहेत. सदर माहिती दिनांक १६.७.२०१० रोजी अपीलकर्ता यांनी स्वतः तपासून त्यांनी त्यांचे प्रतिनिधी श्री. आर. वाय. मिश्रा यांना माहिती घेण्यास सांगितले व माहिती प्राप्त झाल्याची स्वाक्षरी करुन माहिती घेऊन गेल्याचे दिसून येते. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केले आहे.

३. माहिती प्राप्त झाली परंतु ती विलंबाने व अपूर्ण प्राप्त झाली असे अपीलकर्ता यांनी युक्तिवाद केला. मुद्या क्रमांक ३, ४ च्या संदर्भामध्ये माहिती त्यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नाही असे कळविले. मुद्या क्रमांक ५ ची माहिती शासन स्तरावर ठेवण्यांत आलेली आहे व मुद्या क्रमांक ७, ८, ९ व १० ची माहिती प्रश्नार्थक असल्यामुळे देता येत नाही असे कळविले ती चुकीची व दिशाभूल करणारी माहिती आहे. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अधिकाऱ्यांचे मालमत्तेचे विवरणपत्र हे कार्यकारी अभियंता कार्यालयात उपलब्ध नसते तर ते शासन स्तरावर म्हणजे सचिव, बांधकाम विभाग यांचेकडे उपलब्ध असते. जात पडताळणी प्रमाणपत्र सुध्दा मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे स्तरावर उपलब्ध असते. मुद्या क्रमांक ७, ८, ९ च्या संदर्भात जे नियम असतील त्या नियमाची माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. विलंबाचे मुद्यांचे संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती ही उपअभियंता यांचे कार्यालयात उपलब्ध असल्यामुळे त्यांचेकडून मागविण्यात आली त्यामुळे विलंब झालेला आहे. तसेच अपीलकर्ता यांचे दारिद्र रेषेखालील प्रमाणपत्राच्या चौकशीमुळे विलंब झालेला आहे. त्यामुळे विलंब माफ करण्याची विनंती केली आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत त्यांच्या दिनांक ७.५.२०१० च्या अर्जातील एकूण १० मुद्यांच्या संदर्भामध्ये मुद्ये निहाय माहिती उपलब्ध असल्यास त्याप्रमाणे छायांकित प्रती किंवा उपलब्ध नसल्यास कोणत्या स्तरावर उपलब्ध असतील व कोणत्या स्तरावर उपलब्ध असतात ही माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३०७/२०१०.**

श्री. सय्यद हाजीअली करीमअली,
बिनबा गेटचे मागे, सोनटक्के ले आऊट,
रहमतनगर रोड, ता. जि. चंद्रपूर - ४४२ ४०२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की,
ता. जि. औरंगाबाद.

जनमाहिती अधिकारी तथा
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की,
ता. जि. औरंगाबाद. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.९.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.८.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २३.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी हे गैरहजर. आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्याकडे जामा मस्जीद, बल्लारपूर या वक्फ संस्थेचे (एमएस-बीडब्ल्यू-६/०७) विश्वस्थांचे कार्यभार निवडणूका, न्यायालय, वक्फ बोर्डचे आदेश, निर्णय नुसार केलेल्या कार्यवाहीबाबत. माहे जुलै २००९ ते डिसेंबर २००९ या कालावधीतील हस्तांतरण, व्यवस्थापन व न्यायालयीन आदेशानुसार आपल्या स्तरावरुन केलेल्या कार्यवाहीबद्यल एकूण १४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने

... २

विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २६.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ७.४.२०१० रोजी देण्यात आलेला असून माहिती १५ दिवसात उपलब्ध करुन द्यावी असे आदेश मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनी दिलेले आहेत. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. उत्तरवादी हजर नसल्यामुळे सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ६.१.२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने कागदपत्राचे स्वरुपात उपलब्ध असलेली माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात प्रमाणित करुन विनामुल्य रजिस्टर पोस्टाने पुरविण्यात यावी. तसे न केल्यास जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक ६.१.२०१० च्या अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद यांनी विहित मुदतीत म्हणजे ३० दिवसामध्ये माहिती उपलब्ध करुन दिली नाही. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशाप्रमाणे सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिली नाही. तसेच आज आयोगापुढे सुध्दा हजर झाले नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रुपये २५०००/- ची शास्ती कां लादण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा आयोगापुढे करावा अन्यथा शास्ती कायम होईल व त्यांचे दरमहाचे वेतनातून वसूल करण्यात येईल.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/११४२-११४३/२३.९.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३०८/२०१०.

श्री. अमृतकुमार महादेवप्रसाद जयस्वाल,
आयकर कार्यालयाचे बाजुला, दिनदयाल सदनला लागून,
फुलचूर रोड, गोंदिया - ४४१ ६०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
ता. जि. गोंदिया.

श्री. डी. पी. राहांगडाले,
जनमाहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार,
ता. जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.९.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २.९.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २३.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अर्ज व प्रथम अपीलाचा अर्ज जोडलेला नाही. परंतु दिनांक २१.९.२०१० रोजी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयुक्त यांना निवेदन सादर केले असून त्यात दिनांक २१.९.२०१० ला नायब तहसीलदार कार्यालय, गोंदिया येथून संपूर्ण माहिती मिळाली, प्राप्त झाली असून माझी प्रकृती बरी

... २

नसल्यामुळे मी दिनांक २३.९.२०१० ला उपस्थित राहू शकत नाही. त्यामुळे अर्ज मा. तहसीलदार, गोंदिया यांचे मार्फत सादर करीत आहे व सदरचे अपील खारीज करण्यात यावी अशी विनंती केली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/११४४-११४५/२३.९.२०१०

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३०९/२०१०.

श्री. प्रमोदकुमार हरीशचंद्र अग्रवाल,
मनोहर चौक, पोलीस लाईन समोर,
गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सरव्यवस्थापक (प्रशासन)
दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. मार्केटिंग फेडरेशन लि.
कनमूर हाऊस, नरसी नाथा स्ट्रीट, मुंबई - ४०० ००९.

श्री. नितीन यादव,
जनमाहिती अधिकारी तथा
दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. मार्केटिंग फेडरेशन लि.
कनमूर हाऊस, नरसी नाथा स्ट्रीट, मुंबई - ४०० ००९. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.९.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.९.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २३.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. अजय महाडिक, कायदा अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.११.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. मार्केटिंग फेडरेशन लि. कनमूर हाऊस, नरसी नाथा स्ट्रीट, मुंबई यांचेकडे Custom Milling of Paddy

बाबत एकूण १५ मुद्यांवर २००८-०९ व २००९-१० या कालावधीतील माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचेकडे लेखी निवेदन सादर केले असून मुझे आज दिनांक २१.९.२०१० को मांगी गई माहिती प्राप्त हुई है तथा मेरा समाधान भी हो गया है तथा मुझे कोई भी शिकायत नही अतएंव मै आपके समक्ष दाखल अपील वापस लेता हू असे कळविले आहे. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३११/२०१०.

श्री. डॉ. बलवंत नत्थुजी मेश्राम,
४७७, हिवरी ले आऊट, नागपूर - ४४० ००८. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. प्रकाश वऱ्हाडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त (सामान्य प्रशासन विभाग)
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. ओ. ना. राऊत,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक अधिक्षक, (सामान्य प्रशासन विभाग)
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.९.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.९.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (सामान्य प्रशासन) महानगरपालिका, नागपूर यांचेकडे जाहिरात क्रमांक ३८/पीआर/२२/५/१० अन्वये दिनांक ५.६.२०१० रोजी आयोजित करण्यात आलेल्या वाक इन मुलाखतीच्या संदर्भामध्ये एकूण ३ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः किंवा पोस्टाने घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने

... २

अपीलकर्ता यांना दिनांक ३१.७.२०१० रोजी प्रत्येक प्रत रुपये २/- याप्रमाणे रुपये १६ चा भरणा केंद्रीय अभिलेख विभाग, सिव्हील लाईन, नागपूर येथे केल्यास व भरणा केल्याची पावती या कार्यालयास सादर केल्यास आपण मागितलेली माहिती तात्काळ स्वरुपाने देता येईल असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक २.८.२०१० रोजी माहिती एकूण ८ पृष्ठे उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ५.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. दिनांक ३०.८.२०१० रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला आहे व त्यामध्ये निवड समितीची निवड प्रक्रिया अपूर्ण असल्यामुळे ही माहिती देता येणे शक्य होणार नाही. मात्र मुलाखत नस्तीतील गुणपत्रिका सोडून बाकी नस्तीचे निरिक्षणाची परवानगी अपीलकर्त्यास देण्यात येते व त्यापैकी त्यांनी मागितलेले कागदपत्रे व दस्ताऐवज त्यांना निशुल्क देण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना उमेदवारांचे गुणांची माहिती उपलब्ध करुन दिली नाही. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मुलाखत पूर्ण झालेली आहे. गुणपत्रिका सुध्दा तयार आहेत. परंतु अंतीम निर्णय झालेला नाही. संपूर्ण माहिती ही बंद लिफाफामध्ये असते व ती महानगरपालिकेच्या सभागृहात उघड करावयाची असते. त्यापूर्वी ती उघड करता येणार नाही. यावरुन निवड प्रक्रिया ही अपूर्ण असल्यामूळे माहिती देता येत नसल्यामुळे हा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३१२/२०१०.**

श्री. जनार्दन गुलाबराव मुन,
केंद्रीय अध्यक्ष, नागरी हक्क संरक्षण मंच,
७९१, नागसेन वन, नागपूर - ४४० ०१७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपअधिक्षक,
विशेष पोलीस महानिरिक्षक,
नागपूर परिक्षेत्र, नागपूर.

श्रीमती विना सोनकुसरे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
विशेष पोलीस महानिरिक्षक,
नागपूर परिक्षेत्र, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.९.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.९.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४.९.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे वाचक श्री. अवस्थी, पोलीस निरिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, विशेष पोलीस महानिरिक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचेकडे आपल्या कार्यालयाचे पत्र क्रमांक ४०६९, दिनांक

... २

२१.६.२०१० च्या पत्रानुसार दिलेल्या माहितीची नोटशीटच्या प्रती मिळण्याबाबत. विशेष पोलीस महानिरिक्षक यांनी उपरोक्त विषयांकित दिलेल्या माहितीच्या फाईलची संपूर्ण नोटशिटच्या सत्यप्रती देण्याची तसदी घ्यावी. प्रती साक्षांकित करुन द्यावीत अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १६.७.२०१० रोजी कार्यालय अधिक्षक तथा माहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती गोपनीय स्वरुपाची असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नियम ८ (ड) प्रमाणे उपलब्ध करुन देता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे दिनांक २६.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भात जनमाहिती अधिकारी यांचाच निर्णय कायम ठेवण्यात आला व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांच्याच केलेल्या तक्रारीवर काय कार्यवाही झाली ही संपूर्ण माहिती त्यांना अवगत करणे आवश्यक आहे व त्यामुळे त्यांनी नोटशिट मागितली आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, नोटशिटमध्ये इतर माहिती असते. त्यामुळे ती नाकारली आहे. अपीलकर्ता यांनी मागणी केलेली असल्यामुळे सदरच्या नोटशिटची प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक २२.६.२०१० च्या अर्जातील मागितलेल्या माहितीप्रमाणे नोटशिटची प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/११५०-११५१/२४.९.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०७१/औरंगाबाद/२०१०.

श्री. सुरळकर नागसेन राजाराम,
मु. पो. नाडगांव (दादानगर),
ता. बोदवड, जि. जळगांव. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डी. एस. लोखंडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (ग्राम पंचायत)
पंचायत समिती, बोदवड,
जि. जळगांव.

श्री. विनोद सुकरेन सुर्यवंशी,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक, कुऱ्हे हरदो,
ता. बोदवड, जि. जळगांव. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.९.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २७.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २३.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची पुढील सुनावणी आज दिनांक २९.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.११.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बोदवड, जि. जळगांव यांचेकडे ग्रामपंचायत कार्यालय कुऱ्हे हरदो येथील ग्रामपंचायतीने केलेल्या विकास कामाची माहिती मिळण्याबाबत एकूण ४ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते.

... २

माहितीचा कालावधी सन २००७ ते २००९ दिलेला आहे. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जदार दारिद्रय रेषेखालील आहे त्याचे प्रमाणपत्र जोडले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१२.२००९ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, ग्राम पंचायत, पंचायत समिती, बोदवड यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १८.१.२०१० रोजी देण्यात आलेला असून त्यामध्ये अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही कुऱ्हे हरदो ग्रामपंचायतीची असल्याने सदरचा अर्ज रजिस्टर पोस्टाने दिनांक २४.११.२००९ रोजी ग्रामसेवक श्री. एस. ए. कुमावत यांचेकडे वर्ग करण्यात आला आहे. परंतु त्यांना माहिती दिली नाही म्हणून प्रथम अपील दाखल करण्यात आले आहे व जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, कुऱ्हे हरदो यांनी सदरची माहिती सदरचे आदेश पारित झाल्यापासून ३० दिवसांचे आंत अपीलकर्तास माहिती द्यावी. तसेच पुढे निर्णयात श्री. एस. ए. कुमावत यांचेकडून सदर ग्रामपंचायतीचा कार्यभार काढून घेण्यात आला असून त्यांनी अद्याप चार्ज दिलेला नाही असे विद्यमान ग्रामसेवक श्री. सुर्यवंशी यांनी सुनावणीत नमुद केले. तरी सुध्दा श्री. सुर्यवंशी यांनी सदरचे दप्तर श्री. एस. ए. कुमावत यांचेकडून माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिले व त्या आदेशाप्रमाणे दिनांक १८.२.२०१० रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे त्यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांनी ७० दिवस माहिती देण्यास विलंब केला. जनमाहिती अधिकारी यांनी माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी व खोटी माहिती दिली. ग्रामसेवक यांनी माहिती देतांना अर्जात नमुद केल्याप्रमाणे माहिती दिली नसून त्यांनी गटविकास अधिकारी यांचे दलित वस्तीबाबतचे कामाचे अंदाजपत्रकीय मुल्याचे प्रस्ताव जोडून पाठविले आहेत. अनुदान म्हणून माहिती देतांना कामावर मजूर किती होते व त्यावर मजूरीवर किती खर्च झाला, हजेरी पत्रक यांची तसेच कामाचे छायाचित्र दिलेली नाही. तसेच अनुदान हे वर्षवार दिलेले नाही. इत्यादी प्रमाणे त्यांनी अपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, ते जानेवारी मध्ये सदरच्या ग्रामपंचायत मधून आले व त्यानंतर त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपीलकर्ता यांनी

मुळातच जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांचेकडे माहितीचा अर्ज न करता तो माहिती अधिकारी पंचायत समिती यांचे कडे दाखल केला. अधिनियमाप्रमाणे हे स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण आहे. कलम ५ प्रमाणे ग्रामसचिव यांना जनमाहिती अधिकारी म्हणून नियुक्ती दिली आहे व त्यामुळे कलम ६ प्रमाणे ज्या सार्वजनिक प्राधिकरणाकडील माहिती असेल त्याच सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती मागणे अपेक्षित आहे. तरच ती माहिती ३० दिवसामध्ये उपलब्ध होऊ शकते. पंचायत समिती ही स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण आहे व पंचायत समितीसाठी माहिती अधिकारी हे ग्रामपंचायतचे माहिती अधिकारी होत नाही. त्यामुळे मुळातच ग्रामपंचायतची माहिती हे पंचायत समितीचे माहिती अधिकारी यांना मागणे व ती पुन्हा विहित मुदतीत उपलब्ध झाली नाही म्हणून तक्रार करणे हे सर्वस्वी गैर आहे. असे असले तरी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १८.१.२०१० च्या पत्रामध्ये सदरचा अर्ज हस्तांतर केलेला आहे असे नमुद केले आहे व युक्तिवादात सुध्दा त्यांनी तसे सांगितले. तसेच तत्कालीन जनमाहिती अधिकारी श्री. एस. ए. कुमावत यांची मानसिक स्थिती योग्य नसल्यामुळे त्या कालावधीत त्यांचेकडून त्या ग्रामपंचायतीचा कार्यभार काढून घेऊन विद्यमान जनमाहिती अधिकारी यांना देण्यात आला असेच त्यांनी त्या पत्रात सुध्दा नमुद केलेले आहे. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी किंवा आयोगाने पाठीशी घालणे असा जो आरोप अपीलकर्ता यांनी केला तो बेजबाबदारपणाचा आहे. अधिनियमाच्या तरतुदी हया फक्त अधिकाऱ्यांना किंवा आयोगास लागू आहेत असे सोईस्कर गैरसमज अपीलकर्ता यांनी करुन घेतलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांना माहिती विलंबाने उपलब्ध झाली त्यात स्वतः ते कारणीभूत आहेत. त्यामुळे विलंबाचा मुद्या हा निकाली निघतो. उपलब्ध झालेली माहिती ही अपूर्ण असल्याचे विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना मुद्येनिहाय माहिती व त्यांनी तोंडी युक्तिवाद सांगितल्याप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्यामुळे त्यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत रजिस्टर पोस्टाने मुद्ये निहाय माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०७२/औरंगाबाद/२०१०.**

श्री. सुरळकर नागसेन राजाराम,
मु. पो. नाडगांव (दादानगर),
ता. बोदवड, जि. जळगांव. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. पी. के. पाटील,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
ता. बोदवड, जि. जळगांव.

श्री. सु. आ. पाटील,
जनमाहिती अधिकारी तथा
कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी,
ता. बोदवड, जि. जळगांव. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.९.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, औरंगाबाद यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २७.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २३.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची पुढील सुनावणी आज दिनांक २९.९.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.११.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, बोदवड यांचेकडे सन २००५ ते दिनांक १३.७.२००९ पर्यंतच्या कालावधीतील तालुका कृषि अधिकारी, बोदवड येथील आवक जावक रजिस्टर मधून कृषी अधिकारी यांना (तसेच कृषी अधिकारी कार्यालयास) सन २००५ ते

... २

सन माहे दिनांक १३.७.२००९ पर्यंतच्या कालावधीत कोण कोणती कागदपत्रे दिली याची माहिती मिळावी तसेच कागदपत्रांच्या सत्यप्रती मिळाव्यात व त्या आवक जावक रजिस्टरमधून मिळालेल्या कागदपत्रांच्यावर कृषी अधिकारी कार्यालय, बोदवड यांनी कोणकोणती कारवाई केली त्याची माहितीच्या सत्यप्रती मिळाव्यात व माहिती देतांना कागदपत्रनिहाय माहिती देण्यात यावी. सदर माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केले आहे. माहिती ही महाराष्ट्रातील शासकीय कार्यालये आणि भ्रष्ट्राचार या पुस्तकाच्या लेखन सामुग्रीसाठी पाहीजे आहे असे नमुद केलेले आहे. अर्जदार यांनी दारिद्रय रेषेखालील आहे असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये अपीलकर्ता हे दिनांक १८.३.२०१० रोजी सुनावणीस गैरहजर असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी लेखी प्रतिज्ञापत्र दिलेले आहे व त्यामध्ये विहित मुदतीत माहिती दिलीच नाही या कारणासाठी जनमाहिती अधिकारी यांना शास्ती करण्यात यावी. तसेच बाहेरगावी असल्यामुळे हजर राहता येणार नाही. अपील सुनावणीचा दिनांक ७ दिवस आधी कळवणे गरजेचे होते वगैरे कारण दिले आहे. जनमाहिती अधिकारी कार्यालयात नसने. तसेच विचारणा केली असता बाहेर गेलेले आहेत असे सांगितले आहे. दिनांक १८.९.२०१० रोजी लेखी पत्र देऊन परत माहिती देण्याची विनंती केली. तरी पण मला आजपर्यंत माहिती मिळाली नाही असे नमुद केले आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहितीचे निश्चित वर्णन केले नाही. निश्चित अशा कागदपत्राचे वर्णन केलेले नाही. त्यांनी मागितलेली माहिती ही ५ वर्षाच्या कालावधीतील असून आवक जावक रजिस्टरमध्ये पत्रावर झालेली कार्यवाहीची माहिती व कागदपत्रे अशा प्रकारे मोघम माहिती मागितलेली आहे. कृषी अधिकारी यांचे कार्यालय हे तालुका कार्यालय आहे व तालुका कार्यालयामध्ये शेकडोंचा पत्र व्यवहार होत असतो व ५ वर्षामध्ये हजारोंनी पत्र व्यवहार झालेला आहे. त्यावरुन सर्व कार्यवाही याचा अर्थ कार्यालयात ५ वर्ष जेवढे अभिलेखे असतील त्या सर्वांच्या सत्यप्रतीलिपी उपलब्ध करुन देणे असा होईल. अपीलकर्ता हे पुन्हा दारिद्रय

रेषेखालील आहेत असे त्यांनी नमुद केलेले आहे. प्रमाणपत्र सादर केलेले नाही. अर्जास त्यांनी तिकीटपण लावले नाही व त्याकारणास्तव अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ९.११.२००९ चा अर्ज कार्यालयात दिनांक २१.११.२००९ रोजी प्राप्त झालेला असल्यामुळे त्यांना दिनांक १७.१२.२००९ रोजी विहित मुदतीत आपण मागितलेल्या माहितीची जाणीव होत नाही. तरी आपणास विनंती आहे की, आपण कार्यालयात सदर माहितीचे अवलोकनार्थ प्रत्यक्ष भेटून नेमकी लागत असलेली माहिती देण्यास हे कार्यालय समर्थ असून त्यासाठी आपण दिनांक २१.१२.२००९ रोजी दुपारी ठिक ४.०० वाजता उपस्थित राहून सहकार्य करावे असे कळविण्यात आलेले होते. परंतु अपीलकर्ता हे कार्यालयात उपस्थित झाले नाही. त्याबाबत अपीलकर्ता यांनी सुध्दा कार्यालयात हजर राहणेबाबत आक्षेप घेतला आहे अशा पत्राची प्रत किंवा पुरावा आयोगास सादर केला नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी अर्जाचे संदर्भामध्ये मत कळविले आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना निरिक्षण करुन माहिती नको आहे तरी त्यांचे कार्यालयात ठेवण्यास त्या सर्व कागदपत्रांची आवश्यकता आहे असे अर्जातच नमुद केलेले आहे. माहिती त्यांना पुस्तक लिहिण्यासाठी पाहिजे आहे. परंतु अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य आहे असे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे माहिती याचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने इत्यादींचा समावेश होतो व "माहितीचा अधिकार" या संज्ञेच्या व्याख्येमध्ये कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्यांच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळवण्याचा अधिकार असा आहे आणि त्यात एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे, व त्यानंतर दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिपण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे असा आहे. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांना अपीलकर्ता यांच्या मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जे त्यांनी निरिक्षणाकरिता कळविले आहे ते नियमानुसार आहे. अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्रधारक आहेत त्यामुळे त्यांना माहिती ही विनामुल्य उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे व मागितलेल्या माहितीचे प्रमाण हे विपूल प्रमाणात असल्यामुळे तसा खर्च करणे कार्यालयास शक्य नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्याकरिता कोणताही निधी शासनाकडून उपलब्ध होत नाही. तसेच अधिनियमाचे कलम ७(९) प्रमाणे सदरची माहिती उपलब्ध

करुन द्यावयाची झाल्यास जनमाहिती अधिकारी यानी असे सांगितले की, त्यांचे कार्यालयात स्वतंत्र कर्मचारी नियुक्त करावा लागतो किंवा स्वतंत्र कार्यालयाकडे ते काम द्यावे लागते व तसे स्वतंत्र कार्यालय सुध्दा नाही व स्वतंत्र निधी सुध्दा नाही. त्यामुळे सर्वच कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे सर्वस्वी अशक्य आहे. आवक जावक नोंदवहीमध्ये निवेदने किंवा अर्ज सुध्दा असतात. ते बरेचवेळा अनावश्यक असतात. त्यामुळे सर्वच्या सर्वच प्रती छायांकित प्रती देणे ही बाबच मुळात अनावश्यक आहे व माहितीचा अधिकाराचा गैरवापर आहे. माहिती ही निश्चित वर्णन करुन मागिल्यास ती उपलब्ध करुन देता येईल. हे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य आहे. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही मुळातच मोघम व व्यापक प्रमाणात असल्यामुळे व त्यात कोणतेही सार्वजनिक व्यापक हित आहे असे दिसून येत नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करणे आवश्यक आहे असे आयोगाचे मत झाले आहे. अपीलकर्ता हे शासनाच्या खर्चाने कागदपत्रे उपलब्ध करुन घेऊन त्यावर पुस्तक लिहणार हे अनाकलनीय आहे. त्याकरिता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. अपीलकर्ता हे सुनावणीचे वेळेस आयोगास सुध्दा आरोप करण्यास मागेपुढे पाहत नाही. यावरुन अपीलकर्ता यांची प्रवृत्ती दिसून येते.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११२४/२०१० व अपील क्रमांक ११२५/२०१०.

श्री. दिपक टहलराम मोटवानी,
शिवाजी चौक, मेन रोड,
ता. आर्वी, जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. एम. स्वामी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था
जि. वर्धा.

श्री. सु. शा. वरेकर,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
कृषी उत्पन्न बाजार समिती,
ता. आर्वी, जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.८.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.७.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २९.७.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.८.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.८.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी तथा कृषी उत्पन्न बाजार समिती, आर्वी, जि. वर्धा यांचेकडे दोन अर्जाचे माध्यमातून खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे. १) कृषी उत्पन्न बाजार समितीचे वार्षिक

... २

आर्थिक उत्पन्न किती आहे त्याची माहिती व त्या उत्पन्नातून वार्षिक खर्च किती झाला आहे व तो खर्च कोणकोणत्या कामांवर सभापती, सदस्य यांच्या सुख सुविधेवर वाहनांवर व इतरही संपूर्ण कामावर केलेल्या खर्चाची माहिती द्यावी. २) कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संपूर्ण विकास कार्य किती झाले आहे व कुठे कुठे झाला आहे त्या बांधकामाची माहिती देणे. सर्व कामाच्या निविदाची तुलनात्मक तक्त्याची संपूर्ण प्रत देणे. विकास कामाकरिता कोणकोणत्या बांधकामावर किती किती निधी आला त्या निधीची माहिती देणे. विविध बांधकामाचा मोजमाप पुस्तिकेची सत्यप्रत देणे व त्यावर काढलेले निधिची माहिती देणे. बांधकामाच्या शेडयुल-बी ची सत्यप्रत देणे अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या माहितीचा कालावधी २००० ते २०१० पर्यंत. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ७.६.२०१० रोजी दोन प्रथम अपीले दाखल केलेली आहेत. दोन्ही प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २९.६.२०१० रोजी देण्यात आलेला असून अपीले अंशतः मान्य करण्यात आलेली आहेत व माहिती अधिकारी तथा सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, आर्वी यांनी अर्जदाराच्या दिनांक १६.४.२०१० रोजीच्या अर्जात नमुद केलेली माहिती अनुक्रमे १० दिवस ते १५ दिवसाचे आंत उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत.

३. दोन्ही द्वितीय अपीलांच्या सुनावणीमध्ये अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितलेली आहे ती कृषी उत्पन्न बाजार समिती कडून मागितली आहे व प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, वर्धा यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला असून सुध्दा अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान माहिती उपलब्ध करुन देण्यास मान्य केले होते व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती यांचे तर्फे श्री. अविनाश पालीकुंदवार व श्री. अनुपम देसाई, वकील हे हजर झाले व त्यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, दिनांक ४.११.२००९ रोजी राज्य माहिती आयुक्त, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील

... ३

अपील क्रमांक १४४१/२००८ मधील श्री. जितेंद्र अशोक कुयरे यांचे विरुध्द सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगांव, जि. बुलढाणा या अपीलामध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीस शासनाचे कोणतेही अनुदान किंवा आर्थीक मदत मिळत नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (ज) मधील "सार्वजनिक प्राधिकरण" या संज्ञेच्या व्याख्येमध्ये समावेश होत नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागू होत नाही व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

४. त्यावर अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, कृषि उत्पन्न बाजार समिती ही महाराष्ट्र विधान मंडळाच्या महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ च्या तरतुदीप्रमाणे घटीत झालेली आहे व त्यामुळे अधिनियमातील सार्वजनिक प्राधिकरण या संज्ञेच्या व्याख्येतील (ग) राज्य विधानमंडळाने तयार केलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे अशी तरतुद असल्यामुळे त्यास कृषी उत्पन्न बाजार समिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागू होतात. त्यामुळे सदरची माहिती त्यांनी उपलब्ध करुन देणे कृषी उत्पन्न बाजार समितीस बंधनकारक आहे.

५. कोणत्याही अधिनियमाच्या तरतुदी लागू आहेत किंवा नाही हे ठरवितांना त्या अधिनियमातील व्याप्ती व प्रारंभ या तरतुदींचा विचार करावा लागतो. तसेच व्याख्येमध्ये जर निरनिराळया संज्ञेची व्याख्या केली असली तरी त्या व्याख्येचा संदर्भ तपासावा लागतो. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा मुळ उद्देश हा सार्वजनिक प्राधिकरणामध्ये पारदर्शकता व चांगले प्रशासन नागरिकांना उपलब्ध करुन देणे हे आहे. त्यामुळे सार्वजनिक प्राधिकरण म्हणून कोणते हे तपासतांना अधिनियमाचे कलम २ (ज) मध्ये "सार्वजनिक प्राधिकरण" या संज्ञेची व्याख्या दिलेली आहे व ती खालील प्रमाणे

"(ज) "सार्वजनिक प्राधिकरण" याचा अर्थ

(क) संविधानाद्वारे किंवा तद्न्वये.

(ख) संसदेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे.

(ग) राज्य विधानमंडळाने तयार केलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे.

(घ) समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे, स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था असा आहे, आणि त्यात

(एक) समुचित शासनाची मालकी असलेला, त्यांचे नियंत्रण असलेला किंवा त्यांच्याकडून निधिद्वारे ज्याला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्तपुरवठा केला जातो असा निकाय,
(दोन) समुचित शासनाकडून निधीद्वारे ज्यांना प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्तपुरवठा केला जातो अशी अशासकीय संघटना यांचा समावेश आहे".

६. वरील व्याख्या ही दोन विभागात विभागली आहे. पहिल्या भागामध्ये "सार्वजनिक प्राधिकरण" हे कशा प्रकारे घटीत झाले आहे त्याबद्यलची निश्चित असा सर्व समावेश याचा अर्थ (exhaustive परिपूर्ण) व्याख्या दिलेली आहे. दुसऱ्या भागामध्ये या सर्व समावेश भाग विस्तारीत (inclusive) केला आहे म्हणून सर्व समावेशामध्ये ज्या ज्या निकषाप्रमाणे जे सार्वजनिक प्राधिकरण गठन झाले असेल त्याचा सर्वाचा समावेश होतो. विस्तारीत व्याख्येमध्ये सुरुवात करतांना "आणि त्यात ................ याचा समावेश आहे असे नमुद केले आहे व त्यावरुन पहिला भाग हा पूर्ण आहे व दुसऱ्या भागामध्ये शासनाची मालकी असणारा किंवा नियंत्रण असणारा किंवा त्यांस निधी मोठया प्रमाणात उपलब्ध करुन देता येतील असा निकाय तसेच अशासकीय संघटना यांचा समावेश केलेला आहे. जे वरील (क)(ख)(ग)(घ) मध्ये येत नाही. त्यामुळे वरील व्याख्येतील (ग) मध्ये राज्य विधानमंडळाने तयार केलेल्या कायद्यामध्ये ही तरतूद असल्यामुळे महाराष्ट्र राज्य विधान मंडळाने महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चा विचार करावा लागतो. व्याख्येच्या पहिल्या भागातील कोणत्याही निकषामधील प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था याचा समावेश आहे. महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री समिती ही निवडणुकीचे माध्यमातून निवडून येत असल्यामुळे ती स्वराज्य संस्था सुध्दा आहे व महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ च्या प्रकरण ३ मध्ये बाजार समितीची रचना कलम ११ ते २८ व त्यामध्ये कलम ११ मध्ये बाजार समित्यांची स्थापना :- राज्य सरकार प्रत्येक बाजार क्षेत्रासाठी सभापती, उपसभापती व इतर सदस्य यांचा समावेश असलेली एक बाजार समिती स्थापन करील आणि त्यास एकाच बाजार क्षेत्रासाठी किंवा त्यांच्या कोणत्याही भागासाठी निरनिराळया प्रकारच्या कृषि उत्पन्नाच्या खरेदी-विक्रीचे नियमन करण्यासाठी बाजार समित्या स्थापन करता येतील अशी तरतुद आहे. कलम १२ मध्ये बाजार समित्यांचे नियमन :- प्रत्येक बाजार समिती ...... "कृषि उत्पन्न बाजार समिती" या नावाचा निगम निकाय असेल, आणि त्या त्या वेळी पोट कलम

२ मध्ये अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी प्रत्येक बाजार समिती ही सर्व प्रयोजनासाठी स्थानिक प्राधिकरण असल्याचे मानण्यात येईल अशी तरतुद आहे. यावरुन सदरची बाजार समिती ही अधिनियमाचे तरतुदी प्रमाणे घटीत होते. ती पंजीबध्द करावी लागत नाही. त्यामुळे सार्वजनिक प्राधिकरण वर नमुद केल्याप्रमाणे पोट कलम (ग) मधील निकषाप्रमाणे ती सार्वजनिक प्राधिकरण या व्याख्येमध्ये समावेश होतो. त्यामुळे सदरची बाजार समिती शासन निधी उपलब्ध होतो किंवा नाही या विस्तारीत व्याख्येतील तरतुदींचा आधार घेता येणार नाही व तसेही महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) १९६३ च्या उद्देशाचा विचार केला तर बाजार क्षेत्रात शेतीचे व इतर उत्पन्न विक्रीस व तशी स्थापन करावयाची किंवा अशा बाजारा संबंधी असल्यामुळे प्रयोजनासाठी काम करणाऱ्या बाजार समितीस शक्ती प्रदान करणे व इतर कार्यक्षेत्राचा उद्देश यावरुन अधिनियमाचा उद्देश हा सार्वजनिक हिताचा आहे. म्हणून दोन्ही निकष जे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा संबंध तपासावयास पाहिजे. त्या दोन्ही निकषामध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीचा समावेश होतो असे आयोगाचे मत झालेले आहे.

७. त्यापुढे सुध्दा इतर तरतुदींचा विचार केला तर प्रकरण ८ मध्ये नियंत्रणे दिलेली आहेत व त्या नियंत्रणामध्ये कलम ४० ते ४५ मध्ये तरतुदी आहेत. त्या तरतुदीमध्ये कलम ४० मध्ये निरिक्षण, चौकशी, विवरणपत्रे इत्यादी सादर करणे संचालकास किंवा त्याने सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास (अ) बाजार समित्यांच्या लेख्यांचे व कार्यालयाचे निरीक्षण करता येईल किंवा करविता येईल. (ब) बाजार समितींच्या कारभाराची चौकशी करता येईल. (क) जे विवरण, विवरणपत्र, लेखे किंवा प्रतिवृत्त पुरविण्याविषयी अशा समितीला सांगणे त्याला योग्य वाटेल असे कोणतेही विवरणपत्र, लेखे किंवा प्रतिवृत्त मागविता येईल अशी तरतुद आहे. तसेच कलम ४१ मध्ये संचालकाला प्राधिकृत अधिकाऱ्यांना आणि राज्य सरकारला माहिती पुरविणे हे अधिकारी व सदस्य यांचे कर्तव्य असेल अशीही तरतुद आहे. कलम ४२ प्रमाणे संचालकाला आवश्यक वाटल्यास लेखापुस्तके आणि दस्तऐवज जप्त करु शकतात. कलम ४४ प्रमाणे बाजार समित्यांचे एकत्रीकरण किंवा विभागणी अधिकार हे राज्य सरकारला दिलेले आहे. कलम ४५ प्रमाणे बाजार समिती इत्यांदीचे अधिक्रमण सुध्दा राज्य शासनास करता येईल व त्यामुळे संपूर्ण नियंत्रण निवडणूक इतर समिती असली तरी हे शासनाचे आहे याचे एकमेव कारण बाजार

समितीच्या हिताच्या करिता आहे. त्यामुळे दोन्ही निकषाप्रमाणे महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री बाजार समिती "सार्वजनिक प्राधिकरण" या संज्ञेच्या व्याख्येत येत असल्यामुळे त्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागू आहेत.

८. वरील विवेचनावरुन कृषी उत्पन्न बाजार समिती यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागू होत असल्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती, आर्वी, जिल्हा वर्धा यांना अधिनियमाचे कलम ५(१) प्रमाणे जनमाहिती अधिकारी नियुक्त करणे संयुक्तिक राहिल व जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी नियुक्त केल्यानंतर अपीलकर्ता यांच्या दिनांक १६.४.२०१० च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल व त्याकरिता अपीलकर्ता यांची दोन्ही अपीले मंजूर करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांची दोन्ही अपीले ही मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत कृषी उत्पन्न बाजार समिती, आर्वी यांनी अधिनियमाचे कलम ५(१) प्रमाणे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची नियुक्ती करावी व त्यानंतर अपीलकर्ता यांच्या दिनांक १६.४.२०१० च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता मागितलेल्या माहितीची अंदाजे पृष्ठ संख्या व प्रती पृष्ठ रुपये २/- अतिरिक्त खर्चाचे विवरण अपीलकर्ता यांना कळवावे.
२) त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना खर्चाचे विवरण कळविल्यावर अपीलकर्ता यांनी १० दिवसांचे आंत खर्चाचा भरणा हा सार्वजनिक प्राधिकरणाकडे करावा व अशा प्रकारे अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केल्यानंतर अपीलकर्ता यांना १० दिवसांचे आंत मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रती माहितीच्या अधिकारात उपलब्ध करुन दिल्या असे प्रमाणित करुन द्यावे. त्याकरिता अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती (जनमाहिती अधिकारी) यांचेकडे उपस्थित होऊन सर्व कार्यवाही करावी.
३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**